


दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

कार शिकायची तर कुठे फक्त शिवकृपा मध्येच...
शिवकृपा मोटार ड्रायव्हिंग स्कूल & पी यु सी (PUC) सेंटर
आमचे वैशिष्ट्ये : । महिलासाठी स्वतंत्र बॅच व्यवस्था । 3D कार सिम्युलेटर वर ड्रायव्हिंगचा सराव. । वाहतुक नियमावलींची परिपूर्ण माहिती. । मोबाईल APP द्वारे वाहतुक नियमांची परिपुर्ण माहिती. । मोटर व्हेईकल ॲक्टच्या अभ्यासक्रमानुसार ड्रायव्हिंग प्रशिक्षण. । अवघड वळणावर रात्रीच्या वेळी घाटात आणि गर्दीत प्रशिक्षण देणारी एकमेव संस्था. आमच्याकडे सर्व वाहनांचे इन्शुरन्स काढुन मिळेल.
पत्ता : शॉप नं.६ ओंकार लॉन्सजवळ, धाड नाका, बुलढाणा
सचिन सोनटक्के - ९९२३७२२५५५/ नितीन सोनटक्के - ९९२३१२२५५५

## स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन; शिवाजी पार्कमध्ये साश्रू नयनांनी 'स्वरयोगिनी'ला निरोप..



# अखेर 'आशा' मावळली!

**मुंबई, वृत्तसंस्था :**

गायिका आशा भोसले यांच्यावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामात सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र पोलिसांनी त्यांना मानवंदना दिली. बॉलिवूड गायकांनी 'अभी ना जाओ छोडकर' हे गाणे गाऊन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. आशा भोसले यांच्या अंत्यविधी दरम्यान मुलगा आनंद भोसले यांनी मुखाग्नी दिला.

सकाळी, अंत्यदर्शनासाठी त्यांचे पार्थिव मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी, कासा ग्रांडे येथे ठेवण्यात आले होते. रविवारी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांचे निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांनी आपल्या ८२ वर्षांच्या गायन कारकिर्दीत नऊ फिल्मफेअर पुरस्कारांसह १०० हून अधिक पुरस्कार जिंकले. त्यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या निधनामुळे भारतीय कलाविश्वात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. आशाताईंचे भारतीय कलेतील योगदान अतुलनीय असल्याने, राज्य सरकारतर्फे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिसांनी हवेत फैरी झाडून आणि शोकधून वाजवून या महान गायिकेला मानवंदना दिली. त्यांच्या पार्थिवावर तिरंगा लपेटण्यात आला होता. प्रशासकीय अधिकारी, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि राज्य मंत्रिमंडळातील सदस्यांनी पुष्पचक्र अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

### दिग्गजांकडून अंत्यदर्शन आणि आदरांजली

■ आशाताईंचे पार्थिव लोअर परळ येथील त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. या थोर गायिकेचा निरोप घेण्यासाठी आणि त्यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच चाहत्यांची आणि मान्यवरांची मोठी गर्दी लोटली होती. क्रीडा, राजकीय, सामाजिक आणि चित्रपट सृष्टीतील अनेक दिग्गजांनी त्यांच्या निवासस्थानी पोहोचून श्रद्धांजली अर्पण केली. आशाताईंच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती नव्हे, तर भारतीय चित्रपट संगीताचा चालता-बोलता इतिहास काळाच्या पडद्याआड गेला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पुष्पचक्र अर्पण केले

■ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांनी आशा भोसले यांच्या अंत्यविधीपूर्वी त्यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



**चित्रपट सृष्टीतील कलाकारांची हजेरी...** आशाताईंच्या गायनाने बॉलिवूडच्या अनेक पिढ्या सुवर्णमयी झाल्या. त्यांच्या अंत्यसंस्काराला चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार पोहोचले होते. प्रसिद्ध अभिनेता आमिर खान आणि विकी कौशल यांनी उपस्थित राहून या महान गायिकेला श्रध्दांजली अर्पण केली. चित्रपट सृष्टीतील अन्य अनेक नामवंत कलाकार, संगीतकार आणि गायकांनी देखील यावेळी हजेरी लावली होती. प्रत्येकाच्या डोळ्यात या 'स्वरमाऊली'ला निरोप देताना पाणी उभे होते.

## न्यूज ब्रीफ

### चिनी कॅमेऱ्यातून भारताची हेरगिरी

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरमध्ये जोरदार तडाखा बसल्यानंतर पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेकडून आता हेरगिरी क्षमता वाढवली जात आहे. पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा असलेल्या आयएसआय भारतीय लष्कर आणि सीमा सुरक्षा दलाच्या हालचाली, जवानांची तैनाती, शस्त्रास्त्रांची वाहतूक आणि पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि जम्मू काश्मीरमधील लष्कराच्या ठिकाणांचे व्हिडीओ मिळवण्याचे प्रयत्न करत आहे. भविष्यात भारतासोबत कुठला लष्करी संघर्ष झाला, तर त्यासाठी ही माहिती मिळवली जात असल्याचे रिपोर्टमध्ये म्हटले आहे. पाकिस्तानी आयएसआयचा हेतू ऑपरेशन सिंदूरनंतर स्वतःची ट्रॅकिंग प्रणाली आणि क्षमता अधिक चांगल्या पद्धतीने तयार करण्याचा आहे.

### मतदानासाठी बायोमेट्रिक आणि फेस रिकग्निशन?

**नवी दिल्ली :** निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि बोगस मतदानाला पूर्णपणे आळा घालण्यासाठी मतदारांची 'बायोमेट्रिक' आणि 'फेस रिकग्निशन' चाचणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. भाजप नेते आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने निवडणूक आयोग, केंद्र सरकार आणि राज्यांना नोटीस बजावली.

### ..कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर

# भीषण अपघात; ११ मृत्यू

## ईको कार - सिमेंट मिक्सर ट्रकची समोरासमोर धडक

**कल्याण, वृत्तसंस्था :**

अहिल्यानगर महामार्गावर सोमवारी सकाळी ईको कार व सिमेंट मिक्सर ट्रकचा एक भयंकर अपघात झाला आहे. या घटनेत तब्बल ११ प्रवाशी ठार झाले असून, दोन जण गंभीर जखमी झाले. मृतांत तीन महिलांचा समावेश आहे. या अपघातानंतर घटनास्थळी अंगावर काटा आणणारे दृश्य निर्माण झाले होते.

कल्याण - नगर मार्गावर सोमवारी सकाळी एक ईको कार व सिमेंट मिक्सर ट्रकचा भीषण अपघात झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यात ईको कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. त्यामुळे त्यातील ११ प्रवाशांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. ते जागीच ठार झाले. या घटनेत इतर दोन जणही गंभीर जखमी झाले. त्यांना लगतच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. मृतांत आठ पुरुष व ३ महिलांचा समावेश आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ती माहिती महामार्ग पोलिस व स्थानिक टिटवाळा पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले. सर्वांनी कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढले.



### मृतांची नावे

प्रशांत चेदणे, भूषण घोरपडे, अनंता पवार, दीपक गवळी, नेहा मोहपे, मानसी मोहपे, प्रथमेश मोहपे, जिजागा केमबारी, मदे.

### नेमकी कशी घडली घटना?

प्राथमिक माहितीनुसार, कल्याण - अहिल्यानगर महामार्गावरील गोविली गावालगतच्या रायता पुलावर सकाळी १०.४५ च्या सुमारास हा अपघात घडला. अपघातग्रस्त ईको कार कल्याण ते मुरबाड अशी प्रवाशी वाहतूक करते. ती सोमवारी सकाळी प्रवाशी घेऊन कल्याणहून मुरबाडच्या दिशेने निघाली होती. अपघात घडला तेव्हा त्यात चालकासह ११ ते १२ जण प्रवास करत होते. या कारला समोरून येणाऱ्या भरधाव वेगातील सिमेंट मिक्सर ट्रकने जोरदार धडक झाली. मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख यांनी ही माहिती दिली. ओव्हरटेक करत असताना हा अपघात झाल्याची माहिती आहे.

### मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला शोक

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेवर शोक व्यक्त केला आहे. राष्ट्रीय महामार्ग ६१ वर कल्याणजवळ दोन वाहनांची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. स्थानिक प्रशासनाशी आम्ही संपर्कात आहोत, असे ते मुख्यमंत्री म्हणाले.

# आशाताईंना राज्य सरकारची अनोखी आदरांजली

## मंत्रिमंडळ बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय..

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत सोमवारी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, मुंबईत आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. त्यामध्ये, आशाताईंच्या नावाने संगीत अकॅडमीसह पदभरती प्रक्रियेत सुधारणा, मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठाच्या स्थापनेसह आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

आशा भोसले यांच्या निधनानंतर मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्यावतीने मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करणार आहे. राज्य सरकारकडे वांद्रे-अंधेरी दरम्यान हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची आशा भोसले यांनी मागणी केली होती. आता, आशा भोसले यांच्या नावाने स्मारक करायच का? असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मुद्दा उपस्थित केला.

### मंत्रिमंडळ बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय..

1. *शासन सेवेतील पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करणार. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून कृती आराखडा.*
2. *कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडीयमच्या आरक्षणात बदल करून वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरीत करण्याचा निर्णय.*
3. *मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी*
4. *नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी.*
5. *राज्यातील वैद्यकीय शिक्षण प्रणाली, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार. सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी कडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्य उपलब्ध होणार.*
6. *नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्हयांचा समावेश.*
7. *वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार.*

## इराण भारतीय जहाजांना होर्मुझ पार करण्यास मदत करणार

**तेल अवीव :** इराणने म्हटले आहे की, तो होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना सुरक्षितपणे जाण्यासाठी मदत करेल. इराणचे भारतातील राजदूत, मोहम्मद फताहली यांनी सांगितले की, या विषयावर इराण आणि भारत यांच्यात चांगली चर्चा सुरू आहे. ते म्हणाले की, सध्याचा तणाव असूनही भारतीय जहाजांना मार्गावरून कोणत्याही अडचणींशिवाय प्रवास करता यावा, अशी इराणची इच्छा आहे. त्यामुळे, इराण नवी दिल्लीला मदत करण्यास तयार आहे. यापूर्वी, इराणने अमेरिकेला इशारा दिला होता की, जर होर्मुझची सामुद्रधुनी आणि तेथील बंदरांना लक्ष्य केले.

## घामाचे दाम मिळेना अन् हक्काचा बोनसही थकला!

### पगारवाढीसाठी हजारो कामगार रस्त्यावर

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या नोएडा फेज-२ या औद्योगिक क्षेत्रात सोमवारी सकाळी प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले. वेतनवाढीच्या प्रलंबित मागणीसाठी हजारो कामगार रस्त्यावर उतरले, मात्र या आंदोलनाला अचानक हिंसक वळण लागले. या अनपेक्षित उद्रेकामुळे परिसरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असून, मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

सोमवारी सकाळी फेज-२ परिसरात मोठ्या संख्येने कामगार एकत्र जमले होते. सुरुवातीला घोषणाबाजीने सुरू झालेल्या या आंदोलनाचे रूपांतर अल्पावधीतच हिंसक संघर्षात झाले. आंदोलक कामगारांनी परिसरात उभी असलेली वाहने आणि कंपन्यांच्या मालमत्तेची तोडफफोड करण्यास सुरुवात केली. संतापलेल्या जमावाकडून झालेल्या बेछूट दगडफफेकीमुळे रस्त्यांवर दहशतीचे वातावरण निर्माण झाले. या गोंधळामुळे नोएडाच्या या औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली.

### भारतीय हवामान विभागाकडून पहिला अंदाज जाहीर

# यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस!

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारतीय हवामान विभागाकडून १३ एप्रिल रोजी नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पर्जन्य अंदाज जाहीर करण्यात आला आहे. सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम रविचंद्रन यांनी यावर्षीच्या मान्सूनचा पहिला अंदाज जाहीर केला आहे.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या उपस्थित नवी दिल्लीत सोमवारी पत्रकार परिषद पार पडली. यामध्ये नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यामध्ये सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जेव्हा पावसाचे प्रमाण ९० टक्के ते ९५ टक्के असते त्यावेळी सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात येतो.



### जून, जुलै, ऑगस्टपर्यंत पावसाची स्थिती सामान्य

■ भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या माहितीनुसार, जून, जुलै, ऑगस्ट पर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहणार आहे. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात एल निनो परिस्थिती असणार आहे. तर जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये भारतीय समुद्रात सकारात्मक परिस्थिती असल्याची माहिती डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली आहे. त्यामुळे एल निनोच्या नकारात्मक परिणामाला भारतीय समुद्रातील सकारात्मक परिस्थिती अनुकूल करेल. त्यामुळे एल निनोचा परिणाम जाणवणार नाही असे डॉ. एम. मोहापात्रा यांनी सांगितले आहे.

### शेतकऱ्यांची चिंता वाढणार!

■ काही खाजगी वेधशाळांनी यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहण्याची शक्यता वर्तवली होती. या पार्श्वभूमीवर, अधिकृत सरकारी यंत्रणा म्हणजे भारतीय हवामान विभाग काय अंदाज मांडणार याकडे देशातील बळीराजा आणि सर्वसामान्यांचे डोळे लागले होते. अखेर आज भारतीय हवामान विभागाने मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा अंदाज अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

## आता ट्रम्प आणि पोप आमने-सामने!

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराणमधील युद्धविरामाची चर्चा फिस्कटल्यानंतर पुन्हा एकदा संपूर्ण जगातील तणाव वाढला आहे. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण युद्धाचे वर्णन 'ईश्वरी संमती लाभलेले' असे केले; परंतु पोप यांनी मात्र 'ईश्वर कोणत्याही संघर्षाला आशीर्वाद देत नाही,' असा ठाम पवित्रा घेतला. यानंतर आता ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पोप यांनाच प्रत्युत्तर दिल्याचे मानले जात आहे. यामुळे राष्ट्राध्यक्षांची सत्ता आणि पोप यांचा नैतिक अधिकार यांच्यात एक संघर्ष निर्माण झाला आहे.

ट्रम्प यांच्या मते, इराण युद्धासाठी देवाने त्यांची निवड केली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले होते की, माझा असा विश्वास आहे की इराणविरुद्धच्या युद्धात देव अमेरिकेच्या बाजूने आहे. यानंतर त्यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोपची खिल्ली उडवली.

## खरातला सात दिवसांची न्यायालयीन कोठडी

### एसआयटी आता चौथ्या गुन्ह्यात घेणार ताबा

**नाशिक, वृत्तसंस्था :**

महिला लैंगिक शोषण व आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तुरुंगाची हवा खाणाऱ्या भोंदू अशोक खरातला सोमवारी कोर्टाने सात दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कोर्टाने त्याच्यावर दाखल तिसऱ्या गुन्ह्यात त्याला ही कोठडी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास करणारे विशेष तपास पथक आता त्याला चौथ्या गुन्ह्याप्रकरणी ताब्यात घेणार आहेत. सरकारी वकिलांनी या प्रकरणी त्याच्या पोलिस कोठडीची मागणी केली आहे.

अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण व आर्थिक फसवणूक केल्याचे आरोप आहेत. या प्रकरणी त्याच्यावर तब्बल १६ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ८ गुन्हे हे लैंगिक शोषणाचे आहेत. विशेष तपास पथक या सर्वच प्रकरणाचा कसून तपास करत आहे. आज त्याची पोलिस कोठडी संपत असल्यामुळे त्याला व्हिडिओ कॉन्फरंसिंगच्या



माध्यमातून कोर्टापुढे हजर करण्यात आले. सुनावणीला सुरुवात होताच, न्यायाधीशांनी खरातला त्याचे नाव विचारले. त्यानंतर पोलिसांविरोधात मारहाणीची काही तक्रार आहे का? अशी विचारणाही केली. त्यावर खरातने हात जोडत नकार दर्शवला.

यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीनंतर कोर्टाने तिसऱ्या गुन्ह्यात अशोक खरातला सात दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर सरकारी पक्षाने तिसऱ्या गुन्ह्यातील पोलिस कोठडीचा हक्क अबाधित राखून खरातला चौथ्या गुन्ह्यात वर्ग करण्याची परवानगी मागितली. त्यावर कोर्टाने वैद्यकीय तपासणीनंतर त्याचा ताबा घेण्याची सूचना केली. आता वैद्यकीय तपासणीनंतर पुन्हा मंगळवारी त्याला कोर्टात हजर करण्याची शक्यता आहे. त्यामुळे उद्याही त्याला ऑनलाईन पद्धतीने कोर्टापुढे हजर केले जाण्याची शक्यता आहे.

### ईडीची नाशिक, पुणे, शिर्डीत छापेमारी

■ ईडीने या प्रकरणी अशोक खरातच्या नाशिक येथे पाच, पुण्यात तीन व शिर्डी परिसरातील तीन ठिकाणांवर छापेमारी केली आहे. नाशिकच्या तृप्ताबाला निवासस्थानीही ईडीने छापेमारी केली आहे. तिथे खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. शिर्डी परिसरातील समता पतसंस्थेच्या राहता येथील शाखेत ईडीचे अधिकारी पोहोचलेत. ते तिथे अशोक खरात नॉमिनी असलेल्या १०० खात्यांची चौकशी करत आहेत. या खात्यांमधून तब्बल ६० कोटींहून अधिक रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती आहे.

## न्यूज ब्रीफ

### कब्रस्तानासाठी आ.कायंदे यांच्याकडून निधी



**साखरखेर्डा :** आ. मनोज कायंदे यांच्या विशेष निधीतून मुस्लिम कब्रस्तानासाठी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. साखरखेर्डा येथील मुस्लिम तरुणांनी युवा कार्यकर्ते आशिष पोंधे यांच्या माध्यमातून मागील वर्षी आ. मनोज कायंदे यांच्याकडे मुस्लिम कब्रस्तानासाठी व कब्रस्तानाचा विकास करण्यासाठी भरीव निधीची मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत आमदार निधीतील विशेष निधी म्हणून १० लाख रुपये मंजूर करण्यात आले.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**बुलढाणा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक आनंद नगर येथे भीमशक्ती संघटनेच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुणाईने भरभरून रक्तदानात सहभाग नोंदवला. रक्तसंकलन टीमने परिश्रम घेतले. शिवसेना उबाठा प्रवक्ता जयश्री शेळके यांनी शिबिरास भेट देऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. यावेळी भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रतिक जाधव, जयंती समितीचे अध्यक्ष भुषण जाधव, उपाध्यक्ष समीर खिल्लारे, कुणाल जाधव उपस्थित होते.

### प्रगतिशील शेतकरी सतीश गुप्त यांचा प्रयोग यशस्वी

# चिखलीच्या माळरानावर फुलली हापूस आंब्याची बाग

**अंकुश पाटील**

**चिखली :** पारंपरिक शेती परवडत नसल्याने जिल्ह्यातील उपक्रमशील शेतकरी आता नवनवीन प्रयोग करतांना दिसत आहेत. चिखली येथील सतीश गुप्त यांनी इच्छाशक्तीच्या जोरावर माळरानावर कोकणचा राजा हापूस आंब्याची बाग फुलवली आहे.

प्रगतीशील आधुनिक शेतकरी सतीश गुप्त यांनी पाच एकर खडकाळ जमिनीवर आंब्याची लागवड करण्याचे ठरवले. पाच वर्षांपूर्वी त्यांनी सेंद्रिय पद्धतीने आंब्याच्या रोपांची लागवड केली. ज्यामध्ये ८० टक्के झाडे ही हापूस तर २० टक्के इतर जातीच्या आंब्यांचा समावेश आहे. पाच वर्षांनंतर त्यांच्या या मेहनतीला मूर्त स्वरूप आले आहे. या आठवड्यापासून त्यांना



आंब्याचे उत्पन्न सुरू होणार आहे. आजपर्यंत त्यांना दहा लाख रुपये उत्पादन खर्च आला. यावर्षीपासून त्यांना चढत्याक्रमाने लाखोंचे उत्पन्न अपेक्षित आहे. त्यांनी या बागेत विषमुक्त शेतीचा मंत्र जपला आहे. रासायनिक खतांना पूर्णपणे फाटा देऊन केवळ शेणखत, गोमूत्र, गूळ, बेसण आणि जिवामृताचा वापर करून ही झाडे वाढवली आहेत. यामुळे या आंब्यांचा स्वाद, नैसर्गिक सुगंध आणि चव टिकून राहणार आहे. आरोग्याच्यादृष्टीने हे आंबे अत्यंत लाभदायी ठरणार आहेत.

आमराईत हापूस आंब्यासोबतच केसर, तोतापुरी आणि नीलम अशा विविध आठ जातींच्या आंब्यांचे उत्पादन घेतले जात आहे.प्रबळ इच्छाशक्ती आणि मेहनत करण्याची तयारी असल्यास खडकाला देखील पाझर फुटतो. याचे उत्तम उदाहरण म्हणता म्हणून खडकाळ जमिनीवर उभी राहिलेली आंब्याची ही बाग म्हणता येईल. इतर शेतकऱ्यांनी देखील कमी खर्चात नवनवीन प्रयोग केल्यास आपली आर्थिक उन्नती साधता येईल.बुलढाणा जिल्हा बिजोत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. प्रामुख्याने घाटावरील तालुक्यांत आंबा पिकासाठी पोषक वातावरण आहे. १२०० हेक्टरवर आधीच आंब्याची लागवड आहे. तर उत्पादनशील लागवड ही ५४६ हेक्टर एवढी आहे. सतीश गुप्त या शेतकऱ्याप्रमाणे इतर शेतकऱ्यांनी शासकीय योजनेचा लाभ घेऊन फळबाग लागवड करावी. आपली आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

#### हापूस आंब्याची वैशिष्ट्ये

- हापूस आंबा दिसायला आकर्षक, गडद पिवळ्या, केशरी रंगाचा असतो. त्याचा आकार लंबवर्तुळाकार असतो. हापूसमध्ये ५५ हून अधिक रासायनिक संयुगे असल्यामुळे त्याचा सुगंध अत्यंत मोहक असतो. हापूसचा गर अतिशय मऊ, लोण्यासारखा आणि तंतूविरहित असतो. चवीला तो गोड असून त्यात किंचित आंबटपणाचा असतो.हा आंबा ए, सी आणि इ व्हिटॅमिनचा चांगला स्त्रोत आहे. हे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. हापूसचा वापर आमरस, आंबापोळी, आम्रखंड, आईस्क्रीम आणि शेक बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. हापूस आंब्याचा हंगाम साधारणपणे मार्च ते जून महिन्यापर्यंत असतो.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे : शैलेश सावजी

**बुलढाणा/प्रतिनिधी**



कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी या संतवाणीनुसार शेतकरी हाच खरा विठ्ठल असल्याची भावना व्यक्त करत, शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी १३ एप्रिल रोजी केली.

जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची भेट घेऊन सावजी यांनी त्यांना विठ्ठलाची मूर्ती भेट दिली. यामागील उद्देश म्हणजे शेतीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला विठ्ठल मानून त्याच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात, हा होता. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांच्या समस्येकडे लक्ष वेधले. अनेक ठिकाणी शेतरस्त्यांबाबत वाद निर्माण झाले असून, हे प्रकरण तहसील कार्यालयात दीर्घकाळ प्रलंबित आहेत. परिणामी शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यास अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे शेतीच्या कामांवरही विपरित परिणाम होत आहे. सावजी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करताना सांगितले की, ज्या पद्धतीने दिवाणी व फौजदारी न्यायालयात वेळेत निकाल देणे अपेक्षित असते, त्याचप्रमाणे महसूल विभागानेही प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. तहसीलस्तरावर रस्त्यांच्या वादांबाबत निर्णय घेण्यात होत असलेला विलंब हा शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक ठरत आहे. त्यामुळे शेतरस्त्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणांची तातडीने दखल घेऊन ते निकाली काढावेत, तसेच विनाकारण विलंब करणाऱ्या संबंधित तहसीलदारांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. जिल्हाधिकाऱ्यांनीही या मागणीची दखल घेत संबंधित यंत्रणेला योग्य त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले.

## शोभायात्रेदरम्यान विविध देखाव्यांनी वेधले लक्ष

**बुलढाणा/प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची जयंती शनिवारी बुलढाणा नगरीत पारंपारिक उत्साहात साजरी करण्यात आली. या शोभायात्रेदरम्यान विविध देखाव्यांनी लक्ष वेधले. महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, राजमाता माँ जिजाऊ व बाल शिवाजी, घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,नायायण मेघाजी लोखंडे, स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांच्या वेशभूषांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. उत्सव समिती पदाधिकारी, सदस्य तसेच महिलांनी पारंपरिक पोशाखासह फेटा परिधान करून शोभायात्रेत सहभाग नोंदवला.

संगम चौकातील दिमाखदार व आकर्षक अश्या शिवस्मारक येथून शनिवारी संध्याकाळी या मिरवणुकीला थाटात प्रारंभ झाला. प्रारंभी आ.संजय गायकवाड, नगराध्यक्ष पूजा गायकवाड तसेच महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गोपाल निळकंठ, कार्याध्यक्ष नीलेश गोरे, सचिव पी. एन. बोदडे, उपाध्यक्ष शंकर राऊत, महात्मा ज्योतिबा फुले मंडळाचे अध्यक्ष प्रकाश वानेरे, सचिव सुरेश चौधरी, दलितमित्र माधवराव हुडेकर, ॲड.शरद राखोंडे, माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे, प्रसिध्दी प्रमुख हर्षनंदन वाघ आदींच्या मार्गदर्शनात या शोभायात्रेला सुरुवात झाली. यावेळी पवन सोनारे, कृष्णकांत बगाडे, जगदीश मानतकर, आशिष लहासे, वैभव इंगळे, प्रदीप डांगे, नीलेश दांडगे, वैभव लाड, विशाल सुरोशे, प्रशांत मोरे, अनंत लहासे, राजेश मोहोळे, अंबादास गोरे, रमेश उबाळे, राजू गोरे, प्रकाश राऊत, मनीष पवार, राजू पवार, विशाल खंडारे, नीलेश गोरे, स्वरूप घोंगडे, आकाश फाळके, तसेच सावता मंडळाचे सचिव रमेश हूडेकर, महिला समितीच्या अध्यक्षा वंदना गोपाल निळकंठ, प्रीती खंडारे, प्रीती डांगे, छाया राऊत, कीर्ती चौधरी, मनीषा चौधरी, सुषमा खाडे, विशाखा गोरे, योगिता इंगळे, जया चौधरी, मनीषा मोरे, ज्योती रोठे, सुचिता वानखडे, अनिल कोळसे, विजया कोळसे, तसेच उत्सव समितीचे पदाधिकारी, इतर शहरातील समाजबांधव उपस्थित होते. शहरातील संगम चौक जयस्तंभ चौकमार्गे प्रमुख मार्गावरून मार्ग क्रमाण करीत निघालेल्या या मिरवणुकीची रात्री उशिरा थाटात सांगता झाली.




#### महापुरुषांना अभिवादन

- प्रारंभी शनिवारी सकाळी महात्मा फुले प्राथमिक शाळेत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बसस्थानक, जयस्तंभ चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मलकापूर रोड, महात्मा फुले मार्केट तसेच जिल्हा न्यायालय परिसरातील महात्मा फुले चौक येथील महात्मा फुले यांच्या प्रतिमेसह विविध महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.




### राशीभविष्य

- **मेष** : नातेवाईकांच्या सहवासात मन रमेल. खर्च मर्यादित राहील. आर्थिक गणित जमेल.
- **वृषभ** : पाळला जाणार असेल तरच शब्द द्या. कोणालाही जामीन राहू नका. जुगारापासून दूर रहा.
- **मिथुन** : घरगुती मतभेद मिटवाल. भावंडं सहकार्य करतील. अचानक धनलाभ होईल.
- **कर्क** : संततीचे हट्ट वाढतील. काही गोष्टी मनाविरुद्ध घडतील. प्रवास सुखदायक होतील.
- **सिंह** : व्यापारात अचानक वाढती धनप्राप्ती होईल. नवीन कामे मिळतील. तब्येतीत सुधारणा होईल.
- **कन्या** : कोणावरही अवलंबून राहू नका. व्यसनापासून दूर रहा. प्रवास कार्यसाधक होतील.
- **तूळ** : सहकारी मदत करतील. पैसा, प्रसिद्धीचे योग आहेत. फार दगदग करू नका.
- **वृश्चिक** : व्यवसायात भरभराट होईल. जुनी कटकटीची उधारी वसूल होईल. प्रवासात जपून असावे.
- **धनु** : कौटुंबिक सुख मिळेल. चारचौघात संततीचे कौतुक होईल. तब्येतीस जपावे.
- **मकर** : भावंडाशी योग्य संवाद साधणे गरजेचे. सहकारी अडचणी निर्माण करतील. सत्संगाचा लाभ होईल.
- **कुंभ** : पैशाची उपलब्धता वाढेल. नोकरीत बढती मिळण्याचा योग. अडचणीच्या कामातून मुक्त व्हाल.
- **मीन** : इतरांचे सल्ले काही मर्यादेपर्यंतच स्वीकारा. मानसिक समतोल राखावा. खर्चात वाढ होईल.

### दिनविशेष

**१४ एप्रिल**

- **१९४४** : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर विस्फोट. ३०० ठार.
- **१९५०** : तत्वज्ञ श्री. रमण महर्षी यांचा मृत्यू.
- **२०१३** : प्रसिद्ध उद्योगपती राम प्रसाद गोयंका यांचे निधन.
- **२०१४** : हिंदी महासागरात बुडालेल्या मलेशियाच्या विमानाचा माग काढण्यासाठी पाण्याखाली काम करणाऱ्या ड्रोनचा वापर होणार असल्याची माहिती.
- **२०१६** : हैदराबाद विद्यापीठात आत्महत्या करणाऱ्या रोहित वेमुला यांच्या आई व भावाचा बौध्द धर्मात प्रवेश.

### चित्र-विचित्र — गोष्ट एका ट्रेनची

उत्तर कोरियाचा हुकुमशाह किम जोंग उन नेहमीच वेगवेगळी फर्माने काढून जनतेवर विचित्र नियम लागू करत असतो. त्यामुळेच किम जोंग उनबाबतही अधिक जाणून घेण्यामध्ये अनेकांना रस वाटतो.



किम जोंग उनचे नाव आले की, विशेष चर्चा होते ती म्हणजे त्याच्या बुलेटप्रुफ ट्रेनची. मध्यंतरीच अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी युक्रेन दौऱ्यावर ट्रेनने प्रवास केला होता. त्यानंतर लोक या ट्रेनची तुलना किम जोंग उनच्या ट्रेनशी करू लागले. मीडिया रिपोर्टनुसार, त्याची बुलेटप्रुफ ट्रेन अतिशय आलिशान असून शाही महालाप्रमाणे आहे. यामध्ये सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा आहेत. जगातील सर्वात महागड्या दारूपासून उत्तमोत्तम खाद्यपदार्थ आणि इतर सुविधा या ट्रेनमध्ये आहेत. उत्तर कोरियाचा हुकुमशाह किम जोंग उन फार कमी वेळा प्रवास करतो. पण करतो तेव्हा रॉयल बुलेटप्रूफ ट्रेनने प्रवास करतो. २०१९ मध्ये तो रॉयल ट्रेनने व्हिएतनामला पोहोचला होता. याआधी त्याने याच ट्रेनने चीनचा दौराही केला आहे. ही ट्रेन बुलेटप्रूफ असून सामान्य ट्रेनच्या तुलनेत वजनाने खूप जड आहे. यामध्ये एखाद्या राजवाड्याप्रमाणे सोयी-सुविधा आहेत. ट्रेनमध्ये रॉयल बेडरूमची व्यवस्था आहे. यामध्ये अन्न, दारू आणि औषधे यांचा साठा असतो; मात्र बुलेटप्रुफ आणि वजनाने खूप जड असल्याने ती वेगाने धावू शकत नाही. खास बाब म्हणजे ही ट्रेन इतर गाड्यांप्रमाणे सामान्य स्थानकांवर थांबत नाही. सुरक्षेत कोणताही धोका नसावा म्हणून या रॉयल ट्रेनसाठी स्वतंत्र स्थानके आहेत.

### माहीत आहे? — जाणा आगपेट्यांचा इतिहास

कोणे एके काळी आग निर्माण करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे दगड एकमेकांवर घासावे लागायचे. मात्र जॉन वॉकरने १८२७ मध्ये आगपेटी तयार केली आणि हे कष्ट वाचले. त्याने लाकडाच्या तुकड्यावर सरस, स्टार्च, एंटीमनी सल्फाईड, पोटॅशियम क्लोरेट लावून काड्या तयार केल्या. परंतु सुरक्षित काड्या १८४४ मध्ये स्वीडनच्या ई पोश यांनी बनवल्या. या काडया दोन प्रकारच्या असतात. पहिल्या प्रकारच्या काड्यांना घर्षण काड्या म्हणतात. यात आधी काडीच्या एक चतुर्थांश भागाला विरघळलेल्या मेण किंवा गंधकमध्ये बुडवलं जातं. नंतर फॉस्फरस ट्रायसल्फाईडचं मिश्रण लावलं जातं. त्यावर एंटीमनी सल्फाईड आणि पोटॅशियम क्लोरेटचं मिश्रणं लावलं जातं. घर्षणासाठी बनवलेल्या मिश्रणात काचेचा चुरा किंवा वाळू मिसळतात. पांढरा भाग रगडेपर्यंत निळा भाग जळत नाही.

दुसऱ्या प्रकारात सुरक्षित काड्या बनवल्या जातात. या काड्या आगपेटीवरील रसायनावर घासूनच पेटतात. या काड्याही आधी सांगितलेल्या काड्यांप्रमाणेच बनवतात. यात फॉस्फरस ट्रायसल्फाईडऐवजी लाल फॉस्फरस वापरलं जातं. आपल्या घरामध्ये अशाच आगपेट्यांचा वापर होतो.

### समुपदेशन — नात्यांमधली अस्वस्थता

मी विवाहित स्त्री असून ११ वर्षांपूर्वी आमचा प्रेमविवाह झाला. आम्हाला दोन मुलं आहेत. मी सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातली मुलगी तर पती श्रीमंत व्यावसायिक कुटुंबातले आहेत. लग्नानंतरच्या काही वर्षांतच त्यांनी मला नोकर समजायला सुरूवात केली. पती व्यवसायाच्या निमित्ताने कायम फिरतीवर असतात. महिन्यातले फक्त दहा दिवस ते घरी असतात. या नात्याबद्दल मला आता प्रेम वाटत नाही. माझ्या आवडीनिवडी चांगल्या नसून त्यांच्या स्टेटसप्रमाणे मी राहात नसल्याचं आता त्यांना वाटू लागलं आहे. याबाबत त्याच्याशी बोलल्याने काहीच फायदा होणार नाही. मी काय करू?

-सर्वात महत्त्वाचं म्हणजे आता स्वत:ची काळजी घेण्याची वेळ आलेली आहे. स्वयंपाक, घरकामसाठी बाई लाव. यामुळे तुला नव्याने करीअर सुरू करता येईल. दुसरं म्हणजे तुझ्या या भावना पतीपर्यंत पोहोचव. करीअर सुरू करणं हे तुझ्यासाठी किती गरजेचं आहे हे त्याला सांग. व्यक्तिमत्त्व विकासाच्या वर्गांना जाता येईल. आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी तसंच व्यक्तिमत्त्वाला धार आणण्यासाठी समुपदेशकाची मदत घे.

### पंचांग

**मंगळवार, १४ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८ चैत्र कृ. १२ **(डॉ. आंबेडकर जयंती)**, चंद्रराशी : कुंभ, नक्षत्र : शततारका, योग : शुक्ल, सूर्योदय ६.२५, सूर्यास्त ६.५४

### फॉरवर्ड्स

**ज़िंदग़ी में हर मोड़ अपनीं मर्ज़ी क़ा नहीं होतां ज़नाब...**

**कभी वक़्त रास्ता चुनता हैं तों क़भी हालात मंज़िल बदल देतें हैं...!**

### फिटनेस फंडा

✻ बास्केटबॉल आवडत असेल तर यापेक्षा उत्तम दुसरा कोणताही व्यायाम नाही. जलद हाचलालींमुळे तुम्ही बऱ्याच कॅलरी खर्च करता.

✻ एअरोबिक्स व्यायामप्रकार करा, एअरोबिक्सचे क्लासेसही असतात. एका तासाच्या व्यायामाने ४९० कॅलरी खर्च होतात.

✻ जॉगिंग हा सुद्धा कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. चालण्यापेक्षा जॉगिंग करा. यामुळे भरपूर कॅलरी खर्च होतात. फार जोरात न धावताही तुम्ही सहज वजन कमी करू शकता. यामुळे तासाला ७५५ कॅलरी खर्च होतील.

### करिअरवाटा — फुड प्रोसेसिंगच्या क्षेत्रात...

शेतमालाची कापणी केल्यानंतर तो अधिक दिवस टिकावा, पोषणमूल्यांचा ऱ्हास होऊ नये यासाठी कार्यरत असणाऱ्या फुड प्रोसेसिंग क्षेत्रात पदव्युत्तर किंवा पदवीचे छोटे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामुळेच या विषयात रस असेल तर त्याविषयी सविस्तर जाणून घ्यावं. फुड प्रोसेसिंग आणि फुड टेक्नालॉजी यात फरक आहे. फुड प्रोसेसिंगमध्ये फळं, भाज्या आदींवर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्याचं शिक्षण दिलं जातं तर परंतु फुड टेक्नालॉजीमध्ये अधिक व्यापक आणि प्रगत ज्ञान दिलं जाते. कर्नाटकातील धारवाडच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रीकल्चरल सायन्सेस (युएएस) या विद्यापीठात फुड टेक्नालॉजीमधील बी.टेक. पदवी देणारा अभ्यासक्रम आहे.



हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना बी.टेक. (फुड टेक्नालॉजी) अशी पदवी दिली जाते. याच संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमही आहे. बंगलोर, मैसूर आणि धारवाड या तीन शैक्षणिक केंद्रांमध्ये अन्न प्रक्रिया आणि अन्न तंत्रज्ञान या विषयाचे तीन अभ्यासक्रम आहेत. यासंबंधीचा कोणताही अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. स्वत:चा व्यवसाय सुद्धा सुरू करता येतो.

### खेचाखेची — पाण्याचं विचार

**काका :** अग ए, पाहुणे येऊन अर्धा तास झाला. नुसती बोलत काय बसलीस? त्याना कमीत कमी पाण्याचं तरी विचार ना.

**काकू :** अरे हो, मी विसरलेच बघा.

(पाहुण्यांना)
तुमच्याकडे पाणी सकाळी येतं की दुपारी?

### वेगळं काही

राजस्थानातल्या जोधपूरमधल्या न्यायालयात गायीसंदर्भातला खटला चर्चेत आहे. शिक्षक असलेले श्याम सिंह आणि कॉँस्टेबल ओमप्रकाश यांच्यात गायीवरच्या मालकी हक्कावरून वाद सुरू आहे. पोलिसांनी मध्यस्थी करून हे प्रकरण सोडवण्यासाठी प्रयत्न केले. पण हा वाद काही मिटू शकला नाही. हा वाद मिटवण्यासाठी पोलीस निरीक्षकांनी गायीला मधोमध उभं केलं. एका बाजूला श्याम सिंह तर दुसऱ्या बाजूला ओमप्रकाशला उभं करण्यात आलं. त्यांना गायीला हाक मारायला सांगितलं. मात्र दोघांच्याही हाकेला गायीने प्रतिसाद न दिल्याने सगळं मुसळ केरात केलं. त्यानंतर ही गायस्वत:चं दूध पित असल्याचा दावा एका पक्षाने केला.

### फॅशन पॅशन — बाथरोबची खरेदी?

बाथरोब युवती आणि महिलांच्या नित्याच्या वापरात असतो. पण तो खरेदी करताना काही बाबींचा विचार करायला हवा. याविषयी...



✻ बाथरोब निवडताना महत्त्वाची गोष्ट असते ती कंफर्टची. बाथरोब आरामदायी असणं गरजेचं असतं. ✻ बाथरोब खरेदी करताना लांबी किती असावी हे ठरवून घ्यावं. गुडघ्यापर्यंत किंवा घोट्यापर्यंत लांबी असणारे बाथरोब उपलब्ध असतात. बाथरोबच्या स्लीव्हज वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. आपल्या गरजेनुसार योग्य बाथरोब निवडावा.✻ बाथरोबची निवड करताना ऋतूमानाचाही विचार करावा. थंडीसाठी गरम मायक्रो फायबर्स असणारा बाथरोब निवडावा तर उन्हाळ्यात कॉटन किंवा सॅटिनच्या बाथरोबची निवड योग्य ठरते. ✻ फिरायला जाण्यापूर्वी बाथरोबची खरेदी करणार असाल तर पॉकेट असणारा बाथरोब निवडावा. यात काही वस्तू ठेवता येतात. ✻ बाथरोबमध्ये मुख्यत: दोन स्टाईल असतात. एक किमोनो आणि दुसरी शॉल कॉलर स्टाईल. किमोनो स्पासाठी वापरला जातो. ✻ पुरुषांसाठी हूड स्टाईल बाथरोब ट्रेंडमध्ये आहेत. ✻ बाथरोबचे वैविध्यपूर्ण पॅटर्न्स वापरुन बघण्यास वाव असतो.

दैनिक महाभूमि
dainikmahabhoomi@gmail.com
मंगळवार, १४ एप्रिल २०२६

# बुलढाणा भूमि




**हवामान अंदाज**

सूर्योदय : ६.२१ सकाळी
सूर्यास्त : ६.३९ सायं.
तापमान
कमाल : ३६°
किमान : २३°

**दखल...**

### ऋण निर्देश . !!

सर्व सामान्यांचे हीत
डोळ्यापुढे ठेवून गडे
देशाच्या संविधानाचे
लिखाण केले गडे .. !
सर्वांना मिळेल समान संधी
धोरण असे स्विकारले
लोकशाहीला हेच अभिप्रेत
हे त्यांनी हो जाणले ..
समता बंधुता एकतेचे
ज्यांनी आम्हास दिले धडे
त्या महामानवापूढे आज
नतमस्तक होऊ गडे .. !

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

**न्यूज ब्रीफ**

### हरिणचा पाण्यात बुडून मृत्यू

**बुलढाणा :** उन्हाळ्यात वन्य प्राण्यांना जंगलातच पाणी मिळावे म्हणून वनविभागाकडून शेकडो नैसर्गिक व कृत्रीम पाणवठ्यांची निर्मिती केल्याचा दावा केला जातो. मात्र हा दावा किती फोल असल्याचा प्रकार बुलढाणा विभागाच्या गिरडा वन बिटमध्ये उघडकीस आला आहे. जंगलात पाणी नसल्याने तहानेने व्याकूळ झालेले एक हरिण पाण्याच्या शोधार्थ गाव वस्तीकडे आले. एका विहिरीत पाणी दिसल्याने त्याने विहिरीत उडी मारली. तहान भागल्यानंतर विहिरीबाहेर येता न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना सोमवारी दुपारी १२ वाजता घडली. गिरडा शिवारातील शेतकरी दिलीप गायकवाड यांच्या शेतातील विहिरीत हरिण मृतावस्थेत आढळून आले. बुलढाणा वनविभागाच्या अख्त्यारित येणाऱ्या गिरडा वन बिटमध्ये वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था नसल्याचे या घटनेवरून अधोरेखित होते.

### शेतमाल खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा

**बुलढाणा :** शेतकऱ्यांच्या घरात पिकवलेला शेतमाल पडून असताना, बारदाण्याच्या तुटवड्याचे कारण देत शासकीय हमीभाव केंद्रे बंद ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या गंभीर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली असून, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांची भेट घेऊन तातडीने खरेदी केंद्रे सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी दिला आहे. गेल्या दीड-दोन महिन्यांपूर्वीही शेतकऱ्यांच्या घरातला शेवटचा दाणा खरेदी होईपर्यंत हमीभाव केंद्रे सुरू ठेवण्याची मागणी शिवसेनेने केली होती. त्यावेळी शासनाने काही प्रमाणात का होईना, पण केंद्रे पुन्हा सुरू केली होती. मात्र, आता बारदाणा उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून ही केंद्रे पुन्हा बंद करण्यात आली आहेत. ऐन हंगामात शेतमाल घरात पडून असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आआज, १३ एप्रिल २०२६ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांची भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, जर येत्या काळात खरेदी केंद्रे पूर्ववत सुरू झाली नाहीत, तर शिवसेना शेतकऱ्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा स्पष्ट इशारा बुधवत यांनी दिला.

महामानवाच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाभर प्रबोधनाचा जागर..

# उध्दरली कोटी कुळे, भिमा तुझ्या जन्मामुळे..!





**बुलढाणा/ प्रतिनिधी**

लाखो वर्ष सामाजिक विषमतेचे चटके सोसणाऱ्या करोडो जिवांना तत्कालीन विषमतावादी समाज व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त करून माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मंगळवारी साजरी होत आहे. यानिमित्त जिल्हाभर विविध कार्यक्रमातून प्रबोधनाचा जागर होणार आहे. ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने दिवसभर कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. यानिमित्ताने जिल्हा निळ्या व पंचशील ध्वजाने सजला असून, सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

क्रांतीसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीच्यावतीने शहरात ११ एप्रीलपासून प्रबोधनात्मक कार्यक्रम होत आहेत.

मंगळवारी सकाळी गांधी भवन प्रांगणात सकाळी आठ वाजता भीम पाळणा होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला माजी सैनिक, पोलीस बँड पथक, समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात येणार आहे. त्यानंतर शहरातील विविध मार्गाने रॅली निघणार आहे. तर दुपारी चार वाजता शहरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तत्पूर्वी भिम जयंतीच्या निमित्ताने विविध सामाजिक संघटना, शाळा, महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

### भिम जयंतीच्या पूर्वसंध्येला अभिवादन कार्यक्रम

■ बुलढाणा बसस्थानकावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला एस.टी.कर्मचारी व सर्वधर्मिय नागरिकांकडून क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भैय्यासाहेब पाटील, बाबासाहेब जाधव, सुभाष लहाने, रणजित राजपूत, स्थानकप्रमुख कृष्ण पवार आदी उपस्थित होते.

### जयस्तंभ चौकात फटाक्यांची आतषबाजी

■ दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जयस्तंभ चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व शहरातील भीम अनुयायींच्यावतीने मध्यरात्री फटाक्यांची आतषबाजी करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी युवकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जयघोष करीत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी पेढे वाटप करण्यात आले.

# पैशाच्या वादातून चुलत भावांवर चाकू हल्ला

**मलकापूर पांग्रा / प्रतिनिधी**



दुचाकी आणि बीसीच्या पैशांवरून झालेल्या वादातून सख्ख्या चुलत भावांवर चाकूने हल्ला करण्यात आला. ही घटना ११ एप्रीलच्या रात्री साडेदहाच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयासमोर घडली. हल्ल्यात तिघे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे.

आरोपी नाजिम खा शौकत खा पठाण आणि मोहसीन खा शौकत पठाण यांचा त्यांचे चुलत भाऊ फिरोज खान रजाखा पठाण, अफरोज खा रजा खा पठाण आणि साहिल खान मेहराज खान पठाण यांच्यासोबत दुचाकी आणि बीसीच्या पैशांवरून वाद सुरू होता. हा वाद विकोपाला जाऊन शिवीगाळ आणि जीवे मारण्याच्या धमक्यांपर्यंत पोहोचला. वाद शांत करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच, अचानकपणे नाजिम खा शौकत खा पठाण आणि मोहसीन खान शौकत खा पठाण यांनी फिरोज खान रजाखा पठाण, साहिल खान मेहराज खान पठाण आणि अफरोज खान उर्फ रईस खा रजा खा पठाण यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात त्यांनी दाताने चावा घेऊन पोटात धारदार चाकूने भोसकून तिघांना गंभीर जखमी केले.

फिर्यादी साहिल खान मेहराज खान पठाण यांच्या तक्रारीवरून साखरखेर्डा पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन करेवाड यांच्या नेतृत्वात बीट जमादार निवृत्ती पोफळे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## डोणगाव येथे घरफोडी ; १ लाख ७३ हजाराचा ऐवज लंपास

**डोणगाव :** येथील वार्ड क्र २ मधील खंडोबा परिसरातील रहिवासी डॉ. गजानन प्रल्हादराव पातुरकर यांचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी एक लाख ७३ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना ९ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान घडली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ गजानन पातुरकर हे घराला घराला कुलूप बाहेरगावी गेले होते. याचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्याने घराला लावलेले कुलूप तोडून घरात प्रवेश केला. व घरातील बेड रुममधील कपाटातील एक सोन्याची अंगठी किंमत २१००० रुपये, एक सोन्याची अंगठी किंमत २८००० रूपये, एक लेडीज अंगठी किंमत १२००० रूपये, सोन्याचे कानातील झुमके किंमत १५००० रुपये, कानातील बास्केअरिंग वजन किंमत २७००० रूपये, कानातील रिंग किंमत ९००० रूपये, सोन्याची नथ किंमत १५०० रुपये, एक सोन्याचे गंठण किंमत ६०००० रूपये असा एकुण १,७३००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. डॉ. पातुरकर यांच्या तक्रारीवरून पोलीसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार होमगार्डचा मृत्यू

**केळवद :** शासकीय टपाल घेऊन बुलढाण्याकडे जात असताना बोलेरो पिकअपच्या धडकेत होमगार्डचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी १२ वाजता घडली. सवना येथील होमगार्ड आत्माराम वखरे हे शासकीय टपाल घेऊन बुलढाण्याकडे जात होते. दरम्यान, लघुशंकेसाठी त्यांनी आपली दुचाकी केळवद गावाजवळील आदित्य पाटील यांच्या शेताजवळ उभी केली होती. याच वेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत आत्माराम वखरे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.












# भोंदूचे काळे धन बाहेर येणार!

*सध्याच्या घडीला संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक चर्चिला जाणार विषय कोणत असेल, तर तो म्हणजे भोंदू अशोक खरातच्या शिक्षेचा! भोंदू अशोक खरात आज गजाआड असला तरी त्याच्यावरील अटकेनंतर त्याची गुन्ह्यांची जंत्री दररोज बाहेर पडत आहे. मनी लॉंड्रिंग प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून, ईडीने सोमवारी महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये 'स्वघोषित बाबा' अशोक खरातशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले. या गैरप्रकारातून मिळवलेले काळे धन बाहेर काढण्यासाठी आता ईडीची भूमिका महत्त्वाची आहे. खरतचे मूळ गाव असलेल्या नाशिकमधील पाच ठिकाणी आणि पुणे व शिर्डीमधील प्रत्येकी तीन ठिकाणी हे छापे टाकण्यात आले, असे त्यांनी सांगितले. खरत, त्याचे चार्टर्ड अकाउंटंट (सीए) प्रकाश पोफळे, खरातचे नातेवाईक यांच्या निवासी आणि व्यावसायिक जागांची तसेच सहकारी पतसंस्थांच्या काही शाखांची चौकशी केली जात आहे. नाशिक पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे, ईडीने ६ एप्रिल रोजी खरातविरुद्ध मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्या अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल केला होता. नाशिक पोलिसांनी खरातविरुद्ध खंडणी, धर्माच्या नावाखाली फसवणूक आणि अनेक महिलांना गुंगीचे औषध देऊन लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. खरात आणि त्याच्या साथीदारांनी वैयक्तिक फायद्यासाठी अवैध पैशांची हेराफेरी केली आहे का? हे शोधणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पथकाकडून विशेषतः पुरावे गोळा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वघोषित 'बाबा आणि ज्योतिषी' यांच्या कथित गुन्हेगारी कृत्यांची आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. पोलिसांनी आतापर्यंत त्याच्याविरुद्ध जवळपास डझनभर एफआयआर दाखल केले आहेत. एका विवाहित महिलेने तीन वर्षांहून अधिक काळ तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप केल्यानंतर नाशिक पोलिसांनी मार्चमध्ये या वादग्रस्त व्यक्तीला अटक केली होती. तो सध्या नाशिकच्या तुरुंगात आहे. खरातने नाशिक जिल्ह्यातील दोन सहकारी पतसंस्थांमध्ये तिसऱ्या व्यक्तींच्या नावावर अनेक बँक खाती उघडली होती. या बँक खात्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याला या खात्यांमध्ये नॉमिनी (नामांकित व्यक्ती) बनवण्यात आले होते आणि आपला मोबाईल नंबर या खात्यांशी जोडण्यात आला होता. प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे की, तो सामान्य वस्तू 'पवित्र वस्तू' म्हणून विकायचा आणि त्यांच्यात दैवी रोग बरे करण्याची शक्ती असल्याचा दावा करायचा. त्याने 'खंडणी' आणि पीडितांकडून गोळा केलेले पैसे आपल्या चार्टर्ड अकाउंटंटमार्फत विविध जमिनीच्या व्यवहारांमध्ये गुंतवले, असे सांगण्यात आले. गेल्या काही आठवड्यांत, खरातचे प्रमुख राजकारण्यांसोबतचे फोटो आणि महिलांसोबतच्या त्याच्या गुन्हेगारी कृत्यांचे कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्यामुळे महाराष्ट्रात राजकीय वाद निर्माण झाला आहे. पोलिसांच्या एसआयटीने आरोप केला आहे की, खरात 'दैवी शक्ती' असल्याचा दावा करून महिलांचे लैंगिक शोषण करायचा आणि जर त्यांनी त्याचे ऐकले नाही, तर त्यांच्या कुटुंबीयांना ठार मारण्यासाठी किंवा त्यांची बदनामी करण्यासाठी त्यांचा वापर करण्याची धमकी द्यायचा. ईडीच्या या कारवाईत अनेक मासे गळाला लागू शकतात. भोंदू अशोक खरातचे काळे धन बाहेर काढण्यासाठी ईडीने पारदर्शक आणि जलदगतीने तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे.*

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या जीवनाचा काव्यमय आलेख

समतेचे महाकाव्य हे बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ५००० कवितांचा काढण्याचा अनोखा आणि स्पृहणीय विचार उपजिल्हाधिकारी राजेश खवले यांच्या संकल्पनेतून समोर आला. राजेश खवले यांच्या या संकल्पनेला मूर्त रूप देऊन साकार करण्यासाठी उपशिक्षणाधिकारी प्रकाश अंधारे, तहसीलदार विजय लोखंडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दोड, तहसिलदार राहुल तायडे आणि तहसीलदार प्रताप वाघमारे अश्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांसह अकोला जिल्हाधिकारी कार्यालय कर्मचारी झटून कामाला लागले. ज.वि.पवार, प्रा.डॉ.भास्कर पाटील आणि प्रकाश अंधारे यांच्याकडे संपादनाची धुरा सोपवण्यात आली. जगात आज पर्यंत कोणत्याही महापुरुषाच्या जीवनावर ५००० कवितांचा संग्रह कोणत्याही भाषेत आणि देशात साकारला गेल्याची नोंद आढळत नाही. हा विश्वविक्रम अकोला येथील प्रशासकीय अधिकारी पुढाकार घेऊन मराठी भाषेतून करतात. ह्यावरून त्यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या वरील नितांत श्रद्धा, मराठी भाषेवरील प्रेम आणि सांस्कृतिक भूक इत्यादी गोष्टी आपोआपच अधोरेखित होतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जुन्या-नव्या सर्व कवी पर्यंत पोहचून बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील कविता संकलित करण्यासाठी विविध साहित्यिकांची मदत घेण्यात आली आणि समतेचे महाकाव्य खंड पहिला आकारास आला. समतेचे महाकाव्य या पहिल्या खंडामध्ये १००० कवितांचा समावेश करण्यात आला

## प्रासंगिक

- किरण शिवहर डोंगरदिवे
वॉर्ड न ७, समता नगर मेहकर
मोबा. ७५८८५६५५७६

असून दुसऱ्या खंडाचे काम सुरू आहे. ४८८ पानाच्या ह्या भीम ऐवजा च्या पानापानावर डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्याचा बाबतचा स्फूर्ती झरा अखंडपणे प्रवाहित असल्याची जाणीव ह्या काव्यग्रंथाचे वाचन करत असताना होते.

**व्रज बलाने शत शतकांचा अडसर तुटला**
**मृत मातीवर नव्या मनुचा अंकुर फुटला**

या कुसुमाग्रजांच्या ओळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी किती शतकापासून चालत आलेली गुलामी मोडली हे सांगण्यासाठी अतिशय समर्पक ठरतात. कुसुमाग्रज हे केवळ बोलके कवी नव्हते त्यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या वेळी आपला सहभाग नोंदविल्याच्या नोंदी सापडल्या आहेत. हे याठिकाणी आवर्जून नमूद करावे वाटते. मंगेश पाडगावकर ह्यांची

**जयभीम जयभीम दलितांच्या नाथा** किंवा
**कालचे सारे मुके आज बोलू लागले**
**अन तुझ्या सत्यासवे शब्द तोलू लागले**

अशी भीम गौरव करणारी, अंगावर शहारा आणणारी सुरेश भट ह्यांची अजरामर भीमवंदना ह्यामुळे समतेचे महाकाव्य एका विलक्षण अनुभूती देणारा संग्रह असल्याची जाणीव करून देतो. अण्णाभाऊ साठे, भीमशाहीर वामनदादा कर्डक, वसंत बापट अश्या जुन्या दिग्गज साहित्यिकांनी बाबासाहेबांना वाहिलेली शब्दरूप मानवंदना संग्रहाची उंची आणखी वाढवते.

तू अवघ्यांची माय, वैचारिक तू बाप


असे सांगणारे 'योद्धा' हे डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांना समर्पित काव्य चरित्र हा लोककवी विठ्ठल वाघ ह्यांचा लवकरच आकारास येणारा काव्यप्रकल्प आहे त्यातील काही भाग समतेचे महाकाव्य च्या खंडात अंशतः प्रथमच वाचण्याचा योग वाचकांना आला आहे. शांताराम नांदगावकर, फ.मु.शिंदे, विठ्ठल उमप, वामन निंबाळकर, राजा ढाले, प्रतिमा इंगोले, सुधाकर गायधनी ह्या जुन्या जाणत्या कवीच्या चिंतनशील कवितांसोबत प्रा.यादव वक्ते ह्यांचे आद्याक्षर नामकाव्य खूप खूप विलोभनीय झाले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ह्यांची ओळख करून देणारी श्रीकृष्ण राऊत किंवा किशोर बळी ह्यांची प्रज्ञासूर्या सारखी गझल असो वा वऱ्हाडी बोलीतील गौतम गुळधे ह्यांची मंतर ही कविता असो काळजाचा वेध घेते. खरे म्हणजे १००० कवितांच्या गराड्यात नेमके कोणत्या कवी वर आणि कवितेवर भाष्य करावे असा प्रश्न उपस्थित होतोच. मात्र जवळपास समकालीन दर्जेदार कवींनी ह्या संग्रहात हजेरी लावलेली दिसली अर्थात काही नामवंत कवींचे ह्या उपक्रमा बद्दल माहिती असूनही ह्या संग्रहात त्याच्या कवितांचे नसलेले अस्तित्व त्यांच्या मनातील जातीय भिंतीचे बांधकाम किती मजबूत आहे, ते निक्षून सांगणारे ठरते. संपादकीय धुरा सांभाळत प्रकाश अंधारे ह्यांची निलप्रभासूर्या ही लक्षवेधी कविता त्यांच्या प्रतिभेची साक्ष देणारी आणि बाबासाहेबांचा गौरव करणारी ठरते.

**तू बसूच शकत नाहीस**
**जगातल्या कुठल्याच पुरस्काराच्या चौकटीत**
**कारण तूच जगातला सर्वोच्च पुरस्कार आहे**

अशा ओळींमधून नंदू वानखेडे हे भावना व्यक्त करताना दिसतात. त्यावेळी जागतिक महामानवाच्या स्पर्धेत बाबासाहेब मागे पडलेत ह्या लिंकवर जाऊन वोटिंग करा असे मेसेज पाठवून बाबासाहेबांची महत्ता मोजणाऱ्या प्रवृत्तीची आठवण येऊन चीड निर्माण होते. बाबासाहेबांनी शाळेमध्ये टाकलेले पहिले पाऊल पूर्ण बहुजन समाजाच्या उत्थानाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे होते ते आपल्या कवितेतून संदीप वाकोडे सांगतात. तर बाबासाहेबांनी शंबुक आणि एकलव्य डोळ्यात चितारला असे ज्योती लांजेवार स्पष्ट करतात. हिरा बनसोडे ह्यांची युगंधरा ही संवादात्मक रचना सुद्धा तितकीच प्रभावी आहे. चवदार तळे, काळाराम मंदिर येथील सत्याग्रह ह्यांना शशिकांत हिंगोणेकर ह्यांनी मुक्तछंदात तर किरण डोंगरदिवे ह्यांनी भिमरायाची वाणी सारख्या गीतातून उल्लेखले आहे.

**आभाळ ते मोकळे केले**
**मंदिरातले देव खुले केले**
**चवदार केलं स्पर्शाने पाणी**
**जणू समतेची मंजुळ गाणी**

असे लिहून आस्मादिकाने बाबासाहेबांच ऋण काव्यबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तर भीमा तू सिंहासारखे जगणे शिकवले असे संघमित्रा गेडाम लिहितात. भीमजयंती कशी साजरी करावी ह्या प्रश्नाचे उत्तर अमोल शिरसाट ह्यांच्या कवितेत मिळते.



तर बाबासाहेबांच्या विचारसरणीवर चालत असताना आणि बाबासाहेबांच्या सावलीत वावरताना अशोक पळवेकर म्हणतात...

**मला दिसू लागतोय सर्वदूर माझाच गोतावळा**

असे म्हणत बाबासाहेबांच्यामुळे मानवाची दृष्टी किती सम्यक आणि समता वादी होते ते अधोरेखित करतात.

**विचार भिमाचे पांगले पाहिजे**
**घरोघरी साऱ्यांना सांगले पाहिजे**

असे सांगणारी सदानंद मोरे ह्यांची रचना जिथे भिमाचे विचार सांगते तेथेच भन्ते चंद्रबोधी ह्यांची रमा थापते भाकर ह्या कवितेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांना रमा बाईची किती समर्थ साथ मिळाली ते दृश्य उभे करते. महाराष्ट्राबाहेरील हैद्राबाद येथील सुरज कुमारी गोस्वामी किंवा ज्यांनी स्वतः रमाई सारखा प्रातिनिधिक संग्रह संपादित केला असे बंगलोरला वास्तव्य असणारे शास्त्रज्ञ डॉ युवराज सोनटक्के ह्यांच्या मराठी कवितांचा समावेश ह्या संग्रहात दिसतो.तृप्ती गणवीर गोवा ह्या जातीच्या गुलामीची कबर बांधण्याची तयारी बाबासाहेबांच्या प्रेरणेने करतात तर अमेरिकेतील पल्लवी माने बाबासाहेबांच्या गौरवासोबत,

**चौदा एप्रिल येते अन् चौदा एप्रिल जाते**
**मात्र शुद्ध आचरणाचा भुकेला बुद्ध**
**उपाशीच राहतो**

अश्या शब्दात बाबासाहेब ही डोक्यावर घेण्याची नव्हे तर डोक्यात साठविण्यात यावी अशी प्रभूती असल्याचे सांगताना दिसतात. प्रा अरुण पाटील ह्यांच्या कवितेतील बाबासाहेबांना कवीने महिलांचा तारणहार हे समर्पक विशेषण वापरून गौरविले आहे. मिळतो तुझ्यामुळे हो सन्मान संसदेला असे सांगणारे रमेश सरकटे किंवा शेख इकबाल मिन्ने ह्यांच्या गझल प्रभावी आहेत.समतेचे महाकाव्य साठी गझल पुरवणारे एक महत्वाचे नाव भीमराव पांचाळे हे होते त्यामुळे समतेचे महाकाव्य मधील गझल खूप प्रभावी आणि तंत्रशुद्ध आहेत हे आपल्या लक्षात येते. नितीन देशमुख ह्यांच्या तू दुःखाचा खडक फोडून ह्या कवितेत बाबासाहेबांच्या लेखणीला शिवबाजी तलवार आणि तुळशीराम बोबडे ह्यांनी बाबासाहेबांचा पाणी संग्राम हा महात्मा फुले ह्यांच्या हौद खुला करून देणाऱ्या प्रसंगाशी जोडून बाबासाहेब आणि ह्या महापुरुषांची विचारधारा किती समान होती ते दर्शविले आहे. वर्तमान पिढीतील बहुतांश दर्जेदार लेखन करणारे कवी आणि अगदी उत्साही विद्यार्थी वर्गाने तयार केलेल्या कविता ह्या संग्रहात संपादकांनी घेतल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या ह्या कविता वाचून ह्या लेकरांना मराठीची गोडी बाबासाहेबांच्या बद्दलची अस्मिता असून त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेची ओळख करून देणाऱ्या आहेत. शिवाय बाबासाहेबांचा विचार आणि मराठी काव्याच समृद्ध दालन भावी पिढीकडे वर्ग करण्याचा संपादकांचा उद्देश ह्या ठिकाणी दिसतो, अर्थात संपादन मंडळ हे प्रशासकीय अधिकारी असल्याने त्यांना समृद्ध भारत आणि सक्षम भावी पिढी घडविणे ह्याकडे लक्ष देणे गरजेचे वाटणे स्वाभाविकच आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# बाबासाहेब होते म्हणून...



## भोवताल (३५)

प्रमोद पवार,
●८९७५३७१००३

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर होते म्हणून..

''पिढ्यांचे फिटले भोग-मिटल्या वेदना.. मरत्या मानवतेला- जीवदान मिळाले पुन्हा.! बाटवणाऱ्याच्या स्पर्शाने केला-अत्याचाराचा अंत.. ज्याची सावली नकोशी होती- त्यांनीच फुलवला वसंत.! भारोभार गाळून घाम- मगच मिळे पाण्याचा घोट.. हाडे झिजवून उगाळली- तरच भरत असे पोट.! समता-ममता- माणुसकीचे- पेटवले अखंड दिवे.. कलंक मिटवून जातीभेदाचा- उजळले आयुष्य नवे.! मूलभूत अधिकाराचे- संविधानाने मिळाले दान.. बाबा होते म्हणून- लोकशाहीचे वाचले प्राण.! बाबासाहेब होते म्हणून- सन्मानाने जगणे आले.. निष्ठूर कठोर समाजमन- निर्भय, निकोप झाले.!''

आज प्रकर्षाने जाणीव होते की, जे शून्य होते.. त्यांना धन्य करण्याची किमया डॉ.बाबासाहेब या किमयागाराने करून दाखवली. अमानवी बंधनांनी जखडून टाकलेल्यांचे पाश, कायमचे तोडले.. विषमतेचे विषवेल उखडून- अत्याचारी, अहंकारी महाल मोडले.! अभ्यासाचे व्रत घेऊन- प्रसन्न केले ज्ञान.. हक्क आणि कर्तव्याची, करून दिली जाण.!

शैक्षणिक- सामाजिक- राजकीय- आर्थिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील बाबासाहेबांचे उत्तुंग कार्य त्यांना महामानव ठरवतात. मानवतेसाठी त्यांचे संघर्ष त्यांना अनमोल कीर्ती प्रदान करतात. केवळ ते शिकले असते, बॅरिस्टरच्या व्यवसायात रमले असते, तर फक्त हुशार विद्यार्थी, यशस्वी पुरुष म्हणून नावाजले असते.. परंतु त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजोद्धारासाठी केला,त्यांचा संघर्ष कोट्यावधीच्या हर्षाचे कारण बनला. आपले ज्ञान, अप्रगत -अशक्तांच्या उत्थानार्थ खर्च केले.. शोषण थांबवून- पोषण व्हावे यासाठी ते झिजले. म्हणून केवळ आदरणीय न ठरता, घराघरात पुजनीय ठरले. चवदार तळ्याचा संघर्ष हा केवळ ''पाण्याचा'' नसून माणसाने माणसाकडे माणूस म्हणून ''पाहण्याचा'' होता. एवढा भेदाभेद सोसूनही बाबासाहेबांच्या मनात कोण्या एका घटका विषयी कटूता नव्हती. कारण ते दुष्पवृत्तीच्या विरोधात होते- व्यक्ती द्वोषी नव्हते. त्याचे प्रत्यंतर ''हिंदू कोड बिला'' तून येते. हे हिंदू संहिता विधेयक त्यांनी आग्रहाने दाखल केले. जरी ते जसेच्या तसे मंजूर झाले



नाही, तरीही पुढे जाऊन विवाह कायदा.. वारसा हक्क.. दत्तक -पोटगी कायदा अशा विभक्त रूपात त्यास पुढे मान्यता मिळाली. यामुळे काय झाले? तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार,त्यातून स्त्री-पुरुष समानतेस कायद्याचे पाठबळ मिळाले. अत्याचारग्रस्त ''स्त्री'' ला पती पासून घटस्फोटाचा-पोटगीचा अधिकार मिळाला. विधवा व मुलींना वडिलोपार्जित संपत्तीत मुलाप्रमाणे समान वाटा मिळाला. एक पत्नीत्वाचे कलम येऊन, दुसरे लग्न व त्यातून ''नारी''ची होणारी विडंबना थांबली. दत्तक घेताना महिलेची संमती आवश्यक झाली.

घराघरात केशोवपन होऊन, फुटक्या नशिबाच्या.. अपशकुनी म्हणून हिनवलेल्या, भोगवस्तू म्हणून छळल्या जाणाऱ्या बहुतांश माता भगिनींची रूढ गुलामी संपली. महात्मा फुले दांपत्याची अपेक्षा पूर्ण होऊन भोग वस्तू म्हणून छळल्या जाणाऱ्या महिलांना सन्मानाने जगण्याचा-कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळाली.

सामाजिक जाणीवे इतकीच ''आर्थिक'' बाबतीत त्यांची विद्वत्ता जगमान्य आहे. मध्ये ''द प्रॉब्लेम ऑफ द रुपी: इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन'' या आपल्या ग्रंथातून बाबासाहेबांनी भारतीय चलनाची समस्या, ऐतिहासिक पार्श्वभूमी व त्यावरील उपाय मांडले.ब्रिटिशांच्या चुकीच्या चलन धोरणामुळे रुपयाचे अवमूल्यन होऊन, महागाई वाढते, असा दावा केला. त्यावर उपाय म्हणून ''सुवर्ण मानक'' व ''मध्यवर्ती बँक'' स्थापनेची शिफारस केली. सरकारी खर्च आणि तूट नियंत्रित करून चलनवाढ करण्याचा उपाय सुचवला. यामुळे आपल्याला मजबूत अर्थव्यवस्थेसाठीच्या धोरणासाठी विस्तृत संदर्भ प्राप्त झाले.

केवळ एक जात समूह डोळ्यासमोर ठेवून कोणताही निर्णय न घेता, भविष्यात सर्वांचे मूलभूत हक्क कायम राहावे याची ''कर्तव्यासह तरतूद '' त्यांच्या प्रत्येक कृती मागे दिसून येते. म्हणूनच समतेच्या या चळवळीत दलितांसोबतच, मानवी हक्काप्रती सजग असणारे काही सवर्ण सहकारीही होते. गंगाधर सहस्रबुद्धे, प्रा.जी.एम.जाधव, चित्रगुप्त या सहकाऱ्यांनी वृत्तपत्राच्या कार्यात, अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीत बाबांना सहकार्य केल्याचे दिसून येते. कारण चांगुलपणा हा ''जाती धर्मा'' वरून ठरत नाही तर ''नीती कर्मा'' वरून ठरत असतो. असे नसते तर एकाच आईला पिऊन मोठी झालेली भावंडे, पुढे आयुष्यात विभक्त झाली नसती. म्हणून एखाद्या ''जाती'' नव्हे तर एखादी ''कुप्रवृत्ती'' ही गुन्हेगार ठरावी.. बाकी सत्कृत्यावरून माणसाची पारख करावी.

या विचारांचे अधिष्ठान घेऊन बाबासाहेब ''लोकशाहीचा'' आग्रह धरतात. ''भांडवलशाही'' पेक्षा ''शेतकरी हिताचा'' स्वीकार करतात. समाजाची प्रगती ते ''महिलांनी केलेल्या प्रगतीवरून'' मोजतात. बाबासाहेब होते म्हणून लोकशाहीचा प्राण असलेले ''संविधान'' आकारास आले. कामगारांचे कल्याणकारी निर्णय होऊन, कामाचे तास निश्चित झाले. कामगार संघटनांना मान्यता मिळाली. शिक्षणासाठी ''पीपल्स एज्युकेशन सोसायटी'' स्थापन झाली. बाबासाहेब-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज- संत गाडगेबाबा यांच्या भेटीतून सद्धर्मासाठी सत्कार्य अधोरेखीत झाले.

आयुष्यभर जात-भेदा विरोधात झिजलेल्या या महान भारतरत्नास कोण्या एका जाती धर्माचा ''शिक्का'' लागता कामा नये.. त्यांच्या कर्तुत्वाने प्रत्येक मानवी मनावर उमटलेली उपकाराची ''मोहर'' मिटता कामा नये.!


**बाबासाहेब होते म्हणून**

समस्त माता-भगिनींचे थांबले शोषण.. कामगार कायद्याने कष्टकऱ्यांचे पोषण.! शिक्षणाचे हक्क-अबाधित सर्वासाठी.. प्रगतीचा सर्वाधिकार- यश गर्वासाठी.! लोकशाहीच्या उत्सवाला- कलमांची आभूषणे.. जातीभेद: लिंगभेदाची-संपवली दूषणे.! धर्मावरून ठरत नाही- कोणाचे लहान:मोठेपण.. हक्क व कर्तव्यदृष्टीने-समसमान प्रत्येक जण.! मतदानाचा अधिकारातून, बनते आता सरकार..बाबासाहेबांच्या स्मृतिला, विनम्र अभिवादन..! महामानवाचा थोरपणा, ''विश्वव्यापी असतो'' हे ध्यानी धरूया.. भारतरत्नाची ची जयंती, सद्भाव ठेवून साजरी करूया.!

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## अविचल

नव्हते, येणे जन्मा, बाबासाहेब, तुमच्या हाती
पण, जन्मानंतर, युगप्रवर्तक, बनणेच होते तुमच्या हाती
संस्कृतीने जरी होते, ओव्हरफ्लो इथले सागर
दुःखीताप्रती फुटला, केवळ तुम्हालाच मनस्वी पाझर
नाही जागली, मनी कुणाच्या, तुझ्यासम करूणा
मृत मनातही भरला प्राण, जागविला स्वाभिमानी बाणा
निश्चल, पण वितळतोच हिमालय, तप्त सुर्यामुळे
अविचल, तू, अखंड तळपला, बुध्द तेजामुळे
नव्हतेच, रोधण्या तुला, मानवी क्रौर्यातही बळ
जपण्या मानव्य, त्रिभुवनी, तुच एकटा प्रबळ
संविधानानेच तुझ्या, बहरली येथे समता
मातीतून इथल्या, युगांची क्षणात पळाली विषमता
पृथ्वी मोलाच, रत्नजडीत आयुष्य, तुमचं
उजळले भाग्य, भारती, मनस्वी आमुचं.



- सुदाम खरे, बुलढाणा
मोबा. ९८६०८३३२१८

## आम्ही जयंती साजरी करतो

बा भिमाच्या त्यागाला,
कष्टाला स्मरतो आम्ही धुमधडाक्यात जयंती साजरी करतो.

जेवढी होत नसेल उलाढाल बाजारात एका आर्थिक वर्षात,
तेवढी आम्ही एक  महिण्यात पुर्ण करतो.

वाचतो आम्ही  वर्षातील ३६४ दिवस डॉ. बाबासाहेबांना,
एक दिवस मात्र जोशात नाचून ईन्जॉय करतो.

खरेदी करत नाही आम्ही शक्यतो कपडे लत्ते इतर महिन्यात.
एप्रिल महिन्यात मात्र तो कोटाच पुर्ण करतो.

खर्च होतात आमचे जयंतीला कोट्यावधी रुपये,
ही त्यांचीच देणं आहे, आम्ही मुक्त हस्ते उधळण करतो.

उतरवले होते बैलगाडीतुन बाल भिमाला,
आज त्यांच्या जयंतीला घरी येण्यासाठी आम्ही हेलीकॅाप्टर,
विमान बुक करतो.

देशात दिवाळी सण सर्वात मोठा आहे हिंदू बांधवांचा,
आम्ही चौदा एप्रिलला 'महादिवाळी' साजरी करतो.

- पंडीत परघरमोर,
शेगाव.मोबा. ९९७०३०७३४०



## भीमा तुझा जन्म


भीमा तुझा जन्म होता
उगवतीचा शीतल तारा
प्रखर तुझ्या तेजाने
हसला आसमंत सारा

तोडल्यास बेड्या गुलामांच्या
केलास तू क्रांतीचा मारा
सुकलेल्या ग्रिष्मातील वृक्षास
जसा लाभला वसंत वारा

निसर्गदत्त पाण्यावर होता
अमानुष अमानवी पहारा
प्राशूनी ओंजळभर जल
तू पेटविला चवदारचा किनारा

सत्याग्रहात तुझ्या होता
समता नि ममतेचा नारा
मानवी हक्कांसाठी तू
तोडलास काळारामाचा पहारा

झिजवून लेखणी भीमा तू
उभारला लोकशाहीचा डोलारा
जागा हो भीमसैनिका आता
दे संविधानवर कडक पहारा



- सौ.वर्षा इंगळे
जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय
मराठी साहित्य परिषद बुलढाणा,
मोबा. ९५५२०५७९६२

दैनिक महाभूमि

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** (अदिती एन्टरप्रायजेस बुलढाणा) यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. **MAHMAR/**२०२३/८९१४८
ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** (Aditi Enterprises Buldhana) Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao RNI No.MAHMAR/2023/89148**

दैनिक महाभूमि

छत्रपती **संभाजीनगर भूमि**

मंगळवार । १४ एप्रिल २०२६

dainikmahabhoomi@gmail.com


## न्यूज ब्रीफ

### अल्पवयीन मुलाचे अपहरण

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज परिसरातील साठेनगर येथे १५ वर्षीय मुलाचे अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार, ७ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता विशाल किशोर जाधव (१५ वर्षे) हा आपल्या मित्राला भेटण्यासाठी घरातून बाहेर पडला होता. मात्र, तो त्यानंतर घरी परतलाच नाही. कुटुंबीयांनी त्याच्या मित्रांकडे तसेच नातेवाइकांकडे फोनद्वारे चौकशी केली, परंतु त्याचा काहीच ठावठिकाणा लागला नाही. अखेर चिंताग्रस्त पालकांनी पोलिसांकडे धाव घेतली असून, याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### अठरा तास सलग वाचन अभियान

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात 'अठरा तास सलग वाचन' या अभियानाचे रविवार, १२ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते. सकाळी सहापासून सुरू झालेल्या या उपक्रमात विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी शांत वातावरणात वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन केले. सलग १८ तास चाललेल्या या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, सातत्य आणि वेळेचे व्यवस्थापन यांची जाणीव दृढ झाली. या उपक्रमाचे आयोजन ग्रंथालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या अभियानासाठी डॉ. भगवान डोके व डॉ. सिंधू हळदे यांनी मार्गदर्शन केले.

### लाडगाव येथे तरुणीची आत्महत्या

**करमाड :** छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील लाडगाव येथे राहणाऱ्या वर्षा रवी रगडे (१९ वर्ष) या तरुणीने राहत्या घरी गळफास लावून घेत आत्महत्या केली. ही घटना रविवार, १२ एप्रिल रोजी दुपारी घडली. मयत वर्षा रगडे यांनी ओढणीच्या सहाय्याने छताच्या पंख्याला बांधून गळफास घेतला होता. हा प्रकार कुटुंबियांच्या लक्षात आल्यावर संतोष साळवे, जितेंद्र गायकवाड यांनी तीला फासावरुन खाली उतरवून उपचारासाठी चिकलठाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी करमाड पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## उकाड्यामुळे अंगाची लाहीलाही; शितपेयाकडे वळली नागरिकांची पावले

# सूर्याचा पारा ४१ अंशावर: शहरवासीय घामाघुम, रस्त्यावर शुकशुकाट!

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

शहरासह तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सूर्याचा पारा चढला असून, उन्हाच्या तीव्र झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे, आकाशात अधूनमधून येणाऱ्या ढगाळ वातावरणामुळे हवेतील आर्द्रता वाढली असून, उकाड्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हाच्या तडाख्यामुळे दुपारच्या वेळी बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. दरम्यान, सोमवार, १३ एप्रिल रोजी उन्हाचा पारा ४१ अंशावर गेल्याने शहरवासीय घामाघुम झाले होते.

एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा सुरू असतानाच छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. सकाळी १० वाजेपासूनच उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्ते ओस पडत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे आरोग्यावरही परिणाम होत असून,



नागरिक थंड पेयांकडे वळताना दिसत आहेत. सध्या आकाशात ढगांची गर्दी होत असली तरी पाऊस पडण्याऐवजी वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला आहे. वारे संथ असल्याने आणि ढगांमुळे उष्णता जमिनीलगतच राहत असल्याने नागरिकांना घामाच्या धारा सोसाव्या लागत आहेत. घराघरांत आता पंखे आणि कूलरचा वापर वाढला असून, दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. दरम्यान, उन्हाच्या तीव्रतेमुळे शहरातील वाहतूक दुपारच्यावेळी मंदावत असून बाजारपेठेत ग्राहकांची संख्या देखील रोडावली आहे. दुपारी कडाक्याचे ऊन पडत नसल्याने शहरवासीय दुपारी बारा वाजेपूर्वी कामे आटोपण्यावर भर देत आहेत. तसेच केवळ अत्यावश्यक कामासाठीच लोक घराबाहेर पडत आहेत. डोक्याला रुमाल बांधून आणि टोपी परिधान करुन घराबाहेर पडत आहेत.

### नागरिकांनी उन्हात फिरणे टाळावे

■ वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी भरपूर पाणी प्यावे, डोक्याला रुमाल किंवा टोपी वापरावी आणि शक्यतो दुपारी उन्हात फिरणे टाळावे, असे आवाहन मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांनी केले आहे. तसेच उष्माघाताचा त्रास जाणवत असल्यास नजीकच्या मनपा आरोग्य केंद्रास भेट देऊन औषधोपचार घ्यावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## बॅनरची विटंबना; संतप्त नागरिकांचे रास्ता रोको आंदोलन



**वरठाण /प्रतिनिधी**

येथील चौफुलीवर लावण्यात आलेले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बॅनरची अज्ञात समाजकंटकाने विटंबना केल्याची घटना रविवार, १२ एप्रिल रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास काही नागरिकांच्या लक्षात आली. त्यानंतर संतप्त नागरिकांनी वरठाण चौफुलीवर जमा होत रास्ता रोको आंदोलन करीत बॅनरची विटंबना करणाऱ्याचा निषेध केला. तसेच समाजकंटकाविरुध्द बनोटी पोलिस चौकीत सोमवार, १३ एप्रिल रोजी तक्रार देण्यात आली आहे. रास्ता रोको आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने वरठाण चौफुलीवर शुभेच्छाचे बॅनर लावण्यात आले होते. हे बॅनर अज्ञात समाजकंटकाने फाडून विटंबना केली होती. हा प्रकार लक्षात आल्यावर संतप्त आंबेडकरी अनुयायांनी वरठाण चौफुलीवर रास्ता रोको आंदोलन करण्यास रविवारी रात्री साडेदहा वाजेपासून सुरुवात केली. या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस निरीक्षक पंकज बारवाल, उपनिरीक्षक गजानन आरेकर, जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे, नारायण खोडे यांनी घटनास्थळी धाव घेत संतप्त आंदोलकांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. जोपर्यंत समाजकंटकाला अटक करीत नाही तोपर्यंत रास्ता रोको आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्धार आंबेडकरी अनुयायांनी केल्याने पेच निर्माण झाला होता. पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांनी आरोपी समाजकंटकाला शोधून त्याला कठोर शिक्षा दिली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर संतप्त आंदोलकांनी तब्बल वीस तासानंतर आपले आंदोलन मागे घेतले.

## डिजिटल शेतीशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वैजापूर/प्रतिनिधी**



तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या डिजीटल शेतीशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शेतकऱ्यांनी जैविक शेती, कमी खर्चात अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांची माहिती घेतली.

वैजापूर येथे कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विशेष डिजिटल शेतीशाळा' अभियानाचे दुसरे सत्र बुधवार, ८ एप्रिल रोजी उत्साहात पार पडले. 'जैविक व नैसर्गिक निविष्ठा' या विषयावर आधारित या सत्रात तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी ऑनलाईन माध्यमातून सहभाग नोंदवून शाश्वत शेतीचा मंत्र घेतला. या शेतीशाळेसाठी उपविभागीय कृषी अधिकारी अनंत गंजेवार, तालुका कृषी अधिकारी व्हि एस ठक्के, मंडळ कृषी अधिकारी मोहनीराज मोरे, माधव गांगुर्डे, शाम पाटील, भाऊसाहेब खेमनार, ऊप कृषी आधिकारी विशाल दांगोडे, किरण भुजबळ, दत्ता पुंड, दत्ता, पेदे, आदिनाथ सपाटे, सहाय्यक कृषी अधिकारी, आत्मा प्रकल्पाचे समूह सहाय्यक आदींची उपस्थिती होती. शेतकऱ्यांना एकत्र डिजीटल शेतीशाळेच्या माध्यमातून त्यांना रासायनिक खतांचा खर्च कमी करून जैविक पद्धतीचा अवलंब करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. वैजापूर तालुक्यातील ३० पोकरा गावांतील सातशे ते आठशे शेतकऱ्यांनी या शेतीशाळेचा लाभ घेतला. दरम्यान, येत्या बुधवार, १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि २२ एप्रिल रोजी आधुनिक शेती तंत्रज्ञान या विषयावर होणाऱ्या डिजिटल शेतीशाळेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी व्हि.एस.ठक्के यांनी केले आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी झालेल्या ओळखीनंतर आरोपीने तू मला आवडतेस, मी तुझ्याशीच लग्न करणार असल्याचे आश्वासन देत संबंध प्रस्थापित केले. दोन वर्षे अत्याचार केल्यानंतर पीडितेने लग्नासाठी तगादा लावल्याने त्याने शिवीगाळ व मारहाण केली. पीडितेच्या तक्रारीवरून छावणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रकांत रावसाहेब नवपुते (रा. टीव्ही सेंटर, पोलिस चौकीमागे) याच्यासह पत्नी व आईचा आरोपींमध्ये समावेश आहे. ३५ वर्षाच्या महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार तिचा पतीसोबत न्यायालयात वाद सुरू आहे. ती आई-वडील व मुलीसोबत राहते. २०२३ मध्ये चंद्रकांतची कामाच्या ठिकाणी तिच्या सोबत ओळख झाली. या ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाल्यानंतर आरोपीने जानेवारी २०२४ मध्ये पीडितेच्या घरी येऊन माझी पत्नी सतत आजारी असते. तिला लवकरच घटस्फोट देणार आहे. तू मला आवडत असल्यामुळे तुझ्याशीच लग्न करीन, असे आश्वासन देत संबंध प्रस्थापित केले. पीडितेच्या घरासह हडको कॉर्नर परिसरातील एका हॉटेलमध्ये नेऊन लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केला. पोलिस उपनिरीक्षक गीता हाके तपास करीत आहेत. पीडितेने आरोपीसोबतच्या संबंधांची माहिती पत्नी, आईला घरी जाऊन सांगितली. तेव्हा दोघींनी तिलाच शिवीगाळ करीत हाकलून दिले. त्याशिवाय आरोपीनेही पत्नीला सोडू शकत नाही. तुझ्याशी लग्न करू शकत नसल्याचे सांगितले.






## महिलांच्या स्वावलंबनाला 'ब्रेक'; योजनांच्या पुनरुज्जीवनाची गरज

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

कामगार कल्याण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या १३ उपकामगार केंद्रांमधून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कौशल्याधारित उपक्रमांना सध्या खीळ बसली असून, त्यामुळे महिलांच्या स्वावलंबनाला ब्रेक लागल्याचे चित्र आहे. लॉकडाऊन काळात बंद पडलेल्या अनेक योजना अद्याप पूर्णपणे सुरू न झाल्याने कामगार कुटुंबांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.


या केंद्रांद्वारे भरतकाम, विणकाम, शिलाई मशीन प्रशिक्षण, मेंदी कला अशा विविध उपक्रमांमुळे महिलांना घरबसल्या उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याची संधी मिळत होती. कामगार कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही केंद्रे महत्त्वाची भूमिका बजावत होती. मात्र, योजना बंद झाल्यामुळे अनेक महिलांचे रोजगाराचे मार्ग बंद पडलेत. कामगार कुटुंबातील पाल्यांसाठीही या केंद्रांद्वारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध होते. परिणामी त्याचा आर्थिक भार थेट कामगारांवर पडत आहे.

असलेल्या सध्या सुरू उपक्रमांमध्येही अधिक भर घालून आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित नवीन कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी होत आहे. यामुळे युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

कामगार कल्याण मंडळाने या मागण्यांची दखल घेऊन बंद योजना तातडीने पुन्हा सुरू कराव्यात, तसेच केंद्रांची कार्यक्षमता वाढवून कामगार कुटुंबांच्या आर्थिक उन्नतीसाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. दरम्यान, कामगार पाल्यांच्या विद्यार्थ्यांसाठी वाहन चालवण्याचा परवाना, त्यासाठी लागणारा खर्च कामगार कल्याण केंद्र देत आहे. त्याचा फायदा कामगार कुटुंबीयांतील पाल्यांनी घ्यावा असे आवाहन प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे यांनी केले आहे.

## क्षुल्लक कारणावरुन मुलीची आत्महत्या; गुन्हा दाखल

**करमाड** : क्षुल्लक कारणावरुन झालेल्या वादानंतर १८ वर्षीय मुलीने विहिरीत उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार, १० एप्रिल रोजी घडली होती. याप्रकरणी मुलीस आत्महत्यसे प्रवृत्त केल्याचा आरोप करीत तिच्या वडिलाविरुध्द करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकिता नवनाथ कुबेर (१८ वर्ष), रा. गेवराई कुबेर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास बनगाव शिवारातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली होती. मैत्रिणीच्या लग्नाला जाण्याच्या कारणावरून तिचा वडील नवनाथ कुबेर यांच्याशी वाद झाला होता. या वादातून वडिलांनी मुलीला शिवीगाळ व मारहाण केल्याने तिने आत्महत्येचा निर्णय घेतल्याचा आरोप फिर्यादीत नमूद आहे. मृताची आई रेणुका नवनाथ कुबेर (४० वर्ष) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, घटनेनंतर आरोपी वडिलांनी मृत्यूची माहिती पोलिस व नातेवाईकांना न देता अंत्यविधी करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप आहे. माहिती मिळताच पोलिस उपविभागीय अधिकारी पूजा नांगरे, पोलिस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिस उपनिरीक्षक भारत निकाळजे पुढील तपास करीत आहेत.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यापीठात व्याख्यान

# बुध्द धम्मातील 'नवयान'चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणेते : प्रा. प्रदीप गोखले

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

वैज्ञानिक दृष्टीकोन व समग्र मानवाचा विकास केंद्रबिंदू असणाऱ्या बौद्ध धम्मचा अंगीकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. बुध्द धम्मातील हिनयान व महायान संप्रादायऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'नवायन'ची मांडणी केली. बौद्ध धर्माचा 'नवयान' मार्ग वैज्ञानिक तर्कशुद्धता आणि आध्यात्मिक मूल्ये यांचा संगम आहे, असे प्रतिपादन तत्वज्ञानाचे अभ्यासक प्रा.प्रदीप गोखले यांनी सोमवार, १३ एप्रिल रोजी केले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यगृहात सोमवारी प्रा. प्रदीप गोखले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरु डॉ.विजय फुलारी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य बसवराज मंगरुळे, ॲड.दत्तात्रय भांगे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.कैलास अंभुरे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी प्रा.प्रदीप गोखले यांचे 'बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वचिंतन' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तत्वज्ञानाचे मोठे अभ्यासक व चिंतक होते. मात्र या विषयावर फारसे लेखन, मांडणी झालेली नाही. खरे तर संकुचित विचारातून बाहेर पडून समग्र मानव जातीचा विकास हेच बाबासाहेबांच्या संपूर्ण जिवनाचे वैशिष्ट्य होते. जातीच्या उतरंडीत व रुढी परंपरेच्या जोखडात अडकलेल्या हिंदु धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न त्यांनी प्रारंभीच्या काळात केला होता. मात्र यास यश आले नाहि. हिंदू म्हणून जन्माला आलो मात्र हिंदु म्हणून मरणार नाही, असे बाबासाहेबांनी घोषित केले. त्या अनुषंगाने त्यांनी सर्व धर्माचा अभ्यास केल्यावर बुध्द धम्म हाच समाजाच्या प्रगतीचा मार्ग आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

डॉ. आंबेडकरांना केवळ एक समाजसुधारक म्हणून न पाहता, एक महान तत्वज्ञ म्हणून मानले पाहिजे. डॉ. आंबेडकरांचे कार्य 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात दिसून येते, जे केवळ बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन नसून त्याचे तार्किक पुनर्रचना आहे, असेही प्रा.प्रदीप गोखले म्हणाले. डॉ. आंबेडकर हे भारतीय आणि पाश्चात्य अशा दोन्ही अर्थाने एक प्रगल्भ तत्वज्ञ होते. त्यांनी नागार्जुन याप्रमाणेच बौद्ध धर्माची तर्कशुद्ध आणि फलदायी मांडणी केली. आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा जो 'नवयान' मार्ग मांडला, तो वैज्ञानिक तर्कशुद्धता आणि आध्यात्मिक मूल्ये यांचा संगम आहे. आंबेडकरांनी धर्मामध्ये 'नैतिकता' मध्यभागी ठेवून धर्माच्या पारंपरिक संकल्पनेत 'कोपरनिकन क्रांती' घडवून आणली. असल्याचे त्यांनी सांगितले.

### बाबासाहेबांच्या विचाराचा विदेशातही प्रभाव : कुलगुरु

■ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव केवळ सनातन नव्हे तर अनेक देशावर देखील झाल्याचे पहायला मिळते, असे अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले. जपान मधील बराकू व हंगेरीत देखील बााबसाहेबांच्या विचारांनी सामाजिक क्रांती घडवून आली, असेही ते म्हणाले.







एप्रिल ते जून कालावधीत नियोजन ▸ २८० गावासाठी २९२ टँकर सज्ज

# भूजल पातळी एक मीटरने वाढल्याने जिल्ह्यात पाणीटंचाईचे टळले संकट

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जिल्ह्यात गतवर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचा सकारात्मक परिणाम यंदा भूजल पातळीवर दिसून आला आहे. मागील पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत यंदा पाणीपातळीत तब्बल एक मीटरने वाढ झाली आहे. त्यामुळे मार्च एप्रिल महिन्यामध्ये सध्या तरी तीव्र पाणीटंचाई जाणवत नसल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

तथापि, एप्रिल ते जून या संभाव्य टंचाईच्या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषद प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून व्यापक नियोजन केले आहे. जिल्ह्यातील २८० गावांसाठी २९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे, तर



३४२ गावांत विहिरींचे अधिग्रहण करून पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. यासाठी ३१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर केला आहे. भूजल सर्वेक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी मान्सूनपूर्व आणि मान्सूननंतर अशा दोन टप्प्यांत भूजल पातळीची मोजणी केली जाते. पाणलोट क्षेत्रनिहाय निवडलेल्या विहिरी, बोअरवेलच्या माध्यमातून जानेवारी व मार्चमध्ये मान्सूनपूर्व, तर सप्टेंबर ऑक्टोबरमध्ये मान्सूननंतर पातळीची नोंद घेतली जाते. यानूसार पाणीटंचाईची तीव्रता दिसून येते. मार्च महिन्यात घेतलेल्या आढाव्यानुसार छत्रपती संभाजीनगर तालुक्यात ७.४८ मीटर, फुलंब्री ७.८२ मीटर, सिल्लोड ९.७८ मीटर, सोयगाव ७.२९ मीटर, कन्नड १२.४१ मीटर, खुलताबाद ९.४५ मीटर, गंगापूर ८.९४ मीटर, वैजापूर १०.२० मीटर आणि पैठण तालुक्यात ११.९८ मीटर इतकी भूजल पातळी नोंदविण्यात आली आहे.

जिल्ह्यात सरासरी १.०२ मीटरने पाणीपातळी वाढल्याची माहिती भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल यांनी दिली. दरम्यान, सध्या परिस्थिती समाधानकारक असली तरी उन्हाळ्याच्या तीव्रतेनुसार पाणीटंचाईची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने पूर्वतयारी म्हणून टँकर व विहीर अधिग्रहणाचे नियोजन हाती घेतले असून, संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

### यंदा मार्च-एप्रिलमध्ये कमी असेल टंचाईची स्थिती

■ गेल्या वर्षी फेब्रुवारीपासूनच काही गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी होती. त्यानुसार मार्च आणि एप्रिलमध्ये तहानलेल्या ६१ गावे व १० वाड्यांना मिळून ९३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. यंदा सध्या गंगापूर आणि पैठण तालुक्यातील ४ गावांची टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी आहे. तसेच पुढील तीन महिन्यातील संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून ३१ कोटींचा आराखडा तयार केला आहे. तो जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.

## महाराजस्व समाधान शिबिर; शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ

**वाळूज महानगर / प्रतिनिधी**




शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'अंतर्गत तीसगाव येथे शुक्रवार, १० एप्रिल रोजी आयोजित शिबिरास नागरिक व शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. यावेळी उपस्थिततांना विविध शासकीय योजनांचा लाभ, सातबारा वाटप व मार्गदर्शनामुळे शिबिर प्रभावी ठरले.

जिल्हा परिषद सदस्या लंकाबाई जाधव अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, अप्पर तहसीलदार उमेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र कसुरे, पंचायत समिती सदस्य सर्जेराव चव्हाण, दत्तात्रय वर्षे, सुनंदा अडसुळे, माजी पंचायत समिती सदस्य राणूजी जाधव, सरपंच शकुंतला लालचंद कसुरे, संजय जाधव, अंजन साळवे, संतोष राठोड, कमलसिंग सूर्यवंशी, ग्रामपंचायत अधिकारी शीतल उमप आदी उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. या शिबिरात शेतकरी लाभार्थ्यांना विविध योजनांचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. गेवराई कब्रस्तान ० ते २० आर जमिनीचे आदेश, सातबारा उतारे वाटप, कृषी विभागामार्फत ट्रॅक्टर वाटप, तसेच फेरफार, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा, अकृषिक तरतुदी, मालकी हक्क, पाणंद रस्ते, गाव दप्तर, सामाजिक अर्थसाहाय्य व जनजागृती आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

## गोदावरी नदीपात्रात उडी मारून विद्यार्थ्याची आत्महत्या

**परभणी / प्रतिनिधी**

वसतिगृह संचालक व सचिवाच्या त्रासाला कंटाळून १३ वर्षीय विद्यार्थ्याने सोमवार, ६ एप्रिल रोजी गोदावरी नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केल्याप्रकरणी पालकांच्या फिर्यादीवरून गंगाखेड पोलिसांनी वसतिगृह चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गंगाखेड शहरातील डॉ. लाईन परिसरातील सूर्यानंदा प्रतिष्ठान मुला-मुलींच्या निवासी वसतिगृहात रितेश राजाराम कदम राहत होता.



राजाराम उत्तमराव कदम यांनी फिर्यादीत म्हटले की, रितेश राजाराम कदम (१३ वर्ष) याला सूर्यानंदा प्रतिष्ठान मुला-मुलींच्या निवासी वसतिगृहात ठेवा, असे वसतिगृहाचे संचालक सुमती बाबर व सचिव विजय बाबर म्हणाले. त्याच्या सुरक्षेची जबाबदारी आमच्यावर आहे, असे सांगितले. त्यासाठीची तीस हजार रुपये रक्कम भरली होती. उर्वरित १६ हजार रुपयांसाठी विजय बाबर यांनी वेळोवेळी मागणी केली. रितेश कदम याला उर्वरित रक्कम मागत शिवीगाळ करून उपाशी ठेवले होते. रितेशने ही गोष्ट घरी सांगितल्यानंतर दहा हजार रुपये रक्कम पुन्हा देण्यात आली. उर्वरित सहा हजार रुपये राहिले होते.

यादरम्यान विजय बाबर व त्यांची पत्नी सुमती बाबर हे माझ्या मुलाला त्रास देऊ लागले. त्यामुळे रितेशने ६ एप्रिल रोजी गोदावरी नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केली. याप्रकरणी सुरुवातील आकस्मिक मृत्यूची नोंद झाली होती. मात्र, शनिवारी गंगाखेड पोलिस ठाण्यात विजयकुमार बाबर, सुमती बाबर यांच्याविरुद्ध पालकांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

## न्यूज ब्रीफ

### नाईक कॉलेजमध्ये आरक्षणावर मंथन

**छत्रपती संभाजीनगर :** देशात आरक्षणाची संकल्पना सर्वप्रथम महात्मा फुले यांनी मांडली. जातीच्या संख्येच्या प्रमाणात संधी मिळाली पाहिजे, या विचारातूनच समतेचा पाया रचला गेला. या संकल्पनेची अंमलबजावणी छत्रपती शाहू महाराजांनी केली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती राज्यघटनेतून दृढ केली, असे प्रतिपादन डॉ. वसंत हरकळ यांनी केले. म. फुले यांच्या द्विजन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. संजीव रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले.

### 'त्या' तलाठ्यांना नोटीस बजावा

**खुलताबाद :** तलाठी स्तरावर एक महिन्यापेक्षा जास्त काळ फेरफारची प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या तलाठ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावा व त्यावर खुलासा मागून अहवाल सादर करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी तहसीलदार संतोष गुट्टे यांना दिले. वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर विकास आराखडा बैठकीनंतर शनिवारी दुपारी जिल्हाधिकारी गौडा यांनी खुलताबाद तहसील कार्यालयात आढावा घेतला. यावेळी त्यांनी महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत लाभार्थ्यांना दिलेले लाभ, प्रलंबित फेरफार, जनगणनाविषयक कामकाज, भूसंपादन व घरकुलासाठी आवश्यक असणाऱ्या वाळू उपलब्धता आदींबाबत आढावा घेतला.

### पाच जुगारी पोलिसांच्या ताब्यात

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयडीसी वाळूज ठाण्याच्या हद्दीत शुक्रवार, १० एप्रिल रोजी जुगार अड्ड्यावर छापा टाकत पोलिसांनी पाच जणांविरुद्ध कारवाई केली असून १२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी पंढरपूर परिसरातील ओयासिस चौकात आरोपी हे पत्त्यावर पैसे लावून 'बुगी' नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार छापा टाकण्यात आला. रोहित बबन वाघमारे (२० वर्ष), विशाल संजय चव्हाण (२६ वर्ष), अर्जुन धोंडीराम कोळसे (३६ वर्ष), जब्बार आयुक्त कुरेशी (२८ वर्ष) व सत्यम शंकर जाधव (रा. रांजणगाव) या पाच जणांना ताब्यात घेण्यात आले. घटना स्थळावरून १२ हजार ४०० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. एमआयडीसी वाळूज ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भाजपच्या जनसंवाद अभियानास नागरिकांचा प्रतिसाद

**सावळदबारा / प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची ध्येय-धोरणे आणि केंद्र व राज्य सरकारची सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती तळागाळातील लोकांना देण्यासाठी भाजपच्या वतीने जनसंवाद अभियान सुरु करण्यात आले आहे. जनसंवाद अभियानांतर्गत भारतीय जनता पक्षाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सोमवार, १३ एप्रिल



रोजी सावळदबारा सर्कलमधील विविध गावांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला.

भाजपच्या जनसंवाद अभियानास सावळदबारा, डाभा, घाणेगाव, मोलखेडा, रवळा, देव्हारी, महालब्धा, पिंपळवाडी आदी गावातील नागरिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा आणि फर्दापूर सर्कलमधील विविध समस्या शासन दरबारी मांडून त्या मार्गी लावण्यासाठी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी हे मंत्रालयात पाठपुरावा करीत असल्याची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी उपस्थितांनी पाणीपुरवठा, रस्ते, वीज, ग्रामीण भागाला जोडणारी बससेवा सुरु करण्याची मागणी केली. यावेळी गुलाबराव पाटील कोलते यांनी ग्रामस्थांच्या मागण्या शासन दरबारी मांडून त्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

### संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा गौरव

**सोयगाव :** तंत्रज्ञान महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या करिअर संसदेतील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामाबद्दल प्रमाणपत्र देऊन नुकतेच गौरविण्यात आले.

## गांजाची तस्करी; ३१ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** नारेगाव परिसरातून जळगावला गांजा पुरवठा होत असल्याची बाब एमआयडीसी सिडको पोलिसांनी उघडकीस आणली. विशेष पथकाच्या सापळ्यात ५३ किलो ४४१ ग्रॅम गांजासह ३१ लाख ७२ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी एका तस्कराला बेड्या ठोकल्या असून, त्याचे धागेदोरे थेट ओडिशा राज्याशी जोडले गेलेत. बिदेश उर्फ विदेश सुरेश माचरे (३८, रा. भाटनगर, नारेगाव) असे अटक केलेला आरोपी असल्याची माहिती निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी दिली. नारेगाव परिसरात कारमधून (एमएच. २०, बीसी. ९५९७) गांजाची तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक भरत पाचोळे, कैलास लहाने यांच्या नेतृत्वात संतोष सोनवणे, संजय नंद, प्रकाश सोनवणे, संतोष गायकवाड आदींच्या पथकाने सापळा रचला. संशयित कार येताच घेराव घातला. झडतीनंतर २६ लाख ७२ हजारांचा ५३ किलो गांजा आढळला. पोलिसांनी ५ लाखांची कार, गांजा असा एकूण ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

### थकीत एरियससाठी उपोषणाचा इशारा

**परभणी :** थकीत एरियस व पगार मिळावा, या मागणीसाठी एका माजी कर्मचाऱ्याने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सन १९९३ ते २००५ या कालावधीत पोलिस प्रशासनात सेवा बजावली असून, त्या कालावधीतील १३ वर्षांचा एरियस तसेच काही कालावधीचा पगार अद्याप मिळालेला नाही. यासाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. मात्र, संबंधित कार्यालयाकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याने येत्या ३० एप्रिलपर्यंत थकीत रक्कम अदा करावी, अन्यथा त्याच दिवशीपासून नांदेड येथील विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालयासमोर कुटुंबासह आमरण उपोषणास बसण्याचा इशारा रामा अवचार यांनी दिला आहे.

## एका क्लिकवर मिळणार आता जन्म-मृत्यूचे प्रमाणपत्र

**परभणी / प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना आता जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी महापालिकेच्या फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही. परभणी शहर महानगरपालिकेने जन्म-मृत्यू नोंदणीसह विवाह नोंदणी आणि आरोग्य विभागाच्या सेवा ऑनलाइन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला असून, ही सुविधा लवकरच नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे.

महापौर सय्यद इक्बाल, उपमहापौर गणेश देशमुख, सभागृह नेते सय्यद समी, गटनेते दिलीप ठाकूर, आरोग्य अधिकारी कल्पना सावंत यांच्या उपस्थितीत मंगळवारी या ऑनलाइन प्रणालीचे



उद्घाटन करण्यात आले. यावेळी संबंधित विभागाला संगणक, स्कॅनर व प्रिंटर उपलब्ध करून देण्यात आले.

या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या जन्म किंवा मृत्यूची नोंदणी करता येणार असून, अधिकृत प्रमाणपत्र थेट डाउनलोड करता येणार आहे. तसेच विवाह नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज, आवश्यक कागदपत्रे अपलोड आणि अपॉइंटमेंट घेण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे. आरोग्य विभागाशी संबंधित परवाने, तक्रारी व विविध सेवांची माहितीही पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अर्जाची स्थिती मोबाइलवर पाहता येणार असल्याने नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. दरम्यान, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जलद आणि पारदर्शक सेवा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे मनपा आयुक्त नितीन नार्वेकर यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी या ऑनलाइन सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले

## दोन वैद्यकीय अधिकारी दांम्पत्यांचे कौटुंबिक वाद पोलिस ठाण्यात

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

आपल्या पत्नी आणि मुलाचा छळ करून, सोसायटीत कपडे काढून धिंगाणा घालत त्यांना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या एका वैद्यकीय अधिकाऱ्यावर सातारा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डॉ. परमेश्वर बाबासाहेब घोळवे (३८ वर्ष) असे या संशयित आरोपीचे नाव आहे.

३२ वर्षीय पीडित पत्नीने तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, २०१२ मध्ये त्यांचा विवाह झाला होता. नंतर त्यांना पतीला दारूचे व्यसन असल्याचे समजले. २०२४ मध्ये महिलेच्या भावाने त्यांना एक प्लॉट घेऊन दिला होता. मात्र, हा प्लॉट स्वतःच्या नावावर करण्यासाठी परमेश्वरने पत्नीचा छळ सुरू केला. तो सतत संशय घेऊन मारहाण करत असे. १ एप्रिल



रोजी त्याने सासरच्या मंडळींना मारहाण केली, तर ९ एप्रिल रोजी पुन्हा दारू पिऊन धिंगाणा घालत घर जाळून देण्याची धमकी दिली. पीडितेच्या दाव्यानुसार, लग्नात तिच्या वडिलांनी डॉ. परमेश्वरला १५ लाख रुपये रोख, ११ तोळे सोने आणि सर्व घरगुती साहित्य दिले होते. डॉ. परमेश्वर घोळवे हे सध्या नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. विशेष म्हणजे, जेव्हा पीडिता तक्रार देण्यासाठी मुलासह पोलिस ठाण्याकडे निघाली, तेव्हा त्याने दुचाकीने त्यांना उडवण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

### महिला डॉक्टर- कौटुंबिक हिंसाचाराची बळी

■ दुसऱ्या घटनेत सिडको ठाण्यात एका महिला वैद्यकीय अधिकाऱ्याने आपल्या पतीविरुद्ध तक्रार दिली आहे. ३१ वर्षीय पीडित महिला डॉक्टर असून २०२१ मध्ये त्यांचा विवाह रोहित लहानू गायकवाड याच्याशी झाला होता. स्वतःचे रुग्णालय सुरू करण्यासाठी माहेराहून पैसे आणावेत, या मागणीसाठी सासरच्यांनी त्यांचा छळ सुरू केला. वाद विकोपाला गेल्याने त्यांना मुलासह घराबाहेर काढण्यात आले. याप्रकरणी सिडको पोलिसांनी पती रोहितसह सासरच्या इतर मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कत्तलीसाठी वासरे नेणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**वैजापूर :** कत्तलीसाठी वासरांची वाहतूक करणाऱ्या तिघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवार, १२ एप्रिल रोजी वैजापूर तालुक्यातील नांदगाव शिवारात ही कारवाई करण्यात आली. एका रिक्षातून दोन वासरे कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना ११२ या नंबर मिळाली होती. त्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी रिक्षा क्रमांक (एमएच-२०-बीटी-७६३९) यामधून दोन वासरे घेऊन जात होते. त्यांनी नांदगाव येथून ही वासरे घेतली होती. याप्रकरणी हुसेन खाजेद कुरेशी, नवाज सलिम कुरेशी (रा. खान गल्ली वैजापूर), बाबासाहेब रोठे (रा. नांदगाव) या तिघांवर वैजापूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पंधरा दिवसात तिघांचा अपघाती मृत्यू, नागरिकात भीतीचे वातावरण

## परभणी-गंगाखेड महामार्ग बनतोय 'मृत्यूचा सापळा'

**परभणी / प्रतिनिधी**

तालुक्यातील दैठणा परिसरातून जाणारा परभणी-गंगाखेड महामार्ग सध्या अपघातांचे केंद्र बनला असून, गेल्या पंधरा दिवसांत झालेल्या विविध अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दैठणा येथील ज्येष्ठ महिला अनुसयाबाई कच्छवे (७३ वर्ष) यांचा उपचारादरम्यान शुक्रवार, १० एप्रिल रोजी मृत्यू झाला.

शनिवार, ४ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास त्या महामार्ग ओलांडून दैठणा गावाकडे येत असताना परभणीकडून गंगाखेडच्या दिशेने



जाणाऱ्या चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली होती. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या होत्या.

त्यांच्यावर परभणी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, शुक्रवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. दुसरी घटना मंगळवार, ७ एप्रिल रोजी परभणी-गंगाखेड महामार्गावर तरोडा परिसरात घडली.

बोलेरो वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील एका आदर्श शिक्षकाला आपला जीव गमवावा लागला आहे. ज्ञानोबा कच्छवे असे शिक्षकाचे नाव होते. तिसरी घटना बुधवार, ८ एप्रिल रोजी पहाटे ताडपांगरी शिवारात घडली. यात चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार पलटी होऊन एका माजी शिक्षिकेचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. वाढत्या अपघाताच्या घटनांवर उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

दरम्यान, अनुसयाबाई कच्छवे यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन भावजया, दोन भाचे आणि तीन भाची असा परिवार आहे. या अपघाताची नोंद दैठणा पोलिस ठाणे येथे घेण्यात आली असून, तपास दैठणा पोलिस करत आहेत.

दरम्यान, परभणी-गंगाखेड महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, संबंधित प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

### महामार्गावर गतीरोधक उभारा

■ परभणी ते गंगाखेड महामार्ग सध्या अपघाताचे केंद्र बनला असून गेल्या १५ दिवसात झालेल्या विविध अपघातात तीन जणांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे. भरधाव वेगाने वाहने या मार्गाने धावत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. परभणी ते गंगाखेड महामार्गावर संबंधित विभागाने गतीरोधक उभारुन वेगाने धावणाऱ्या वाहनांना आळा घालावा अशी मागणी दैठणा येथील रहिवासी बाबुराव मोरे यांनी केली आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महिलांना साडी वाटप

**जाफ्राबाद / प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून जाफ्राबाद येथील सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने १३५ विधवा, परित्यक्ता व गरजू महिलांना साड्यांचे वाटप शनिवार, ११ एप्रिल रोजी करण्यात आले. सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा, कोल्हापूर, चापनेर, येवता, डोलखेडा, आरतखेडा, सावंगी, गोंधनखेडा, टेंभूर्णी, आडा भारज आदी परिसरातील विधवा, परित्यक्ता व गरजू महिलांना साड्यांचे वाटप करुन त्यांचा सन्मान करण्यात आला.

दैनिक
महाभूमि
मंगळवार । १४ एप्रिल २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# जालना भूमि

## न्यूज ब्रीफ

### शहरात आज भीमगीतांचा कार्यक्रम

**जालना :** समता सप्ताह ८ ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आप्पासाहेब उगले आणि संचाकडून भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. तसेच याच दिवशी समताप्ताहचा समारोप करण्यात येणार आहे. तरी स्वयंसेवी संस्था व नागरिकांनी सकाळी १० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### महात्मा फुले यांची जयंती उत्साहात

**जालना :** ''विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली'' हा समतेचा आणि शिक्षणाचा मंत्र देणारे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती जगत गुरू श्री संत शिरोमणी रविदास महाराज स्मारक समितीच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या गौरवशाली स्मृतींना विनम्र अभिवादन केले. यावेळी विकास बिल्होरे, पवन पालवे, गौरव भाटिया, रितेश हिरप, मानसिंग चुंडवत, अभिषेक साळुंके, अभिजीत काळे, गणेश जायभाये आदींसह स्मारक समितीचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### निधन वार्ता

### हाजी कामिल देशमुख



**परतूर :** येथील नगरपालिकेचे निवृत्त कर्मचारी हाजी कामिल मेहबूब देशमुख यांचे शनिवार, ११ एप्रिल रोजी रात्री अल्पश: आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. रविवार, १२ एप्रिल रोजी मलंग शाह मरकज मशिदीच्या आवारात त्यांच्या अंत्यविधीची नमाज अदा करण्यात आली, आणि दुपारी जोहरा मासा, कब्रस्तान, दफनभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातू, पंतू असा मोठा परिवार आहे. समाजसेवक परवेझ देशमुख यांचे ते वडील होत.

#### आता घरपोच पाइपलाइनद्वारे गॅसचा मार्ग मोकळा

# जालना होणार सिलेंडरमुक्त!

**जालना/प्रतिनिधी**

आखाती देशातील युद्धाची झळ स्वयंपाक घरापर्यंत बसल्याचे दिसून आले. स्वयंपाकाच्या गॅसच्या टंचाईचे संकट आपल्याकडे ओढवले होते. अजूनही ते पूर्णपणे तळलेले नाही. दरम्यान, गॅस सिलेंडरसाठी नागरिकांची तारेवरची कसरत सुरू असतानाच जालना शहरातील नागरिकांसाठी सुखद धक्का देणारा निर्णय शासनाने घेतला आहे. स्वयंपाकासाठी लागणाऱ्या एलपीजी सिलिंडरच्या कटकटीतून लवकरच कायमची सुटका होणार आहे. शहरात आता पाइपलाइनद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) पुरवठा करण्यास मंजुरी मिळाली असून, घराघरांत थेट गॅस पोहोचवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई येथे राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बैठकीत जालना शहराचा पीएनजी गॅस वितरण योजनेत नुकताच समावेश करण्यात आला. या प्रकल्पासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसी) या कंपनीची निवड करण्यात आली असून, पाइपलाइन उभारणी व वितरण यंत्रणा उभारण्याची जबाबदारी कंपनीकडे सोपविण्यात आली आहे. आता यासाठीचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. युद्धाच्या जागतिक परिस्थितीमुळे एलपीजी सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत होऊन अनेक ठिकाणी टंचाई निर्माण झाली होती. ग्राहकांना रांगा लावूनही सिलिंडर मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारने पर्यायी आणि शाश्वत उपाय म्हणून पीएनजी गॅस पुरवठा वाढवण्यावर भर दिला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत ३० जूनपर्यंत सर्व तांत्रिक परवानग्यांची अनिवार्यता तात्पुरती शिथिल केली आहे. त्यामुळे प्रशासकीय अडथळे दूर होऊन प्रत्यक्ष कामाला वेग मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इंडियन ऑइलकडून लवकरच शहरात खोदकाम व पाइपलाइन टाकण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ केवळ घरगुती ग्राहकांनाच नव्हे, तर हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांनाही होणार आहे. स्वच्छ, सुरक्षित आणि सातत्यपूर्ण गॅस पुरवठ्यामुळे शहराच्या विकासालाही चालना मिळणार आहे.



**गॅस डेपो उभारणार : सविता चौधर**

जालना शहरात पीएनजी गॅस वितरणास अधिकृत मंजुरी मिळाली असून, पहिल्या टप्प्यात पाइपलाइन व वितरण यंत्रणा उभारण्याचे काम ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहरातील औद्योगिक क्षेत्रात गॅस डेपो उभारण्याचाही विचार सुरू आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी दिली.

## प्रशासनाचा कानाडोळा?

#### दैठणा शिवारात दुधना नदीतून अवैध वाळू उत्खनन

**घनसावंगी/प्रतिनिधी**



तालुक्यातील दैठणा शिवारातील दुधना नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या सुमारासही ट्रॅक्टर व हायवा वाहनांच्या साहाय्याने बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. याकडे प्रशासनाचा सोयीस्करपणे कानाडोळा होत असल्याचे दिसून येत आहे.

नदी पात्रातील नैसर्गिक समतोल राखणारी वाळू मोठ्या प्रमाणावर काढून नेल्यामुळे पर्यावरणीय हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नदीचा प्रवाह बदलणे, पाण्याची पातळी खालावणे तसेच परिसरातील शेतीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या अवैध उत्खननाकडे महसूल विभाग व संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दरम्यान, अवैध वाळू माफियांचा दबदबा वाढत असून, प्रशासनाची कारवाई केवळ कागदोपत्रीच मर्यादित असल्याची चर्चा रंगू लागली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकाराची तत्काळ दखल घेऊन अवैध उत्खननावर आळा घालावा, अशी मागणी जोर धरत आहे. जर प्रशासनाने लवकरात लवकर कठोर कारवाई केली नाही, तर याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

## पाडळी गावात दीडशे वर्षांची परंपरा

#### जगदंबा देवीचे सोंग घेऊन संस्कृतीचा अनोखा वारसा

**बदनापूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळी गावात गेल्या दीडशे वर्षांपासून चालत आलेली जगदंबा देवीच्या यात्रेची परंपरा आजही तितक्याच श्रद्धा, उत्साह आणि निष्ठेने साजरी होत आहे. आधुनिकतेच्या झपाट्याने बदलणाऱ्या काळातही या गावाने आपली पारंपरिक ओळख जपली असून, आईचं सोंग घेण्याची अनोखी प्रथाही या यात्रेचे मुख्य आकर्षण ठरते.

या यात्रेनिमित्त गावातील लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वजण आईचे रूप धारण करून कार्यक्रमात सहभागी होतात. रंगीबेरंगी वेशभूषा, पारंपरिक अलंकार आणि भक्तिभावाने भारलेले वातावरण यामुळे संपूर्ण गावात एक वेगळाच उत्सव साकारतो. विशेष म्हणजे, ही परंपरा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित न राहता सामाजिक एकात्मतेचेही दर्शन घडवते. गावातील वयोवृद्धांच्या मते, ही परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालत आली असून, त्यामागे श्रद्धा आणि गावाच्या संरक्षणाची भावना दडलेली आहे. आईच्या कृपेने गावात सुख-समृद्धी नांदावी, या विश्वासाने ही यात्रा साजरी केली जाते. आजच्या डिजिटल युगात अनेक पारंपरिक रूढी लोप पावत असताना, पाडळी गावाने मात्र आपली सांस्कृतिक परंपरा जिवंत ठेवली आहे. खेड्यापाड्यात अजूनही अशा परंपरा टिकून असल्याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. ही यात्रा केवळ धार्मिक विधी नसून, गावाच्या एकात्मतेचा, संस्कृतीचा आणि परंपरेचा जिवंत वारसा आहे. पाडळी गावाने जपलेली ही परंपरा इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.




## बळेगाव घाटावर जेसीबी बुलडोझरने वाळूचा उपसा

**इम्तियाज मणियार**

**शहागड :** अंबड तालुक्यातील बळेगाव व इतर घाटावर महसूल व पोलिस प्रशासनाने धाडसत्र राबवून रेती तस्करीचा पर्दाफाश केला. मात्र, त्यानंतरही अनेक घाटांवर महसूल आणि पर्यावरणाचे नियम पायदळी तुडवून रेतीचा उपसा आणि वाहतूक केली जात आहे. बळेगाव या घाटात चक्क जेसीबी बुलडोझर उतरवून वाळूचे अमर्याद उत्खनन केले जात आहे. जेसीबी, पोकलॅन्ड यासारखी अजस्त्र यंत्रेही घाटावर आहे. मात्र, प्रशासन कारवाई करीत नसल्याने घाटधारकाला पाठबळ कुणाचे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पर्यावरणाच्या कारणातून अनेक वर्षापर्यंत रेतीघाटांचे लिलाव झाले नव्हते. मात्र, शहागडसह परिसरात रेतीची तस्करी जोमात सुरू होती. वाळूघाटांना पर्यावरणाची मान्यता मिळताच प्रशासनाने लिलाव प्रक्रिया पार पाडली. यामध्ये बळेगाव येथील एक, व साष्टपिंपळगाव येथील दोन घाटाचाही समावेश आहे. शहागड येथील पैठण फाटा येथून या घाटावर वर्चस्व ठेवले जात आहे. खनिकर्म विभाग वाळूघाट लिलावानंतर अटी व शर्ती घालून देते. त्यानुसार संबंधिताने त्याचे पालन करणे आवश्यक आहे. नियमाचे पालन होत आहे किंवा नाही, याची खबरदारी संबंधित महसूल यंत्रणेची आहे. परंतु, बळेगाव येथील घाटावर मनमानी पद्धतीने वाळूचे उत्खनन केले जात आहे. या दरम्यान सर्व्हे नंबरची हद्दही ओलांडण्यात आल्याची माहिती आहे. घाटात चक्क जेसीबी बुलडोझर उतरविल्याने नदीपात्राचे अस्तित्व धोक्यात आले आहे. एक मोठी चाळण थेट वाहनावर लावून रेती भरली जात आहे. तसेच उत्खनन केलेल्या रेतीचा स्टॉक मारण्यासाठी जेसीबी सारखी अजस्त्र यंत्रेही घाटावर तैनात केली आहे. दररोज घाटातून अंबड, जालना, संभाजीनगर, बीड विविध जिल्ह्यांत, तालुक्यात तब्बल ४० ते ५० ट्रॅक, टिप्पर धावत आहे. हा संपूर्ण प्रकार नियमाला पायदळी तुडविणारा असतानाही अजूनपर्यंत यंत्रणेने कारवाई केली नाही. त्यामुळे महसूलची पथके गेली कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे.



**विभागीय आयुक्तांकडे तक्रार**

बळेगाव वाळू घाटातून वारेमाप अवैध वाळू उत्खनन व वाहतूक, ठरवून दिलेल्या साठ्यापेक्षा चौपटीने जास्त होत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते अनिरुद्ध झिंजुर्डे यांनी संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केली आहे. त्यामुळे बळेगाव वाळू घाटात चालणाऱ्या अवैध उत्खनन वर महसूल प्रशासन काय कारवाई करते, वाहतूकीवर पोलिस प्रशासन काय कारवाई करणार याकडे नागरिकांच्या नजरा लागल्या आहेत.

## अंमली पदार्थाविरूध्द जनजागृती कार्यक्रम

**जालना/प्रतिनिधी**

अंमली पदार्थाच्या वापराला आळा घालण्यासाठी तसेच त्याच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाची माहिती देण्यासाठी शाळा व महाविद्यालयस्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात यावेत आणि या कार्यक्रमात नशेच्या आहारी जाणार नाही याबाबतची प्रतिज्ञा सर्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांस प्राधान्याने देण्यात यावी.

जिल्ह्यात अंमली पदार्थ प्रकरण उघडकीस आल्यास पोलिस विभागाने वेळोवेळी कठोर कारवाई करुन अंमली पदार्थांची वाहतूक, विक्री तसेच साठवणूक करणाऱ्या व्यक्तीवर कडक कारवाई करावी, असे निर्देशही प्रशासनाच्यावतीने देण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या परिसरात अंमली पदार्थाची विक्री, वाहतुक अथवा साठवणूक होत असल्याचे आपल्या निदर्शनास येताच क्षणी ती माहिती जवळच्या पोलिस स्टेशनला तात्काळ उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले.

## जिल्ह्यातील प्राचीन हस्तलिखितांचे होणार दस्तऐवजीकरण

**जालना/प्रतिनिधी**

भारताचा समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने ज्ञानभारतम् ही महत्त्वपूर्ण योजना हाती घेतली आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यातील मंदिरे, मठ, खाजगी ट्रस्ट आणि वैयक्तिक संग्राहकांकडे असलेल्या जुन्या हस्तलिखितांचे सर्वेक्षण व डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय कार्यात जिल्हावासियांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये आणि खाजगी संग्राहकांच्या सहकार्याने सुमारे एक कोटीपेक्षा अधिक हस्तलिखितांचा संग्रह करण्याचा मानस केंद्र सरकारचा आहे. हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या मार्गदर्शनानुसार ही मोहीम जिल्ह्यात राबविली जात आहे. जिल्ह्यात या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांची जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे सर्वेक्षण केवळ हस्तलिखितांच्या नोंदीसाठी आहे.

मूळ हस्तलिखिते मालकाकडून काढून घेतली जाणार नाहीत, तर त्यांचे केवळ शास्त्रीय पद्धतीने दस्तऐवजीकरण केले जाईल. या मोहिमेसाठी खास ज्ञानभारतम् नावाचे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. ज्या संस्था किंवा व्यक्तींकडे प्राचीन किंवा जुनी हस्तलिखिते उपलब्ध आहेत, त्यांनी या राष्ट्रीय कार्यात प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन

**जालना/प्रतिनिधी**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे शास्त्रोक्त समाधान शोधण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण साहित्य विकसन कार्यशाळेत क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ.गजानन खरात यांनी पालकांना 'दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन' या विषयावर सर्व स्पेशल एज्युकेटर प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. खरात म्हणाले की, पालकांनी या परिस्थितीचा स्वीकार करून पाल्याच्या मर्यादांपेक्षा त्याच्यातील सुप्त गुणांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या प्रसंगी समन्वयक प्रा. सय्यद अख्तर, रवींद्र कदम यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

#### डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत प्रतिपादन

# आंबेडकरी अनुयायांनी वैचारिकदृष्ट्या संघटित व्हावे : शमिभा पाटील

**जालना/प्रतिनिधी**

देशात सध्या क्रांती आणि प्रतिक्रांतीचे प्रवाह एकाच वेळी सक्रिय असून लोकशाही व संविधानविरोधी शक्तींना तोंड देण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी वैचारिकदृष्ट्या संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जळगाव येथील पारलिंगी सामाजिक कार्यकर्त्या शमिभा पाटील यांनी केले.

जालना शहरातील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे रविवार, १२ एप्रिल रोजी रात्री पाचवे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकर रत्नपारखे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून भास्कर दानवे, सुदामराव सदाशिवे, डी. आर. सावंत, अशोक रगडे, मिलिंद कांबळे, व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आपली जबाबदारी या विषयावर बोलताना शमिभा पाटील म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित-वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला आणि समता, स्वातंत्र्य व बंधुता ही मूल्ये रुजवली. पितृसत्ताक व्यवस्था व अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा त्यांनी दिली. त्यांच्या रक्तविहीन क्रांतीमुळे वंचित समाजाच्या जीवनात परिवर्तन घडले. आजपर्यंत अनुसूचित जाती-जमातींमध्ये अपेक्षित एकजूट निर्माण झाली नाही. त्यामुळे संविधानातील आरक्षण व्यवस्थेवर आघात करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बदलत्या परिस्थितीत आंबेडकरी चळवळीची धार काहीशी बोथट झाल्याची खंत व्यक्त करत त्यांनी आंबेडकरी विचारांचा पंतप्रधान देशाला मिळाला नाही, हेही वास्तव अधोरेखित केले. यावेळी मिलिंद कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. शशिकांत पाटील यांनी केले. संजय हेरकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ॲड. बी. एम. साळवे, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, राम गायकवाड, राम साळवे, ॲड. चत्रे, सुनील साळवे, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, डॉ. कालीदास सूर्यवंशी, डॉ. विजय कुमठेकर, डॉ. प्रियदर्शन भवरे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**परिवर्तनासाठी पंचसूत्रीचा उपयोग करा**


आंबेडकरी अनुयायांनी आता ठोस राजकीय भूमिका घेत लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र यावे, तसेच बाबासाहेबांचे विचार गावोगावी, तांडा-वस्त्यांपर्यंत पोहोचवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ पुस्तकांपुरते विचार मर्यादित न ठेवता ते समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावेत, असे आवाहनही त्यांनी केले. सामाजिक परिवर्तनासाठी पंचसूत्रीचा अवलंब करून प्रत्येकाने जबाबदारीने वागावे, असेही त्या म्हणाल्या.









नेत्र परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. शोन चिंचोले : ५१वे अध्यक्ष म्हणून स्वीकारला पदभार

# बुलढाण्याचा भूमिपूत्र करणार विदर्भाचे नेतृत्व

**बुलढाणा/ प्रतिनिधी**

नेत्रतज्ञ व समाजकार्यात अग्रेसर येथील डॉ.शोन चिंचोले यांची विदर्भ नेत्र परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यवतमाळ येथे हा पदग्रहण सोहळा पार पडला.

विदर्भ नेत्रपरिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ५१ वे अध्यक्ष म्हणून डॉ. शोन चिंचोले यांनी पदग्रहण केले. यवतमाळ येथे पार पडलेल्या या समारंभात नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यामध्ये डॉ. बाहेती , डॉ. रेवणवार आणि डॉ. सुबोध पुरोहित यांचे मोलाचे योगदान लाभले.या पदग्रहण सोहळ्यात अखिल भारतीय नेत्र परिषदेच्या सायंटिफिक कमिटीच्या चेअरमन डॉ. प्रा. नम्रता शर्मा यांच्या हस्ते पदग्रहण पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री प्रा. डॉ. टी. पी. लहाने यांनी मार्गदर्शन केले, तर यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांनी उपस्थितांना संबोधित केले. डॉ. प्रा. रागिणी पारेख तसेच विदर्भातील विविध जिल्ह्यांतील अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. प्रसंगी नेत्रविकारांवर आधारित विशेष शास्त्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या सत्रामध्ये बाल नेत्रदोष, मोतीबिंदूवरील आधुनिक उपचार पद्धती, प्रगत तांत्रिक शस्त्रक्रिया तसेच विविध नेत्रविकारांबाबत सखोल माहिती देण्यात आली. जनजागृती अभियानाद्वारे सर्वसामान्यांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.विदर्भ नेत्रपरिषदेच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा स्व. डॉ. गंदेवार ओरिएशन अवॉर्ड यंदा डॉ. हेमनशू मटालिया यांना प्रदान करण्यात आला.यावेळी मावळते अध्यक्ष डॉ. विरल शहा, सचिव डॉ. शमिक मुकदम आणि कोषाध्यक्ष डॉ. दळणकर यांनी आपला पदभार नवनिर्वाचित कार्यकारिणीकडे सुपूर्द केला.




## अशी आहे नुतन कार्यकारिणी

■ नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारिणीत अध्यक्ष डॉ. शोन चिंचोले, उपाध्यक्ष डॉ. अतुल काढणे, सचिव डॉ. सुबोध पुरोहित, कोषाध्यक्ष डॉ. शामिक आंबटकर, सहसचिव डॉ. सौरभ मुंदडा, चेअरमन सायंटिफिक कमिटी डॉ. राहुल तिवारी सह चेअरमन डॉ. नेहा देशपांडे तर सदस्य डॉ. नवीन सोनी, डॉ. रोहिणी जुनेजा, डॉ. निखिल कुंडुरवार आणि कार्यकारी समिती सदस्य डॉ. शुभम मालपाणी, डॉ. मुर्तुजा हुसेन, डॉ. आयुष सांगोळे, डॉ. राधिका लोखंडे , डॉ. सोनल आंबटकर, डॉ. अमृता वैरागडे, डॉ. प्रतिमा विश्वकर्मा, डॉ. अपर्णा गुप्ता, डॉ. प्रफुल डाके, डॉ. स्मिता चव्हाण यांची निवड करण्यात आली. पर्यवेक्षक समिती सदस्य डॉ. शुभांगी भावे, डॉ. धनंजय मोडक, डॉ. दिलीप जोगनपुत्रा, डॉ. दीपक बत्रा, डॉ. गोपाल अरोरा, डॉ. अनिल हरवानी, डॉ. अनुराधा राठोड, डॉ. तोटे यांची निवड करण्यात आली.

विदर्भातील नेत्रसेवा अधिक सक्षम, आधुनिक व जनसामान्यांपर्यंत पोहोचविणार आहे. विशेषतः बाल नेत्रदोष निवारण, मधुमेह व रक्तदाबामुळे होणाऱ्या नेत्रविकारांवरील जनजागृती, तसेच काचबिंदू प्रतिबंध व उपचार यावर भर देण्याची आवश्यकता आहे. अनधिकृत व भोंदू वैद्यकीय उपचारांवर आळा घालण्यासाठी संघटित प्रयत्न करुया.

**– डॉ. शोन चिंचोले**
नेत्रतज्ञ, बुलढाणा

# जिजामाता महाविद्यालयात वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बुलढाणा/ प्रतिनिधी**

जिजामाता महाविद्यालयात ११ एपिल रोजी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेद्वारे निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. नितीन चांगोले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

बीकॉम अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष वाणिज्य व व्यवस्थापन शाखाप्रमुख डॉ. सुरेश नामदेव गवई होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कला शाखाप्रमुख डॉ.जे. जे. जाधव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. सुबोध चिंचोले उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. गणेश किरोचे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यक्रम आयोजनामागे उद्देश आणि प्रमुख मार्गदर्शक यांचा परिचय करून देण्यात आला. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक डॉ. जे.जे.जाधव यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात यश संपादन करण्यासाठी नियोजन खूप आवश्यक आहे. त्यासाठी वेळेची बचत करून योग्य नियोजन केल्यास तुम्ही जीवनामध्ये यशस्वी होऊ शकता यासंदर्भात मार्गदर्शन केले.




श्रुती तायडे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यापासून आजपर्यंतच्या प्रवासापर्यंत महाविद्यालयात मिळालेले विविध अनुभव सांगितले. पल्लवी जाधव हिने मनोगत व्यक्त केले. वाणिज्य शाखेच्या प्रत्येक शिक्षकांकडून मिळालेल्या ज्ञानाचा एक अनुभव कवितेतून शब्दात मांडला. डॉ. सुबोध चिंचोले यांनी आपले विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सुरेश गवई यांनी विद्यार्थ्यांना अथक परिश्रम करून यश प्राप्त करा व स्वतः चे आणि आपल्या परिवाराचे तसेच महाविद्यालयाचे नाव उंचवा, असे आवाहन केले. आभार विद्यार्थिनी खर्चे हिने मानले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयामधील डॉ. मनीषा राऊत, प्रा. डी. बी. माने, प्रा. संजय सावळे, प्रा. विकास पहुरकर, डॉ. भरत जाधव. प्रा.दीपक चव्हाण, प्रा. दीपेंद्र परमार तसेच वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# चिमुकल्या शास्त्रज्ञांच्या डोळ्यांत उज्वल भारताचे स्वप्न : शेळके

## जिजाऊ ज्ञानमंदिरमध्ये विज्ञान मेळावा

**पिंपळगाव सराई :** चिमुकल्या शास्त्रज्ञांच्या डोळ्यांतील उत्साह उद्याच्या उज्ज्वल भारताची साक्ष देत असल्याचे प्रतिपादन संस्थाध्यक्ष संदीप शेळके यांनी केले.

पळसखेड भट येथील जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन त्यांनी पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी अप्रतिम विषय मांडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले कल्पक प्रकल्प पाहून शेळके यांनी कौतुक केले. आजच्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर प्लांट, विंड मिल आणि ऑटोमॅटिक हॅन्ड वॉश स्टेशन यांसारखे अप्रतिम विषय मांडले होते. प्राथमिक गटात शिवाय विष्णू बांडे याच्या हायड्रोलिक पावर प्लांटला प्रथम क्रमांक मिळाला. मो. जिआन मो. साजीद याने सादर केलेला ईन्ड मिल प्रकल्प द्वितीय तर समर्थ नीलेश मोरे फोटो सिंथेसिस मॉडेलला तृतीय क्रमांक मिळाला. माध्यमिक गटात मो. अयान मो. जावेदचा कार चार्जिंग स्टेशन प्रकल्प प्रथमस्थानी राहिला. पार्थ काळे याने सादर केलेला ऑटोमॅटिक हॅन्ड वॉश द्वितीय तर शिवम अमोल बिलारी याच्या इलेक्ट्रिक रोबोटला तृतीय क्रमांक मिळाला. के.जी. सेक्शनमधून देवांश भागवत कोरडे याने सादर केलेल्या वर्किंग व्होलकॅनोला प्रथम, आरुष शेळके, अनुश्री सुसर, शंभूराज सोनुने, आराध्या सिरसाठ यांच्या लाईफ सायकल ऑफ बटरफ्लायला द्वितीय, तर राजवी गोपाल पाटीलच्या सेन्स ऑर्गनला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. सर्व विजेत्यांना पारितोषिक वाटप करण्यात आले.



## 'आरोपीस अटक करा अन्यथा आत्मदहन'

**बुलढाणा :** अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार दाखल गुन्ह्यात अद्यापपर्यंत ठोस कारवाई झाली नसल्याच्या निषेधार्थ अण्णाभाऊ साठे सोशल फोरमच्यावतीने १३ एप्रिल रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांना निवेदन देण्यात आले. आरोपींना अटक करण्यात यावी, अन्यथा आत्मदहणाचा इशारा जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण शिंदे यांनी दिला. निवेदनात नमूद केल्यानुसार, भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, मंदार बाहेकर व इतरांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हा गुन्हा दाखल होऊनही दीर्घ कालावधी उलटून गेला. अद्यापपर्यंत कोणतीही ठोस व निर्णायक कारवाई करण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

# उच्च शिक्षणातील अंतर्गत गुणवत्ता वाढीवर कार्यशाळा

## आयक्यूएसी व नॅक विभागाचे आयोजन


**धामणगाव बढे / प्रतिनिधी**

येथील राजे छत्रपती कला महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे उच्च शिक्षणातील अंतर्गत गुणवत्ता वाढीवर एकदिवसीय कार्यशाळेचे आयक्यूएसी व नॅक विभागामार्फत आयोजन करण्यात आले होते. संस्थाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. महादेव रिठे यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाची आजपर्यंत झालेली वाटचाल, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्राध्यापकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व महाविद्यालयाची यशोगाथा यासंदर्भात विश्लेषण केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुबोध चिंचोले व डॉ. विकास पहुरकर उपस्थित होते. डॉ. विकास पहुरकर यांनी व्याख्यानामध्ये भविष्यकाळातील व भूतकाळातील स्थितीचे विश्लेषण करत उच्चशिक्षण क्षेत्रातील झालेले बदल यासंदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. सुबोध चिंचोले यांनी यूजीसी, नॅक, उच्च शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रमामध्ये झालेले बदल याबाबत माहिती दिली. बदल स्वीकारत असतांना ते कोणत्या पद्धतीने शिकवले पाहिजे, अध्ययन अध्यापन करत असतांना रोजगार कसा निर्माण होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग रोजगार प्राप्तीसाठी झाला पाहिजे, यासाठी महाविद्यालयाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम यांनी यूजीसी आणि विद्यापीठाच्या आदेशानुसार महाविद्यालय वेगवेगळ्या प्रकारच्या योजना तयार करत असतात. त्यापद्धतीने महाविद्यालयात सुद्धा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष, एनएसएस त्याचप्रमाणे शासनाने दिलेल्या दिशा निर्देशानुसार वेगवेगळे उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी तसेच येणाऱ्या काळामध्ये त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या प्रकारचा अभ्यास करणे कार्यशाळा तसेच कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेमध्ये डॉ. शाहेदा नसरीन, डॉ. विजय मोरे, डॉ. स्वप्निल दांदडे, डॉ. दीपक लहासे, डॉ. कामिनी मामर्डे, डॉ. गजानन वानखडे, डॉ. नितीन जाधव यांनी सहभाग नोंदविला. संचालन डॉ. स्वप्निल दांदडे यांनी केले तर आभार प्रा. शशिकांत सिरसाट यांनी मानले.

# दैनिक महाभूमि शब्दसंगम 939



### आडवे संकेत

१) विख्यात साहित्यिक, नाटककार वसंत कानेटकरांची एक प्रसिद्ध ऐतिहासिक साहित्यकृती
७) ढगाला आपला दूत समजून प्रेयसीला त्याच्याद्वारा निरोप धाडणारा महाकवी
१०) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
१२) उंट हांकणारा
१३) संधान, हेतू
१४) हरिणातील कुरंग गटात वर्गवारी होणारे व भारतातील शुष्क प्रदेशात आढळणारे हरिण
१५) कथा, गोष्ट
१६) धुणे
१७) ठीक आहे या अर्थाचा एक शब्द
१८) श्रीरामाचा जयघोष, श्रीराम ......
२१) देवाचे पादोदक
२२) श्रीकृष्णाने या ऋषींच्या आश्रमात शिक्षण घेतले
२४) रामायणातील एक दशरथ पुत्र
२५) श्रीमानचे संक्षिप्त रूप
२६) संध्याकांळी देवापुढे लावलेला दिवा
३१) रुची, आस्वाद
३२) तुलसीदासांनी रचलेले रामायणावरील काव्य
३७) कासोटा, ओटी, कंबर
३९) खूप जास्त पाणी घातलेले ताक
४१) यज्ञकर्म करणारा
४२) फार उष्ण
४३) सुंदर स्त्री
४५) हिंदीतील एक सन्मानदर्शक संबोधन
४६) आजोबा
४७) नम्र, झुकलेला
४८) नांगर, लांब व अरुंद चर
४९) भाद्रपद, हिंदू वर्षाचा सहावा महिना
५१) १८७२ साली महाराष्ट्रात पहिला औषधी कारखाना या ठिकाणी निर्माण करण्यात आला
५३) फार मोठे, विस्तीर्ण, लष्करी युद्धासंबंधीचे
५४) पाणी, जल
५५) बंदुकीचा घोडा, कळ
५७) भांडण, चर्चा
५८) फळयावर लिहिण्याची लेखणी
५९) दाताखाली एखादा खडा आल्यास होणारा आवाज, त्रास
६१) नाही म्हणणे
६३) ताठा, गुर्मी, जोर
६६) पौष्टिक, सत्वयुक्त
६८) दक्षिणेतील एक थंड हवेचे ठिकाण
६९) संगीतातील तिसरी श्रुति, घोड्याचा लगाम, एखाद्या मुलीचे नाव
७०) कलह, वाद
७२) मदांध, उन्मत्त
७४) बॉबी देवल, ट्विंकल खन्नाचा पहिला हिंदी चित्रपट
७६) फुलांतील रस गोळा करणारा
७७) राजकारणाशी संबंधित असलेले
८०) नामाचा क्रियापदाशी असणारा संबंध
८२) सूर्य, ताप देणारा
८३) जैन धर्माचे संस्थापक

### उभे संकेत

१) पशु-पक्ष्यांच्या कथाद्वारे सांगितलेल्या बुद्धी व चातुर्याच्या गोष्टी
२) चाळे, तऱ्हा
३) भाऊबीजेला भावाने बहिणीला दिलेली भेट
४) सौंदर्य, शोभा, अमिताभचा एक चित्रपट
५) स्वातंत्र्यपूर्व काळात लाहोरच्या सायमन कमिशनविरोधी मोर्चाचे नेते
६) हरिणीच्या डोळ्यांसारखे सुंदर डोळे असलेली स्त्री
७) वडिलांचा भाऊ
८) १८६१ ते २०२२ इटलीच्या चलनात असलेले नाणे
९) आप्तस्वकीय
११) दहावा हिस्सा
१४) अष्टविनायकांपैकी थेऊरचा गणपती
१७) बकरा
१९) जिंकणे
२०) सामर्थ्य, तथ्य
२२) संध्याकाळी गाय-म्हशींची काढलेली दुधाची धार
२३) दीपक
२६) साचविलेले पाणी
२७) कोकिळेने काढलेला पंचम स्वर
२८) सत्पुरुष साधू
२९) शहरात आयात होणाऱ्या मालावरील कर
३०) लोकमान्य टिळकांनी तुरुंगात असताना लिहिलेली श्री भगवत् गीतेवरील टीका
३३) माळा, माडी
३४) कपडे धुण्याचे एक साबण उत्पादन
३५) भ्रमाने उत्पन्न केलेली सृष्टी
३६) भारतीय क्रिकेट जगतातील वंडर ब्वॉय
३८) जगदंबेचे एक जागृत ठिकाण
४०) पंकज, नीरज
४४) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून निघणारा स्त्राव
४६) अर्ज, निवेदन
४९) गाड्यांवर किंवा प्राण्यांच्या पाठीवर सामान कसून बांधण्याचा दोर
५०) वाणी, बोलण्याचे इंद्रिय
५२) नवीन
५३) दिल्लीतील एक प्रसिद्ध वास्तू
५४) हीन प्रवृत्तीचा, हलकट
५६) मार्ग, रस्ता
६०) लहानसे युद्ध, ठिणगी पाडण्याचा दगड
६२) कावळा
६४) एक पुरातनकालीन शस्त्र
६५) सतत न थांबता
६७) वृत्तपत्रात नियमित प्रकाशित होणारे वृत्त
६८) पुर्वार्धानंतरचा भाग
७१) दाबून टाकणे
७३) विश्वास, ठाम मत (हिंदी)
७५) मूर्तिमंत आकारण
७८) संग्रह, जमविणे
७९) मृत्यूदेवता
८१) त्रास, परिश्रम (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दव्यूहचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हे | श | मां | ज | रे | क | र | | कु | मा | रि | क्र | | अ | जे | बा |
| ह्य | | कु | | प्त | | म | ज | कू | र | | क्त | | अ | र्ज | | |
| रा | ज | नी | ति | | प | लि | त | | ण | | ह | स्त | व्य | व | स | य |
| ष्ट्र | | | | ल | | नी | | अ | | अ | स्त | | व | | द | म |
| | शे | ला | पा | गो | टे | | दे | वां | ग | ना | | अ | स्थि | र | | |
| बे | त | | दो | री | | नि | य | त | | र | क्त | पा | त | | बे | ट |
| | स | | द | | से | य | | र | सि | क | | य | | पा | ल | क |
| अ | रा | ज | क | ता | | त | प्त | | ता | ली | म | | पा | न | गा | |
| म | | न्म | | प | र | क्र | | पा | रा | | त्स्य | | ण | | मी | रा |
| रा | धा | | उं | ट | | लि | पि | क | | स्त्री | | क | पो | ल | | म |
| व | | कों | ब | | वि | क | ल | | स | | स | म | ई | | धं | दा |
| ती | | | र | स | ळ | | र | ज | ई | | स | न | | वि | | स |
| | क | म | ठा | | खा | क | | ल | प | णे | | शि | ला | ले | ख | |
| चौ | रं | ग | | र | | ला | ख | | रां | | र | बी | | प | ड | वी |
| | ग | र | ज | वं | त | | | मा | ज | | हि | | दा | न | त | |
| स | ळी | | न | थ | | | अ | न | पे | क्षि | त | | ता | | र | म |

uday munde - 8446302691

## आमदार खरात यांची बुद्धविहाराला भेट

**मेहकर :** आमदार सिद्धार्थ खरात यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या पार्श्वभूमीवर लोणार येथील बुद्ध विहाराला भेट देऊन पाहणी केली.

भेटीदरम्यान त्यांनी बुद्ध विहार परिसरातील सुविधांचा आढावा घेतला. तसेच येथील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारणे आणि परिसर प्रकाशमय राहावा म्हणून हायमास्ट लाईट बसविण्याचे आश्वासन दिले.

## संगीत शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**बुलढाणा :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,मुंबई द्वारा पं.विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संगीत शिक्षक व परीक्षक यांच्या करिता प्रशिक्षण कार्यशाळेचे २३ व २४ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक सहकार विद्या मंदिरमध्ये ही कार्यशाळा होणार आहे.

शास्त्रीय गायन, वादन, तबला, कथ्थक, भरतनाट्यम व ओडिसी विषयाची परीक्षाप्रणाली अधिक प्रभावी, सुव्यवस्थित व गुणवत्तापूर्ण बनविण्याकरिता तसेच मूल्यांकन प्रक्रिया पारदर्शक व्हावी यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबईचे अध्यक्ष बाळासाहेब सूर्यवंशी, रजिस्ट्रार विश्वास जाधव यांचेसह संगीत क्षेत्रातील विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी अरविंद टाकळकर, काशिनाथ तायडे, कैलास कोल्हे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक महाभूमि

मंगळवार । १४ एप्रिल २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com

# अकोला - वाशिम भूमि

## न्यूज ब्रीफ

### नाल्यांची कामे निकृष्ट दर्जाची

**अकोला :** मलकापूर परिसरात गेल्या काही दिवसांत झालेली नाल्यांची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. नुकत्याच करण्यात आलेल्या नाल्यांच्या बांधकामाला काही दिवसांतच तडे गेले असून अनेक ठिकाणी सिमेंट उखडल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यापूर्वी नाले सक्षम करण्याच्या उद्देशाने मनपाकडून कामे सुरू करण्यात आली असली तरी ठेकेदारांकडून दर्जाहीन साहित्याचा वापर होत असल्याचा आरोप होत आहे.

### डॉ. आंबेडकर जन्मोत्सव सोहळा

**मूर्तिजापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पंचशील मित्र मंडळ, रेल्वे कॉलनी राजगृह नगर यांच्यावतीने जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रेल्वे कॉलनी, मूर्तिजापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### कारंजा–मूर्तिजापूर रोडवर अपघात

**कारंजा :** कारंजा–मूर्तिजापूर रोडवरील नायरा पेट्रोल पंपासमोर दुचाकी आणि मालवाहू ऑटो यांच्यात अपघात होऊन तिघेजण जखमी झाल्याची घटना १२ एप्रिल रोजी रात्री ७.३० वाजताच्या सुमारास घडली. अपघाताची माहिती सर्वधर्म आपत्कालीन संस्थेच्या (सास) कंट्रोल रूमला मिळताच त्यांनी जय गजानन रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक विजय पांढरे यांना तात्काळ घटनास्थळी रवाना केले. या अपघातात साजिद खान एजाज खान (१८), किशोर किसनराव टागले (४०) व इसमोद्दीन युदबोद्दीन (३५, सर्व रा. कामरगाव) हे जखमी झाले.

### शेलुबाजारात सराफा दुकानांत चोरी

**शेलुबाजार :** मालेगाव रोडवरील मुख्य बाजारपेठेत रविवारी मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्यांनी दोन सोनार दुकानांवर धाडसी चोरी केली. चिंतामणी अलंकार केंद्र व आदिती अलंकार केंद्र यांची शटर तोडून बेंटेक्स दागिने, रोख रक्कम तसेच महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेण्यात आली. याचवेळी सिद्धेश्वर ज्वेलर्स व अंजनकर ज्वेलर्स येथे चोरीचा प्रयत्न अयशस्वी ठरला. गर्दीच्या नागपूरसंभाजीनगर मार्गालगत घटना घडल्याने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

महापालिका सभागृहात गोंधळ ; मध्यस्थीने परिस्थिती नियंत्रणात

# मनपा स्थायी समितीच्या बैठकीत भाजप–शिंदेसेना आमने–सामने

**अकोला / प्रतिनिधी**



महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत सोमवार १३ एप्रिल रोजी मोठा गोंधळ उडाल्याची घटना घडली. विकासकामांच्या दर्जाच्या मुद्द्यावरून भाजप आणि शिंदे गटाच्या शिवसेनेतील पदाधिकारी आमने–सामने आल्याने सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनंतर स्थायी समिती सभागृहात ही बैठक पार पडत होती. यावेळी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल आणि शिंदे गटाच्या शिवसेनेचे गटनेते सागर भारुका यांच्यात तीव्र वाद झाला. दोघांमध्ये शाब्दिक चकमक होऊन परिस्थिती चिघळल्याचे समजते. बैठकीदरम्यान वाद इतका वाढला की दोन्ही नेते एकमेकांच्या अंगावर धावून गेल्याचे सांगितले जाते. या वेळी उपस्थित सदस्य आणि पोलिसांनी मध्यस्थी करत परिस्थिती



नियंत्रणात आणली. भाजपचे गटनेते पवन महले यांनीही हस्तक्षेप करत संभाव्य हाणामारी टाळल्याची माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे.

### महापालिका परिसरात तणाव ; पोलिस बंदोबस्त वाढवला

■ घटनेनंतर महापालिका परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती लक्षात घेता पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सत्ताधारी भाजप आणि शिंदे गटातील शिवसेना यांच्यातील या वादामुळे दोन्ही पक्षांतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवाय पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांमध्ये गोधंळाची स्थिती दिसून येत आहे.

### निलंबनाचे आदेश ; सदस्याला बाहेर काढले

■ बैठकीत गोंधळ वाढल्याने संबंधित सदस्याला निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर त्यांना सभागृहाबाहेर काढण्यात आले. या कारवाईनंतर सभागृहात काही काळ तणाव कायम होता.

### शिवीगाळीचे आरोप ; प्रतिक्रिया नाही

■ या घटनेदरम्यान शिवीगाळ झाल्याचा आरोप सागर भारुका यांनी केला आहे. मात्र या प्रकरणावर सत्ताधारी पक्षाकडून किंवा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्याकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

> सभेमध्ये सागर भारूका हे मागच्या बैठकीतून बैठकीतून निघूल गेले होते. मागच्या बैठकीची चर्चा आज होऊ शकत नाही. मागच्या बैठकीचा विरोध आज कसा नोंदविला जाईल. ते ज्या अधिकाऱ्यांबद्दल वारंवार बोलतात, अधिकाऱ्याला दडपणात घेण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी त्यांना १५ दिवसांसाठी निलंबित केले आहे.
>
> – **विजय अग्रवाल**, सभापती, स्थायी समीती, मनपा, अकोला

> यांच्या चोऱ्या आता चालत नाहीत. त्यावर प्रश्न विचारले तर सभापतींनी शिविगाळ केली. सभागृहात अशी भाषा त्यांना शोभत नाही. ते जबाबदारीने काम करत नाहीत.
>
> – **सागर भारूका**, नगरसेवक, शिवसेना (शिंदेगट), अकोला

---



# वाघाची पुन्हा दहशत ; वारखेडमध्ये गाय ठार

तातडीने उपाययोजनांची मागणी

**गोकुळ हिंगणकर**

**तेल्हारा :** तालुक्यातील वारखेड शिवारात पुन्हा एकदा वाघाच्या हल्ल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुभाष म्हसाये यांच्या शेतात घडलेल्या या घटनेत एका गायीचा आणि एका गोऱ्ह्याचा जागीच मृत्यू झाला. सकाळी शेतात गेल्यावर हा प्रकार उघडकीस आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून या भागात वाघाच्या हालचाली दिसून येत होत्या. रात्रीच्या वेळी जनावरांवर हल्ले होण्याचे प्रकार वाढले असून ग्रामस्थ सतर्कतेत आहेत. मात्र, ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली असली तरी वाघाला पकडण्यासाठी कोणतीही ठोस मोहीम हाती घेतली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. ''वन विभाग नरबळीची वाट पाहत आहे का?'' असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.परिसरातील शेतकरी व नागरिकांनी तात्काळ वाघाला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. तसेच जनावरांचे होणारे नुकसान थांबवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी होत आहे. रात्रीच्या वेळी शेतात जाण्यास नागरिक घाबरत असून भीतीचे सावट कायम आहे. दरम्यान, वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत असल्याचे सांगितले आहे.

---

# अपूर्ण कामांवर कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट करणार

**अकोला / प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या अपूर्ण बांधकामे आणि इतर कामांबाबत कठोर भूमिका घेत अकोला महानगरपालिकेच्या आमसभेत संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

सोमवार १३ एप्रिल रोजी पार पडलेल्या आमसभेत शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी अनेक कंत्राटदारांनी प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार काम न केल्याचे तसेच ठरलेल्या मुदतीत कामे पूर्ण न केल्याचे निदर्शनास आले. यावर नगरसेवकांनी चर्चा करून संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्यास समर्थन दर्शविले. घंटागाडी व्यवस्थापनाबाबतही आमसभेत चर्चा झाली.

---

# एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील निर्बंधाचा निषेध : बहाळे

**अकोला / प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारकडून एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या वाहतुकीवर निर्बंध आणण्याच्या निर्णयाचा शेतकरी संघटनेने तीव्र निषेध नोंदवला आहे. या निर्णयामुळे राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचा आरोप संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित बहाळे यांनी केला.

मध्यवर्ती बसस्थानकाजवळील शासकीय विश्रामगृह येथे सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही भूमिका मांडली. या वेळी अविनाश पाटील नाकट (जिल्हाध्यक्ष, अकोला), विलास ताथोड , सुरेश जोगळे, विनोद पाटील मोहोकार आदी उपस्थित होते. कृषी विभागाने कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये इतर राज्यांतून येणाऱ्या एचटीबीटी बियाण्यांवर नियंत्रणासाठी समित्या स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय वास्तव परिस्थिती आणि कृषी अर्थशास्त्राच्या विरोधात असल्याचे बहाळे यांनी सांगितले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना केवळ एफ–२ पिढीची बियाणे वापरण्याची वेळ येईल, जी उत्पादनाच्या दृष्टीने कमी दर्जाची असल्याचा दावा त्यांनी केला. एचटीबीटी बियाण्यांचा वापर गेल्या सात वर्षांपासून सुरू असताना अचानक घेतलेल्या या निर्णयामागे आर्थिक अनियमिततेच्या चर्चांना अधिक बळ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. या संदर्भात मोठ्या आर्थिक व्यवहारांच्या अफवा देखील पुढे येत असल्याचे सूचित केले.

### १० जूनला सत्याग्रह ; मोर्चाची घोषणा

■ शेतकरी संघटनेने १० जून २०१९ रोजी सुरू केलेल्या ''किसान तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह''च्या पार्श्वभूमीवर यंदा १० जून २०२६ रोजी नंदुरबार–गुजरात सीमेवर मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली आहे. या मोर्चात शेतकरी एचटीबीटी बियाणे हातात घेऊन सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

### सरकारसमोर प्रमुख मागण्या

- एचटीबीटी बियाण्यांवरील निर्बंध त्वरित मागे घ्यावेत.
- शेतकऱ्यांचा तंत्रज्ञान वापरण्याचा अधिकार मान्य करावा.
- उत्पादनवाढ आणि बाजार सुधारणा यावर भर द्यावा.

---

### भीमजयंतीचा झगमगाट



**वाशिम :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या अनुषंगाने वाशिम शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भीमजयंतीच्या पूर्वसंध्येला सोमवारी रोषणाई करण्यात आली. महामानवांच्या पुतळ्याची स्वच्छता करून आकर्षक सजावट करण्यात आली असून, रंगीबेरंगी विद्युत दिव्यांच्या प्रकाशात संपूर्ण चौक परिसर दिमाखात उजळून निघाला.

---

# कारंजात कांगारपुरा परिसरात भीषण आग ; ३५ लाखांचे नुकसान

**कारंजा / प्रतिनिधी**

शहरातील कांगारपुरा या दाट लोकवस्तीच्या परिसरात रविवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत कापूस गोदाम व फर्निचर दुकान जळून खाक झाले असून सुमारे ३५ लाखांहून अधिक नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, कांगारपुरा परिसरात जमील मन्सूरी यांच्या मालकीचे कापूस गोदाम व फर्निचर दुकान आहे. रविवारी रात्री अचानक आग लागून काही क्षणांतच तिने रौद्ररूप धारण केले. धुराचे प्रचंड लोट परिसरात पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेकांनी प्रसंगावधान राखत घरातील गॅस सिलिंडर व ज्वलनशील वस्तू सुरक्षितस्थळी हलविल्या. घटनेची माहिती मिळताच कारंजा नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आग नियंत्रणात आणण्यासाठी चार अग्निशमन वाहने पाचारण करण्यात आली. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आली आणि आसपासच्या घरांपर्यंत पसरण्यापासून रोखण्यात यश आले.







---

‘स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी’ विषयावर व्याख्यान

# अपयशातूनच यशाचा मार्ग निघतो : प्रा. कांगणे

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

अपयश हेच मानवाला यशस्वी बनवू शकते. अपयशाकडे नकारात्मक दृष्टीने न पाहता, त्यातून शिकून पुढे जाण्याची जिद्द ठेवली तर यश निश्चित मिळते, असे प्रेरणादायी प्रतिपादन प्रा. विठ्ठल कांगणे यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जंयती निमित्त आयोजित ''स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी'' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. हजारोंच्या संख्येने विद्यार्थी



उपस्थित राहिल्याने सभागृह अपुरे पडले असून, अनेक विद्यार्थ्यांनी उभे राहून संपूर्ण व्याख्यान ऐकले. यावरून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत वाढती जागरूकता आणि उत्सुकता दिसून आली. प्रा. कांगणे यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी सातत्य, शिस्त आणि योग्य नियोजन यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी अभ्यासाची योग्य पद्धत, वेळेचे व्यवस्थापन, अभ्यासक्रमाचे नियोजन, तसेच मानसिक ताण–तणाव कसा हाताळावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ‘आजचा विद्यार्थी डिजिटल युगात वावरत असला तरी माहितीच्या ओघात योग्य निवड करण्याची क्षमता विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. तसेच, त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढविण्यावर भर देत, अपयश हे यशाची पहिली पायरी असल्याचे स्पष्ट केले. ''स्पर्धा परीक्षेत अपयश आले तरी खचून न जाता, चुका ओळखून त्यात सुधारणा करणे आणि पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे,'' असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माया नाईक (जि. प. शिक्षण व आरोग्य सभापती, अकोला) होत्या, तर उद्घाटन संजय नाईक यांच्या हस्ते पार पडले. आपल्या अध्यक्षीय भाषणात माया नाईक यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा सल्ला दिला.

### यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

■ या वेळी शासकीय सेवेत निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील परिश्रम आणि संस्थेचे मार्गदर्शन याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रदर्शन रवि गोंडकार यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन अंबेचरण ननीर यांनी प्रभावीपणे केले. प्रा. गजानन वर्धट, ज्ञानेश टाले, सुनिल सरदार ( ता. अध्यक्ष वंचित ), नगरसेविका शुभांगी सरनाईक यांचीही यावेळी उपस्थिती लाभली. एकूणच, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला असून, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना नवचैतन्य देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## न्यूज ब्रीफ

### धावत्या ट्रकला आग, मोठे नुकसान

**खामगाव :** नांदुरा येथून दिल्लीकडे जाणाऱ्या ट्रकला पारखेड फाट्याजवळील बायपासवर अचानक आग लागल्याची घटना ११ एप्रिल रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. चालकाला आग लागल्याचे लक्षात येताच त्याने ट्रक मधुन उडी घेत आपले प्राण वाचवले. घटनेची माहिती मिळताच खामगाव व नांदुरा न.प. अग्नीशामन दल घटनास्थळी पोहचलले होते. मात्र तोपर्यंत ट्रक आगीत जळून खाक झाला होता. त्यामधील तुर सुध्दा जळून खाक झाली. तर एएसपी श्रेणीक लोढा व शिवाजी नगर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली होती. ट्रकला अचानक आग लागल्याने वाहतुक ठप्प झाली होती. यावेळी रत्याच्या दोन्ही बाजुने वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या.

### पिंप्री गवळी येथे २ लाखाची घरफोडी

**खामगाव :** अज्ञात चोरट्यांनी पिंप्री गवळी येथे एका घरात रललाखांचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. तालुक्यातील पिंप्री गवळी येथील रहिवासी शक्तीसिंह प्रकाशसिंह तोमर यांनी ११ एप्रिल रोजी खामगाव ग्रामिण पोस्टेला फिर्याद दिली. त्यामध्ये नमुद केले आहे की, ११ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास त्यांची पत्नी झोपेतुन उठली होती. त्यांनी बेडरूमचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र बाहेरुन दवाजा बंद होता. त्यामुळे त्यांनी पतीला झोपेतून उठवले होते. यावेळी पती बेडरूमच्या खिडकी मधून बाहेर पडले. व कपाटाची पाहणी केली असता त्यांना सोन्या चांदीचे दागिने (किं. १ लाख ३१ हजार व नगदी ८० हजार रू.) असा एकुण २ लाख ११ हजार रूपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याचे दिसुन आले. याप्रकरणी ग्रामीण पोस्टेमध्ये अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### बाबा काळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती



**खामगाव :** स्थानिक सामाजिक कार्यकर्ते बाबा काळे यांची नॅशनल अँटी करप्शन अँड ऑपरेशन कमिटी ऑफ इंडियाच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### निधन वार्ता

### राधाबाई बोरबळे



**बुलढाणा :** केळवद येथील राधाबाई बोरबळे यांचे १३ एप्रिल रोजी सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९१ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा सर्पमित्र नंदूआप्पा बोरबळे यांच्या त्या मातोश्री होत.

---

## बॅनर, डिस्प्लेच्या नव्या परंपरेने गजबजले मुख्य मार्ग

# भीमजयंतीसाठी ठिकठिकाणी निळाई

**खामगाव, प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमीत्त शहर निळ्या पताकांनी सजले आहे. ठिकठिकाणी निळ्या रंगांचे झेंडे, मंडप व फुलांचे हार लावले जात आहे. विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी यासाठी दिवसरात्र झटत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा न.प. मैदान हे आकर्षणाचे मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे.

आंबेडकरी अनुयायांसाठी डॉ. बाबासाहेबांची जयंती हा केवळ उत्सव नसून ऊर्जादिन व समाजाचा मोठा सण मानला जातो. वर्षभर समाज या दिवसाची आतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. शहरभर या जयंतीसाठी वर्षभरापासूनच कार्यक्रमाची आखणी केली जाते. वस्त्या, गल्लीबोळातही विविध आयोजने असते. सामाजीक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय संस्था संघटना त्यांच्या पातळीवर विविध उपक्रम यानिमीत्ताने आयोजीत करतात. यंदाही अशाचप्रकारचे अनेक कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. तसेच १४ एप्रिल रोजी येथिल न.प. मैदानस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सकाळी आंबेडकर अनुयांयीकडून संबोधनाचे आणि अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळून शहरातील विविध मंडळांकडून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी पोलीस विभागाकडूनही चोख बंदोबस्त लावण्यात आले आहे.



### बॅनर डिस्प्ले नवी परंपरा

■ दोन वर्षापासून शहर व परिसरात विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महती, कार्य, त्यांचे कर्तृत्व यांची छाप सोडणारे बॅनर लावण्याची परंपरा सुरू झाली. चौकाचौकांमध्ये अशाप्रकारचे बॅनर उभारले गेले आहे. शहरातील बसस्थानकते टॉवर चौक पर्यंत आंबेडकर अनुयायींकडून विविध माहिती असलेले मोठ मोठे बॅनर लावले असून शहरातील मुख्य मार्ग या बॅनरमुळे गजबजलेले दिसून येत आहे.

### शहर व परिसरातील बुद्धविहारे सजली

■ जयंतीनिमित्त शहरातील सर्वच बुध्दविहारांमध्ये जोरदार तयारी सुरू आहे. बुद्ध विहारांवर रोषणाई करण्यात आली आहे. उपासकांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन आहे. विशेषतः महिला उपासिका सकाळच्या सत्रात विहारात बुध्दवंदना घेतात. त्यानंतर इतरही कार्यक्रम घेतले जातात. त्यानंतर रात्रीच्या सुमारास भोजनदानही देतात. तसेच विविध कॉलेज, महाविद्यालयांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कर्तृत्व वैविध्यपूर्ण आहे. संविधान निर्माते, अर्थतज्ञ, वकील, पत्रकार, सामाजिक विचारवंत, यासह अनेक रूपात अवघ्या जगात त्यांचे कर्तृत्व आहे. विशेष म्हणजे एक चांगला विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकीक होता. यामुळे विविध कॉलेज व महाविद्यालयात व्याख्यानांचे विशेष आयोजन असते.

---

## भीमजयंतीनिमित्त शहरात पोलिसांचा रूट मार्च



**खामगाव / प्रतिनिधी**

शहरात मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शहरातून १४ एप्रिल रोजी निघणाऱ्या मिरवणूकीनिमित्त पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कवायत मैदान येथे १३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० ते ११.३० वा. दरम्यान दंगा काबू पथकाची रंगीत तालीम घेण्यात आली.

त्यानंतर पोलीस स्टेशन खामगाव शहर येथून रूट मार्च काढण्यात येऊन सदर रूट मार्च पोस्टे खामगाव शहर येथून सुरु होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, नगर परिषद टर्निंग, टिळक पुतळा, महावीर चौक, मोहन चौक, फरशी चौक, एकबोटे चौक, टॉवर चौक व पोलीस स्टेशन खामगाव शहर येथे येऊन समाप्त झाला.

सदर दंगा काबू योजना रंगीत तालीम व रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी खामगाव प्रदीप पाटील, पो नि.आर. एन. पवार, पो. स्टे.खामगाव शहर, पो.नि. सुरेंद्र अहिरकर पो.स्टे. शिवाजीनगर, १२ दुय्यम अधिकारी, ८० पोलीस अंमलदार, ४५ होमगार्ड असे सहभागी झाले होते. तसेच न प. खामगाव येथील अग्निशमन दल व सामान्य रुग्णालय खामगाव येथील रुग्णवाहिका वैद्यकीय चमुसह हजर होते.

---

# नारी शक्तीच्या मंचावर 'अदिती'ची झेप

## पंतप्रधानांशी संवादाची सुवर्णसंधी

**खामगाव / प्रतिनिधी**

देशाच्या नव्या पिढीला नेतृत्वाची दिशा देणाऱ्या मेरा युवा भारत या उपक्रमांतर्गत आयोजित महिला युवा संसद मध्ये खामगाव शहरातील अदिती रितेश खेतान हिला सहभागी होण्याचा मान मिळाला आहे. नारी शक्ती : विकसित भारताची आवाज या प्रभावी विषयावर होणाऱ्या या विशेष युवा संसदेत तिची निवड होणे ही कुटुंबासाठी आणि शहरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून देशभरातील तरुणींना आपले विचार मांडण्याची, नेतृत्वगुण विकसित करण्याची आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्याची संधी




मिळत आहे. अदितीच्या निवडीमुळे तिच्या कर्तृत्वाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. विशेष म्हणजे, या युवा संसदेत सहभागी झालेल्या निवडक प्रतिनिधींना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे अदितीसाठी हा अनुभव आयुष्यभरासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

अदितीच्या या यशामुळे कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या यशातून नारी शक्तीचा आत्मविश्वास आणि विकसित भारताचे स्वप्न अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

---

## पार्किंगमधून दुचाकी चोरी

**शेगाव :** शहर पोलीस स्टेशन हद्दीतील आनंद सागर परिसरात पार्किंगमधून दुचाकी चोरीची घटना उघडकीस आली असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश गणेश सुरवाडे (३६) व्यवसाय मजुरी, रा. संविधान चौक, शेगाव हे ५ एप्रिल रोजी आनंद सागर येथे रंगकामासाठी गेले होते. त्यांनी आपली एफ डिलक्स मोटारसायकल क्रमांक एमएच २८ एयु १५१४ आनंद सागरच्या मुख्य गेटजवळील पार्किंगमध्ये उभी केली होती. दरम्यान, दुपारी २.०० वाजण्याच्या सुमारास अज्ञात्त चोरट्याने ही मोटारसायकल चोरून नेल्याचे लक्षात आले.

---

## महात्मा ज्योतिराव फुले यांच्यामुळेच शिक्षणाची दारे खुली : मुख्याध्यापक एस.डी. झनके

**मलकापूर, प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्यामुळेच मुला-मुलींना तसेच गोरगरिबांच्या मुलांना मोफत शिक्षणाची दारे खुली झाली, असे प्रतिपादन मुन्सिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक एच.डी. झनके यांनी केले.

मुन्सिपल ज्युनिअर कॉलेज येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व



मेणबत्ती प्रज्वलित करून करण्यात आली. यावेळी सुजाता भालेराव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास आरती खंडेराव, पौर्णिमा सुरळकर, शिक्षक शेळके, के.जी. जाधव, वाघमारे, आर.के. जाधव, शेंडे, वरिष्ठ लिपिक एस.एन. इंगळे, धीरज वाकोडे, अभिजीत वाघमारे यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याची व शिक्षण क्षेत्रातील योगदानाची प्रेरणा मिळाली.

---

## भाजपाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन



**खामगाव / प्रतिनिधी**

भाजपाच्या वतीने जयंतीनिमित्त क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले. स्त्री शिक्षणासाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती भाजपच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम स्थानिक महात्मा फुले उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील क्रांतिसूर्य महात्मा फुले यांचे पुतळ्याला भाजपा महाराष्ट्र प्रदेश सोशल सहसंयोजक सागर फुंडकर व नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस शरदचंद्र गायकी, माजी पं.स सभापती उर्मिला गायकी, डॉ. एकनाथ पाटील, जिल्हा सचिव संजय शिनगारे, न.प. गटनेते विजय उगले, उल्हास वानखडे, विलास काळे, विनोद टिकार, राजेश तेलंग, युवराज मोरे, सुरेशसिंग तोमर, दत्ता जवळकार आदी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# महापुरुषांची जयंती समाजोपयोगी उपक्रमांनी साजरी करा : जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे

**जळगाव जामोद / प्रतिनिधी**

स्थानिक पोलीस प्रशासनाच्या वतीने आगामी सण आणि महापुरुषांच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जळगाव जामोद येथे शांतता कमिटीची बैठक उत्साहात पार पडली. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सामाजिक सलोखा आणि विधायक उत्सवावर भर देण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीला प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, नायब तहसीलदार भरत किटे, आणि गटशिक्षणाधिकारी श्रीकांत जोशी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ठाणेदार नितीन पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रशांत तायडे यांनी पार पाडले. बैठकीत मार्गदर्शन करताना अधिकाऱ्यांनी जनतेला आणि




उत्सव समित्यांना काही महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना केल्या.महापुरुष सर्वांचेच: कोणत्याही महापुरुषाने एका विशिष्ट समाजासाठी कार्य केलेले नाही. त्यांचे कार्य संपूर्ण मानवजातीसाठी गौरवास्पद असून, सर्व समाजांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करावा. उत्सवांमध्ये डीजेवर होणारा अवाढव्य खर्च टाळून तो पैसा समाजाच्या विकासासाठी आणि लोकहिताच्या कामासाठी वापरावा. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि सोशल मीडियाच्या विळख्यातून त्यांची सुटका व्हावी, यासाठी अर्धा तास अभ्यास हा उपक्रम राबविण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्याकडून करण्यात आले. या सभेला भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, वंचितचे तालुकाध्यक्ष देवा दामोदर, डॉ. सतीश शिरेकर, सुनिता हेलोडे, मंजूर खान, नगरसेवक सिद्धार्थ हेलोडे, अजय वानखडे, कैलास देशमुख व सहकारी पत्रकार, पंचायत समिती, नगरपरिषद, महावितरणचे कर्मचारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी तामगाव पो.स्टे.चे ठाणेदार सोनवणे यांनी सर्वांचे आभार मानले.

---

## एफ. एम. काशेलानी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी गुणगौरव

**शेगाव :** स्थानिक एफ. एम. काशेलानी इंग्लिश स्कूलमध्ये जानेवारी महिन्यात आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थी व पालकांचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. शाळेच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुणाल काशेलानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिन वारुळकर उपस्थित होते. यावेळी शुभम देशमुख, योगीता गावंडे, सुमन काशेलानी यांची विशेष उपस्थिती होती.

---

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जाक्र २०२५/संकीर्ण/जमुअ/सीआर-११०९/ कावि-०३ दिनांक - २०/०३/२०२६

**जाहीर प्रगटन**

**अर्जदार:-श्री./श्रीमती. विलास देवीदास निकाळजे रा.भोरखेडा पो.धावडा, ता. भोकरदन जि.जालना**

**- विरुध्द -**

**गैरअर्जदार:- उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू.छत्रपती संभाजीनगर**

विषयाकर्कीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नामे, अर्नव विलास निकाळजे यांचा दिनांक २०/०३/२०२४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. विलास देवीदास निकाळजे यांचे मुलगा नामे, अर्नव विलास निकाळजे यांन नोंद नसल्याबाबत उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला पर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की,अर्जदाराचे मुलगा नामे, अर्नव विलास निकाळजे यांचा दिनांक २०/०३/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/ तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप / हरकत/ तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक २०/ ०३/ २०२५ रोजी देण्यात आले

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- २०/०३/२०२६

शिक्का

**स्वाक्षरी**
**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी छत्रपती संभाजीनगर**

---

## रुग्णसेवा व समाजसेवेचे व्रत घेऊन कार्य करणारे ओमसाई फाऊंडेशन

# फाऊंडेशनने ८० अपघातग्रस्तांना दिला मदतीचा हात

**नांदुरा / प्रतिनिधी**

रुग्णसेवेला सामाजिक कार्याची जोड देऊन गत ११ वर्षापासून ओमसाई फाउंडेशन नांदुऱ्याचे विलास निंबोळकर हे त्यांच्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन दिवस व रात्री परवा न करता कार्य करीत आहे. त्यांचे हे कार्य वाखाण्याजोगे व समाजासमोर एक आदर्श निर्माण करणारे आहे. विलास निंबोळकर यांनी ओमसाई फाउंडेशनच्या नावाने लावलेल्या या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या १२ महिन्याच्या कालावधीत या फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी खामगाव, मोताळा, जळगाव जामोद व मलकापूर या मार्गावर झालेल्या रस्ता अपघातातील एकूण ८० पेक्षा अधिक अपघातग्रस्त



रुणांना तातडीने मदत रूपाने हात देऊन आपल्या रुग्णवाहिकेतून नजीकच्या रुग्णालयात नेऊन त्यांना तेथे भरती केले होते. त्या रुग्णांवर वेळेवर उपचार झाल्याने त्यांचे प्राण वाचले आहे. त्यांचे प्राण वाचले हेच आपल्यासाठी समाधानाची बाब असल्याचे निंबोळकर यांनी सांगितले.

नायगाव नजीक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर असलेल्या बायोडिझेल पंपाच्या टाकीत पडलेल्या तिघांचे प्राण वाचावे यासाठी ओमसाई फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी जीव धोक्यात टाकून त्यांचे प्राण वाचावे यासाठी प्रयत्न केले. पण या प्रयत्नात एकाचे प्राण वाचविण्यास त्यांना यश मिळाले, मात्र दोघांचे प्राण वाचविण्यास ते अपयशी ठरले. वडनेर भोलजी गावानजीक रस्त्यालगत असलेल्या पडक्या विहिरीत कारसह पडलेल्या मृतदाम्पत्यांचा रेस्क्यू करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जलस्तोत्रात मृत पावलेल्या ९ व्यक्तींचा जीव वाचावा यासाठी स्वतःचा जीव धोक्यात टाकून त्यांचा पाण्यात शोध घेऊन त्या ९ व्यक्तींचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढले आहे. पूर्णा नदीवरील गणपती किंवा दुर्गादेवी विसर्जनाच्या वेळी पूर्णा नदीच्या पुलावर जीवन रक्षक टीम रुग्णवाहिकेसह सेवा देत आहे. सेवेची ही परंपरा गेल्या अनेक वर्षापासून राबविण्यात येत आहे.

शासनाच्या समाजपयोगी उपक्रमात ओमसाई फाउंडेशनचे विलास निंबोळकर, कमलेश बोके, किरण इंगळे, अश्विन फेरण, कृष्णा वसोकार, श्याम जुमडे, आनंदा वावगे, प्रवीण पारखेडे, विष्णू धांडे, राहुल निमकर्डे, गजानन भुसारी, नितीन ठाकरे, श्रीराम निंबोळकर, सुभाष पिवळटकर व प्रवीण टवंगे यांचा सहभाग राहिला आहे. जनावरांच्या रेस्क्यू ऑपरेशन मध्येही ओमसाई फाउंडेशन ने सहभाग नोंदवून प्राणीमात्रावर दया त्यांनी दाखविले आहे.

### अनोळखी व्यक्तींचा दफनविधी

■ ओमसाई फाउंडेशन तर्फे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत ११ तर १ जानेवारी ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत ३ अनोळखी व्यक्तींवर त्या – त्या गावातील स्मशानभूमीत दफन विधी करण्यात आला. असल्याची माहिती निंबोळकर यांनी दिली. विशेष उल्लेखनीय म्हणजे कोरोना काळातही ओमसाईने अंत्यसंस्काराचे कार्य थांबविले नव्हते.

> सामाजिक ऋणातून उतराई करण्यासाठी मी मनात खूणगाठ बांधली आहे.आणि माझ्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन वेळोवेळी होईल ती मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. हे कार्य करण्यासाठी आम्ही कोणाकडे आर्थिक मदतीची याचना करीत नाही जर काही जण आमचे कार्य पाहून आर्थिक मदतीचा हात पुढे करीत आहे. त्या मदतीच्या भरोशावर रुग्णवाहिकेसह इतर सेवा कार्य सुरू आहे.
>
> **– विलास निंबोळकर**
> अध्यक्ष, ओमसाई बहुउद्देशीय फाउंडेशन नांदुरा.

---

**विद्यमान तहसिलदार बुलढाणा यांचे न्यायालयात**

रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/ पाडळी / १६९/ किरकोळ अर्ज -जन्म मृत्यु नोंदणी दुरुस्ती कायदा - २०२५/ २०२५-२६

**जाहीरनामा**

**वादी/अर्जदार:- श्री.संदीप संतोष बेलकर रा.दहीद बु.ता.जि. बुलढाणा**

**- विरुध्द -**

**प्रतिवादी/गैरअर्जदार:- मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय, बुलढाणा**

ज्याअर्थी अर्जदार श्री. संदीप संतोष बेलकर रा.दहीद बु.ता.जि. बुलढाणा यांचा जन्म दिनांक २८/११/२००६ रोजी मौजे पाडळी ता.जि.बुलढाणा येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, पाडळी येथे अनावधानाने जन्म-मृत्यू रजिष्टरमध्ये करावयाची राहून गेलेली असल्यामुळे अर्जदार यांना त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, पाडळी येथील जन्म मृत्यू रजिस्टरमध्ये होऊन मिळणेस्तव व तसे निर्देश ग्रामपंचायत कार्यालय,पाडळी यांना होणेस्तव जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३)अन्वये विद्यमान न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणासंदर्भात जर कोणाला हरकत, आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी या न्यायालयात कार्यालयीन वेळेत सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत. करीता ही नोटीस.

ठिकाण :- बुलढाणा
दिनांक :- १७/०२/२०२६

शिक्का

**स्वाक्षरी**
**तालुका दंडाधिकारी, तहसिलदार, बुलढाणा**

### देशव्यापी मोहीम राबविण्याची योजना : मंत्री मनसुख मांडविया

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय देशी खेळांचा होणार समावेश

**दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारत आपल्या समृद्ध क्रीडा वारशाचे प्रदर्शन करण्यासाठी २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत हॉकी आणि क्रिकेट यांसारख्या मुख्य खेळांसोबतच कबड्डी आणि मल्लखांब यांसारख्या देशी खेळांचा समावेश करण्याची योजना आखत आहे. क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी दिल्ली येथे माध्यमांशी बोलतांना सांगितले की, २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या विस्तृत कार्यक्रमात दोन भारतीय देशी खेळांचा समावेश होण्याची दाट शक्यता आहे.

राष्ट्रकुल क्रीडा महासंघाच्या शिष्टमंडळाने गेल्या आठवड्यात यजमान शहर अहमदाबादमधील तयारीचा आढावा घेण्यासाठी भारताचा दौरा केला. या शिष्टमंडळात अध्यक्ष डोनाल्ड रुकारे, सीईओ केटी सॅडलियर आणि इतर तज्ज्ञांचा समावेश होता. त्यांनी मांडविया यांची भेट घेऊन स्पर्धेचे कार्यक्षम आयोजन आणि पायाभूत सुविधांच्या दीर्घकालीन वापराबाबत चर्चा केली. २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी वातावरण निर्मिती करण्यासाठी दिग्गज खेळाडू आणि युवा नेत्यांचा समावेश असलेली देशव्यापी मोहीम राबवण्याची योजना असल्याचे मांडविया यांनी सांगितले.

तब्बल दोन दशकांनंतर राष्ट्रकुल स्पर्धा भारतात परतत आहेत. यापूर्वी २०१० मध्ये दिल्लीने याचे यजमानपद भूषवले होते. भारताने गेल्या वर्षी नायजेरियावर मात करत यजमानपदाचे हक्क मिळवले आहेत. याशिवाय, भारत २०३६ च्या ऑलिम्पिक यजमानपदाच्या शर्यतीत देखील आहे, ज्याचे आयोजन अहमदाबादमध्येच करण्याचे नियोजन आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी २३ मंत्रालयांच्या माध्यमातून सविस्तर नियोजन सुरू असल्याचे मंत्र्यांनी सांगितले.

**यापैकी दोन खेळाची होणार निवड**

'देशी खेळांपैकी कबड्डी, मल्लखांब, खो-खो आणि योगासने विचाराधीन आहेत. त्यापैकी २ खेळांची निवड होण्याची शक्यता आहे,' असे मांडविया सांगितले. मंत्र्यांनी पुष्टी केली की, आगामी ग्लासगो आवृत्तीतून वगळण्यात आलेले क्रिकेट आणि हॉकी हे खेळ २०३० च्या १७ खेळांच्या यादीत नक्कीच परततील. खर्च कपातीसाठी ग्लासगो स्पर्धेत केवळ १० खेळ ठेवण्यात आले असून भारताचे पदक मिळवून देणारे नेमबाजी, कुस्ती आणि बॅडमिंटन यांसारखे खेळ वगळण्यात आले आहेत. 'क्रिकेट आणि हॉकी दोन्ही तिथे असतील,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## आयुषला रौप्यपदकावर मानावे लागले समाधान

**झेजियांग (चीन), वृत्तसंस्था :**

भारतीय शटलर आयुष शेट्टीला बॅडमिंटन आशियाई चॅम्पियनशिप मध्ये रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यात त्याला चीनच्या शी यू की विरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. ६० वर्षांनंतर एखाद्या भारतीयाने चॅम्पियनशिपच्या पुरुष एकेरी गटाच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. आयुषपूर्वी दिनेश खन्नाने १९६५ मध्ये पुरुष एकेरीत सुवर्णपदक जिंकले होते. रविवारी चीनमधील झेजियांग येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात आयुषचा सामना जगातील नंबर-२ खेळाडू शी यू की सोबत होता. २० वर्षीय आयुष हा सामना ८-२१, १०-२१ अशा सरळ गेममध्ये हरला.



या पराभवानंतरही आयुषने आपल्या कारकिर्दीत एक मोठे यश संपादन केले आहे. तो बॅडमिंटन आशियाई चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष शटलर बनला आहे. यापूर्वी १९६५ मध्ये दिनेश खन्ना यांनी या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. खन्नानंतर अंतिम फेरीपर्यंत पोहोचणारा आयुष हा पहिला भारतीय खेळाडू आहे.

बॅडमिंटन आशियाई चॅम्पियनशिप १९६२ पासून खेळली जात आहे. या स्पर्धेत भारताचे एकूण १९ वे पदक आहे. भारताने आतापर्यंत २ सुवर्ण, १ रौप्य (आयुष) आणि १६ कांस्य पदके जिंकली आहेत. १९६५ मध्ये दिनेश खन्ना यांनी एकेरीत आणि २०२३ मध्ये सात्विक-चिरागच्या जोडीने पुरुष दुहेरीत सुवर्णपदक जिंकले होते. या संपूर्ण स्पर्धेत आयुषची काम गिरी उत्कृष्ट राहिली. त्याने वर्ल्ड नंबर १, वर्ल्ड नंबर ४ आणि वर्ल्ड नंबर ७ सारख्या टॉप रँक असलेल्या खेळाडूंना हरवले होते. शनिवारी झालेल्या उपांत्य फेरीत वर्ल्ड नंबर २५ आयुषने डिफेंडिंग चॅम्पियन थाई खेळाडू कुन्लावत वितिदसर्नला हरवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते.

## १८ वर्षीय गाउटने १९.६७ सेकंदात शर्यत पूर्ण करून केला विक्रम

**सिडनी, वृत्तसंस्था :**

अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत सिडनी येथील ऑलिंपिक पार्क अ‍ॅथलेटिक सेंटरमध्ये १८ वर्षीय स्प्रिंट गाउटने २०० मीटरच्या अंतिम फेरीत १९.६७ सेकंदांची अविश्वसनीय वेळ नोंदवून इतिहास रचला. ही वेळ केवळ महान उसेन बोल्टच्या विक्रमापेक्षा वेगवान नाही, तर त्याने ऑस्ट्रेलियन अ‍ॅथलेटिक्सच्या एका नवीन युगाची सुरुवातही केली आहे. क्रीडा इतिहासात गाउटने या आकडेवारीने आपली श्रेष्ठता सिद्ध केली. २००४ साली उसेन बोल्टने १८ वर्षांच्या वयात १९.९३. सेकंदांची वेळ नोंदवली होती. ऑस्ट्रेलियन अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये गाउटने त्यांच्यापेक्षा खूप पुढे जात १९.३७ सेकंदात फिनिश लाइन पार केली आणि सुवर्णपदक जिंकले. ही या वर्षातील जगातील सर्वात वेगवान वेळ आहे.




गेल्या वर्षी त्याने १९.८४ सेकंदांची वेळ नोंदवली होती, पण 'अवैध टेलविंड'मुळे ती अधिकृत होऊ शकली नव्हती. यावेळी १.७ मीटर प्रति सेकंदच्या वैध वाऱ्याच्या गतीसह त्याने आपल्या वेगावर शिक्कामोर्तब केले. शर्यतीची सुरुवात सामान्य होती. गाउट लवकरच आघाडी घेईल अशी अपेक्षा होती, परंतु एडन मर्फीने गाउटला प्रत्येक टप्प्यावर कडवी झुंज दिली. अंतिम मीटरमध्ये गाउटने आपली खास टॉप-स्पीड पकडली आणि जेव्हा स्कोरबोर्डवर वेळ दिसला, तेव्हा संपूर्ण स्टेडियम थक्क झाले. या कामगिरीमध्ये एडन मर्फीच्या भूमिकेला विसरता येणार नाही. मर्फीने १९.८८ सेकंदात शर्यत पूर्ण केली आणि दुसऱ्या स्थानावर राहिला. एकाच शर्यतीत दोन ऑस्ट्रेलियन धावकांनी २० सेकंदांपेक्षा कमी वेळेत शर्यत पूर्ण करण्याची ही पहिलीच वेळ आहे. मर्फीने पीटर नॉर्मनच्या १९६८ च्या त्या विक्रमाला मोडण्याच्या दिशेने मोठी कामगिरी केली, जो दशकांपासून अभेद्य वाटत होता. त्याने गाउटला त्याच्या सर्वोत्तम क्षमतेपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

गाउट ज्या ट्रॅकवर धावले, तो सिडनी २००० ऑलिम्पिकचा वॉर्म-अप ट्रॅक होता. जेव्हा ते पोडियमवर उभे होते, तेव्हा असे वाटत होते की त्यांनी जुन्या पिढीकडून मशाल हातात घेतली आहे.




## आशा भोसले यांना श्रद्धांजली देतांना चूक; आथिया शेट्टी ट्रोल

आशा भोसले यांच्या निधनाने संपूर्ण देशाला धक्का बसला आणि त्यांच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर शोकसंदेश पाठवले. अनेक नामवंत कलाकार, गायक आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांना श्रद्धांजली वाहिली. पण याच दरम्यान, एका ३३ वर्षीय अभिनेत्रीने एक मोठी चूक केली. तिने आशा भोसले यांच्याऐवजी लता मंगेशकर यांचा फोटो अपलोड केला. आथिया शेट्टी जिने इंस्टाग्रामवर आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली आहे. या मोठ्या चुकीमुळे ती सोशल मीडियावर ट्रोल होत आहे. यामुळे नेटकऱ्यांनी तिला चांगलच फटकारले आहे. ही ३३ वर्षीय अभिनेत्री एका मोठ्या बॉलिवूड स्टारची मुलगी आणि एका प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटूची पत्नी आहे. अभिनेत्रीच्या एका चुकीमुळे सोशल मीडियावरील ट्रोलर्सकडून तिला मोठ्या प्रमाणावर शिवीगाळ सहन करावी लागली, इतकेच नव्हे तर घराणेशाहीबद्दल पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली.

मात्र, या पोस्टमध्ये तिच्याकडून एक चूक झाली, आशा भोसले यांच्याऐवजी, तिने गायिका लता मंगेशकर यांचा फोटो शेअर केला, ज्यांचे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले होते. सोशल मीडिया वापरकर्त्यांनी आथिया शेट्टीची चूक लगेचच ओळखली आणि तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले. आथियाने ती पोस्ट लगेचच डिलीट केली असली तरी, त्या पोस्टचा स्क्रीनशॉट ऑनलाइन व्हायरल



झाला, ज्यामुळे ट्रोलर्सनी तिच्यावर अत्यंत वाईट कमेंट्सचा वर्षाव केला. एका वापरकर्त्याने लिहिले, आथिया शेट्टी सुंदर आहे पण तिच्यात बुद्धी नाही. तिने दिवंगत आशा भोसले यांच्याऐवजी दिवंगत लता मंगेशकर यांचा फोटो असलेली स्टोरी पोस्ट केली. घराणेशाहीच्या मुलांना कोणत्याही मार्गाने, मेहनत किंवा संघर्ष न करता लोकप्रिय व्हायचे असते आणि म्हणूनच त्यांचे चित्रपट फ्लॉप होतात आणि ते अशा चुका करतात. दुसऱ्या एका वापरकर्त्याने अभिनेत्रीला ट्रोल करताना लिहिले, आथिया शेट्टीला वेड लागले आहे. तिने आशा भोसले यांच्याऐवजी लता मंगेशकर यांचा फोटो अपलोड केला.

ऑनलाइन ट्रोल झाल्यानंतर अभिनेत्री आथिया शेट्टीने कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही, परंतु नंतर तिने एक वेगळी पोस्ट शेअर करून गायिका आशा भोसले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आणि श्रद्धांजली वाहिली.

## हरियाणवी गायक मासूम शर्मा विरोधात तक्रार दाखल

डेहराडून मधील एका कार्यक्रमादरम्यान मंचावर अपमानास्पद भाषा वापरल्याप्रकरणी हरियाणवी गायक मासूम शर्मा यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. सत्यम शिवम स्टुडंट्स युनियन (डीएव्ही कॉलेज) चे विद्यार्थी प्रतिनिधी प्रांचल नौनी यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी रात्री ११ वाजता गुन्हा नोंदवला. यापूर्वी, पोलिसांनी गायकाला १५ दिवसांच्या आत उत्तर देण्यास सांगणारी नोटीस बजावली होती. दरम्यान, हरियाणा महिला आयोगाने गायकाला १८ एप्रिल रोजी पंचकुला येथील कार्यालयात व्यक्तिशः हजर राहण्यासाठी समन्स बजावले आहे.

भिवानीचे वकील अशोक आर्य यांनीही बहाल पोलीस ठाण्यात मासूम शर्मा यांच्या विरोधात तक्रार



दाखल केली आहे. त्यांनी मंचावर आक्षेपार्ह भाषा वापरल्याबद्दल मासूम शर्मा यांच्यावर कारवाई करण्याची आणि सोशल मीडियावरून व्हिडिओ हटवण्याची मागणी केली आहे. मंचावरील अपमानास्पद भाषेच्या वापरानंतर, मासूम शर्मा यांना सोशल मीडियावर तीव्र ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. काही वापरकर्ते त्यांना गुंड म्हणत आहेत, तर काही जण त्यांच्या अटकेची आणि १० वर्षांच्या तुरुंगवासाची मागणी करत आहेत.

बहल येथील रहिवासी असलेले अ‍ॅडव्होकेट अशोक आर्य यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, रविवार सकाळी ते आपली फेसबुक आयडी वापरत होते. याच दरम्यान एक व्हिडिओ समोर आला, ज्यात हरियाणवी गायक मासूम शर्मा व्यासपीठावर शिवीगाळ आणि हिंसक वक्तव्य करत होता. अनेक फेसबुक आयडीवर मासूमचा तो व्हिडिओ सुरू आहे. अ‍ॅडव्होकेटने पुढे म्हटले की, फेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मासूम शर्माच्या रील्स त्वरित हटवण्यात याव्यात आणि मासूम शर्माविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून समाजात पसरणाऱ्या अशा आक्षेपार्ह वागणुकीला आळा बसेल आणि मासूम शर्मासारखे गायक भविष्यात अशा प्रकारची कृती पुन्हा करणार नाहीत.

## 'राजा शिवाजी' च्या अँथमचे प्रदर्शन लांबणीवर

छत्रपती शिवरायांच्या भूमिकेवर आधारित आणि महाराष्ट्राची ऐतिहासिक गाथा सांगणारा सिनेमा 'राजा शिवाजी' १ मे रोजी सिनेमागृहात प्रदर्शित करण्यात येणार आहे. सिनेमाचे अँथम 'छत्रपती'ने सिने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. सिनेमाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. त्यामध्ये वापरण्यात आलेले संगीत हे अजय-अतुलने संगीतबद्ध केले असून, छत्रपती गाण्यातील काही झलक त्यात दाखवण्यात आली आहे. तेव्हापासून प्रेक्षकांना या गाण्याची उत्सुकता लागली आहे. दरम्यान, 'छत्रपती' हे गाणे १३ एप्रिल रोजी प्रदर्शित करण्यात येईल असे चित्रपटाच्या निर्माती टीमकडून सांगण्यात आले होते. पण या तारखांमध्ये आता बदल करण्यात आला आहे. १२ एप्रिल रोजी भारताच्या जेष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन झाले. भारतीय संगीत सृष्टीने संगीतातील हिरा हरपला. आशा भोसले यांना आदरांजली म्हणून जिओ स्टुडीओ मराठीने 'छत्रपती' या गाण्याची तारीख पुढे ढकलली आहे. त्या संबंधित पोस्ट त्यांनी सोशल मिडीयावर केली आहे. या पोस्टमध्ये नमूद आहे की, ज्या स्वरांनी अनेक दशके आपल्या हृदयावर अधिराज्य गाजवले, ते आज निःशब्द झाले आहेत. आशा भोसले यांच्या जाण्याने संगीताचा एक




सुवर्ण अध्याय संपल्याची वेदना प्रत्येकाच्या मनात दाटून आली आहे. या दुःखद क्षणी, त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करत आम्ही राजा शिवाजी अँथम 'छत्रपती' चे प्रदर्शन पुढे ढकलत आहोत. नवीन तारीख लवकरच कळवू. त्यामुळे प्रेक्षकांना 'छत्रपती' हे गाणे ऐकण्यासाठी प्रेक्षकांना आणखीन काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

'राजा शिवाजी' चित्रपटातील अँथम म्हणून 'छत्रपती' गीत प्रदर्शित होणार आहे. सुप्रसिद्ध मराठी संगीतकार जोडी अजय-अतुलने या गाण्याला संगीतबद्ध केले आहे. तर गाण्याचे नृत्य दिग्दर्शक रेमो डिसुझा आहेत. सिनेमाचे दिग्दर्शन अभिनेता आणि निर्माता रितेश देशमुखने केले आहे. १ मे २०२६ पासून चित्रपट सिनेमागृहात मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित केला जाणार आहे.

## भूषण प्रधान लवकरच अडकणार लग्नबंधनात

भूषण प्रधान मराठी आणि नाटक क्षेत्रातील एक प्रसिद्ध अभिनेता आहे. भूषणने अनेक मालिका आणि सिनेमांमध्ये तो झळकला आहे. मराठीतील हँडसम चॉकलेट बॉय म्हणून अभिनेत्याकडे पाहिले जाते.भूषण प्रधान हा सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असून तो नेहमी चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतो. तो नेहमी त्याच्या आयुष्यातील अपडेट्स हा चाहत्यांसोबत शेअर करत असतो. नुकतीच भूषणने एक पोस्ट केली आहे. यात त्याने त्याच्या लग्नाची तारीख जाहीर केली आहे. या पोस्टमध्ये त्याच्या होणाऱ्या पार्टनरचा चेहरा दिसत नाही. या फोटोमध्ये या दोघांच्या हातात अंगठी दिसत आहे. या फोटोने त्याने चाहत्यांना फोटो शेअर करत लग्नाची तारीख जाहीर केली आहे. २४.०७.२०२६. असे कॅप्शन त्याने फोटोला दिले आहे.






### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**धुरंधर द रिवेंज** : १:३०, ४:४५, ८:३०
**सखे गं साजणी** : २:००
**सुपर डूपर** : ५:४५, ९:००

### खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**धुरंदर २** : दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**धुरंदर २** : दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**धुरंधर द रिवेंज** : दु.१२:१०, ०३:३०, सां ०४:२०, रा.०८:३०
**डक्केत** : दु १२:३०, सां ०६:३०, रा.०९:३०
**सनम बेवफा** : दु ०३:३०

### अकोला

**मिराज**

**धुरंधर दी रेव्हेंज (२)** : स. ९.००, स. १०.००, दु. १२.३०, दु. १.३०, दु. ५.१५, सायं. ६.१५, रात्री ८.४५, रात्री १०.००, रात्री ११.००
**डकैत** : स. ११.००, दु. ४.४५, रात्री १०.३०
**सुपर डुपर** : दु. २.००, रात्री ७.४५
**प्रोजेक्ट हैल मॅरी** : दु. २.३०, सायं. ५.४५

### जालना

**रत्नदीप सिनेमा**

**धुरंधर द रिव्हेंज** : सकाळी ७ : ४५; दुपारी १२ : ००; सायंकाळी ४ : ३०; रात्री ९ : २०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**धुरंदर २** : रात्री ९ : ००
**सनम बेवफा** : रात्री ९: ००
**प्रोजेट हेल मेरी** : रात्री १० : ०५

**नीलम सिनेप्लेक्स**

**धुरंधर द रिव्हेंज** : दुपारी १२ : ४०; ३ :००: सायंकाळी ५ : ००
**सुपर डुपर** : दुपारी १२ : २०

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**धुरंधर द रिव्हेंज** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**डकैत** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०,
**बीटीएस वर्ल्ड टूर अरावींग ॲण्ड गोईंग लाईव्ह विव्हींग (हिंदी)** : दुपारी २:३०, सायंकाळी ५:३०
**सखे ग साजनी** : दुपारी १२:१५, २:३०
**बीटीएस वर्ल्ड टूर अरावींग ॲण्ड गोईंग लाईव्ह विव्हींग (इंग्रजी)** : दुपारी २:३०, ४:३०

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**धुरंधर द रिव्हेंज** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**डकैत** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**सखे ग साजनी** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**माईसाहेब** : दुपारी २:३०, रात्री १०:२५
**सालबर्डी** : दुपारी २:३०, रात्री १०:२५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**धुरंधर द रिव्हेंज** : सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**डकैत** : सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८
**बीटीएस वर्ल्ड टूर अरावींग ॲण्ड गोईंग लाईव्ह विव्हींग (हिंदी)** : दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०

## महिमा म्हात्रेने गुपचूप उरकला साखरपुडा..

### सोशल मीडियावर पोस्ट करत चाहत्यांना दिला सुखद धक्का

यंदाच्या वर्षी अनेक मराठी कलाकार लग्नबंधणात अडकल्याचे आपण पाहिले आहे. ईशा डे, नंदिता पाटकर, अपूर्वा नेमळेकर. अशा बऱ्याच अभिनेत्रींनी त्यांच्या नवीन आयुष्याची सुरूवात केली आहे. आता यांच्यापाठोपाठ एका लोकप्रिय अभिनेत्रीने साखरपुड्याचे फोटो पोस्ट करत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. तुला जपणार आहे या थ्रिलर मालिकेमुळे घरा घरात पोहोचलेली अभिनेत्री महिमा म्हात्रे हिने गुपचूप साखरपुडा उरकला आहे. महिमाचा साखरपुडा नुकताच पार पडला असून तिने सोशल मीडियावर फोटो शेअर केले आहेत.

महिमा म्हात्रेच्या होणाऱ्या पतीचे नाव रोशन विचारे असून तो सुद्धा अभिनेता आहे. आजवर अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये रोशनने भूमिका साकारल्या आहेत. 'खरंच तिचं काय चुकलं', 'दार उघड बये', 'तुझं माझं जमतंय', 'स्वराज्य जननी जिजामाता' अशा अनेक मालिकांमध्ये रोशन झळकला आहे. महिमाने शेअर केलेल्या फोटोमध्ये तिचा होणारा नवरा गुडघ्यावर बसून महिमाच्या हातात अंगठी घातल असल्याचे पाहायला मिळत आहे. महिमाने यावेळी वेस्टर्न लूक केला आहे. बेबी पिंक कलरच्या डिझायनर गाऊनमध्ये अभिनेत्री खूपच गोड दिसत आहे. अभिनेत्रीने शेअर केलेल्या पोस्टवर तिच्या चाहत्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. फोटोवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कमेंट्स केले आहेत. अभिनेत्रीने फोटोंसह साखरपुडा झाल्याचे कॅप्शनही दिले आहे. तिच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, 'तुला जपणार आहे' मालिकेमुळे तिला खरी लोकप्रियता मिळाली असून याआधी तिने 'खुमासदार



नात्यांचा गोडा मसाला' आणि 'दार उघड बये' यांसारख्या मालिकांमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. सध्या ती साकारत असलेली मीराची भूमिका प्रेक्षकांच्या मनात घर करून बसली आहे. रात्री उशिरा प्रसारित होऊनही 'तुला जपणार आहे' मालिकेला चांगला टीआरपी मिळत आहे.